नं. २१

म. ग्रं. सं. ठाणें

विषय: नाटक

ग्रंथालय क्रमांक: ५६२

लेखक: बा. चिं. बापट

सन: १८७७

पुस्तकाचें नांव: म-द्रायु सत्त्वदर्शन

५६२

२१

नाटक

# भद्रायुसत्वदर्शननाटक.

हें पुस्तक

वासुदेव चिंतामण बापट

महाजन वकील

जि॰ रत्नागिरी, ता॰ देवगड, मौजे नारिंग्रें

यानीं तयार करून

मुंबईयेथें

जगदीश्वर छापखान्यांत छापविलें.

शके १७९९

सन १८७७

हें पुस्तक सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें

रजिस्टर केलें असे.

किंमत १ रुपया.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र.
ता.
ठाणे.

# प्रस्तावना

या देशांत दिवसें दिवस महाराष्ट्र भाषेची चांगली सुधारणा होत चालली असून त्यासंबंधानें लोकांचीं मनें नवीन गोष्टी व नाटकें इत्यादि वाचण्याकडे लागलीं आहेत व अशा प्रकारचे नवीन ग्रंथही बरेच तयार झाले आहेत. हें मनांत आणून मी हा एक लहानसा ग्रंथ जन मनरंजनार्थ केला आहे.

अशा प्रकारचा ग्रंथ तयार करण्यास वास्तविक जितकें ज्ञान व बहुश्रुतपणा इत्यादि विषय पूर्णपणें पाहिजेत त्याची जरी माझ्या अंगीं कमताई आहे तरी कोणताही मनुष्य सर्वज्ञ असा नसतो. तथापि तो आपल्या ज्ञानशक्तीप्रमाणें आपले विचार विद्वज्जनापुढें सादर करितो व त्यांत जे गुण असतात ते विद्वान् ग्रहण करितात; तसाच मी आपल्या ज्ञानशक्ती प्रमाणें हा ग्रंथ विद्वज्जनापुढें सादर केला आहे. अशा प्रकारच्या ग्रंथाचे वाचनानें, त्यांतील कथाभागाकडे मन लागून इतर व्यवहारानीं व्यग्र झालेलें चित्त स्थिर होऊन सुविचाराचे अंकुराचा उद्भव होऊं लागतो हा एक फायदा आहे. तरी सर्वत्र विद्वज्जनांनीं या ग्रंथांत जे दोष असतील त्यांची क्षमा करून गुण ग्रहण करावे आणि आपला उदार आश्रय द्यावा म्हणजे तेणेंकरून अशा प्रकारचे आणखी नवीन ग्रंथ तयार करण्यास उत्तेजन येईल.

वा. चिं. बा. कर्वे.

---

# भद्रायु सत्व दर्शन नाटक.

## अंक १ ला.

### पात्रें.

सूत्रधार. . . . . . . . . . . . . . नाटक कर्ता.
नट. . . . . . . . . . . . . . त्याचा सोबती.
गणपती. . . . . . . . . . . . } आराध्य दैवतें.
सरस्वती. . . . . . . . . . . }
वज्रबाहु. . . . . . . . . . . . दशार्ण देशाधिपती.
सुमती. . . . . . . . . . . } त्याच्या स्त्रिया.
चंद्रकला. . . . . . . . . . } राजपत्न्या.
कुमुदिनी. . . . . . . . . . }
पुरोहित. . . . . . . . . . उपाध्याय.
सगुणाबाई. . . . . . . . . . पुरोहिताची स्त्री.

प्रधान, सेनापती, चोपदार, सुकेशा दासी, व सेवक भाऱ्या, राजवैद्य, घड्याळी इत्यादि.


वज्रबाहु राजा

# भद्रायु सत्व दर्शन नाटक.

## अंक १ ला.

### पात्रें.

सूत्रधार. . . . . . . . . . . . . . नाटक कर्ता.
नट. . . . . . . . . . . . . . त्याचा सोबती.
गणपती. . . . . . . . . . . . . } आराध्य दैवतें.
सरस्वती. . . . . . . . . . . . . }
वज्रबाहु. . . . . . . . . . . . . . दशार्ण देशाधिपती.
सुमती. . . . . . . . . . . . . } त्याच्या स्त्रिया.
चंद्रकला. . . . . . . . . . . . . } राजपत्न्या.
कुमुदिनी. . . . . . . . . . . . . }
पुरोहित. . . . . . . . . . . . . उपाध्याय.
सगुणाबाई. . . . . . . . . . . . पुरोहिताची स्त्री.
प्रधान, सेनापती, चोपदार, सुकेशा दासी, व सेवक भान्या, राजवैद्य, घड्याळी इत्यादि.


ग.
स
सूत. नद
वज्रबाहु राजा.
सु.
च
कु.

ग्रंथ संग्रहालय नं. ... ता. ... ठाणें सन १८९

# भद्रायुसत्वदर्शन नाटक.

## प्रवेश १ ला.

स्थल .... रंगभूमि

पात्रें.

सूत्रधार, नट, सरस्वती.

सूत्रधार- श्लोक.

विश्वातें रचुनी स्थिती अणि लया कर्ण्यासि जो तूं अधी ॥
तूझें रूप असे अगम्य महिमा केवीं स्तवूं अल्प धी ॥
संसारार्णव पार जे सुर ऋषी ध्याती तुला ते सदा ॥
व्हावें भद्र मला ह्मणूनि नमितो ह्या दास ही त्वत्पदा ॥ १ ॥

( सूत्रधार जगन्नियंत्या परमेश्वराचें एकाग्र चित्तानें स्तवन करून, नाटकास प्रारंभ करीत आहे. इतक्यांत नट येतो. )

नट.- कोण हो कोण? रात्र तर फार अतिक्रमण झाली आहे, मी स्वस्थ निद्रेचे भरांत असतां एकाएकीं छुम् छुम्, ठुण् ठुण्, अशा त्रासदायक वाद्यांच्या ध्वनीनें, आणि गर्जनेनें, एकदम माझे निद्रेचा भंग करून, डोलानें उभे आहेत ते? अहो, तुमचें नांव तरी काय? आणि असें कृत्य करून आह्मांस त्रास दिला, या बद्दल पिनल कोडाचा आक्ट कसा आहे, तो माहीत आहे ना?

शुद्ध. २ कल्याण.

सूत्रधार- (पुढें येऊन,) अरे विचित्र पुरुषा, या स्थळीं मी नाटक करणार; मला नाटकाचार्य असें ह्मणतात.

नट- हो हो, समजलों, एकुण ते तुह्मीच काय? अहो आज चार दिवस झाले. रामभट शौचे यांचे कन्येचें लग्न झालें; त्या दिवशीं आह्मी भोजना करितां तेथें गेलों होतों, बाकी स्वयंपाक साधारण होता, परंतु लाडू पांक करपून कडू झाले होते, ते आपलेच हातचे असतील नव्हे?

सूत्रधार- अरे, तूं ज्ञानशून्य दिसतोस. मी नाटकाचार्य असें नामाभिधान कथन केल्यावरून, तूं मला पाकनिष्पत्ति करणारा आचारी, असें समजलास काय?

नट- अहो, तुह्मीं स्वमुखानें सांगितल्यावर ही आह्मी समजूं नये, इतके आह्मी काय मूर्ख आहों?

सूत्रधार- अशा ज्ञानशून्यास मूर्ख ह्मणेल कोण? अरे नाटकाचार्य या शब्दाचा अर्थ तूं समजलास तसा नसून, या नाटकांत जीं जीं पात्रें आहेत, त्यांचीं सर्व सूत्रें माझें हातीं आहेत, ह्मणून मला सूत्रधार असेंही ह्मणतात. आतां तुझें नामाभिधान कथन कर बरें?

नट- आर्या.

वनचर विदुषक माध्वी नट ह्मण माहीं अमोपम जनांवें॥
यांतुन तुमच्या इच्छे जें वाटे तें तुह्मीं सुखें घ्यावें॥ १॥

एकवेळ आकाशांतील नक्षत्रांची गणना करवेल, परंतु मा-

ह्या नांवांची गणती होणार नाहीं. तुमच्या साररवें एकच नांव असतें तर सांगितलें असतें; असो ज्यापेक्षां तुह्मी आग्रहानें माझें नांव ऐकूं इच्छिता, त्यापेक्षां मला विदूषक, नट, माध्वी इत्यादि ह्मणतात. बरें आतां तुह्मी येथें करणार काय?

सूत्रधार- शाबास शाबास नटा, या ठिकाणीं मी शिवपुराणांतर्गत भद्रायु आरव्यान नाटक रूपानें करणार. तर या नाटकामध्यें तूं मला अनुकूल राहून वेळचेवेळीं सर्व सिद्धता करावी. मी आतां विघ्न नाशनश्रीगणपतीचें ध्यान करितों.

नट - ह्मेरिवेल; भाळ छलु; घणुं सारुं; फार उत्तम आहे; करा ध्यान.

सूत्रधार- (गणपतीचें स्तवन करितो.)

आर्या.

विघ्नहरा लोकरितूं, येउनि पावें त्वरें दिनाला हो ॥
नाटकिं विघ्नें[1] मुनी, युष्म द्दूर ह्ला प्रसाद मज लोहो[2] ॥ १ ॥

पद.

विघ्नहरा करूनि त्वरा पाव मज दिनारे ॥ त्रिदोषहरण त्रिताप शमन येईं दया घनारे ॥ ध्रु० ॥ वरदहस्त मस्तकीं तूं ठेवूनि बालका ॥ सदय पणें हृदय भरीं विश्व पालका ॥ भक्त हृदय भिज्ञ असा असशि तूं

---

१ नाशकरून. २ प्राप्तहोऊ.

खरा ॥ उंदिरवाहन सिंदुर लेपन भक्त प्रियकरा ॥
अज अजीत आणि अनाम हे सनातनारे ॥ १ ॥
रंगणी तूं येई अतां करूनियां त्वरा ॥ हेतु सफल
माझे करीं देउनी वरा ॥ षड्रिपु हे काम क्रोध नेई तूं
लया ॥ वासुदेव गात गुण येई दयालया ॥ धरिल
आस चरणिं दास मोदक ओदनारे ॥ २ ॥ विघ्नहरा
करुनि त्वरा पाव मज दिनारे ॥ त्रिदोष हरणा त्रिताप
शमन येई दयाघनारे ॥ ॥ ॥ ॥

नट — ( मोठ्या आनंदानें ह्मणतो ) हे सूत्रधारा, तुझ्या एक
निष्ठ भक्तीच्या योगानें श्री गजवदन सभास्थानीं प्राप्त
होऊन इच्छित वर देत आहेत, तर आतां हा वर ग्रहण
करून पुढें श्री सरस्वतीचें आवाहन करावें, ह्मणजे बु-
द्धि चांचल्यता प्राप्त होऊन, पुढील कार्याचा गौरव उत्त-
म प्रकारें होईल.

सूत्रधार— पद.

( उद्धवा शांतवन करीं जा. या चालीवर. )

हे ब्रह्मकन्यके माते, सत्वरि तूं रंगणीं यावें ॥ मद्बुद्धिग-
न संवहि जाड्या सुरुपेनें त्वां निरसावें ॥ ध्रु० ॥ तव ना
मीं मति ही माझी दृढतर तल्लिन झाली ॥ परब्रह्म अ
नंदित ऐशी मूर्ती म्यां हृदयीं धरीली ॥ नमना स्तवल-

---

१ मंदपणाला.

ना. २१



सदिं काया आपुली हि म्यां वाहीली ॥ उठाव ॥ स्कंधा
वरि वीणा वाहे ॥ वाहन मयुर तो आहे ॥ अज्ञांस-
ज्ञान नौका हे ॥ दीनास तसें तारावें ॥ १ ॥ योगिया-
गि तापसी ध्याती तुजलागीं अंबेमाते ॥ लीलेनें इ-
च्छामात्रें सृजिलें त्वां या विश्वातें ॥ कविव्यासादि
क जे त्यांसी दिधलें हो त्वां ज्ञानातें ॥ उठाव ॥ वा-
सुदेव नमितसे पाय ॥ मागतो चरणिं नित ठाय ॥
ह्मणे अर्भकास जशि माय ॥ तैसे परि मज त्तारावें
॥ २ ॥ हे ब्रह्मकन्यके माते सत्वरि तूं रंगणिं यावें ॥
मद्बुद्धिगत सर्व हि जाड्या सुरूपेनें त्वां निरसावें ॥ ॥

श्लोक

ओ कन्ये प्रकटोनि शीघ्र निरसीं माझ्या क्षेता लौकरी ॥
तूझेवीण न अन्य कोणि मजला ह्या दास पायांवरी ॥
झालासे अति दीन लीन ह्मणुनी यावें क्षणाभीतरीं ॥
दीप्तिज्ञान प्रकाशवोनि हृदयीं माधुर्य दे वैखरी ॥ १ ॥

( सरस्वती मोठ्या आनंदानें सुप्रसन्न होत्साती सभास्थानीं प्राप्त होऊन सूत्रधारास त्याचे इष्ट वर देऊन संतुष्ट करिती झाली. )

साकी.

निजभक्ताची स्तुति ऐकुनियां ब्रह्मकुमरि ती आली ॥
इच्छित सर्व हि पुरवुनि मस्तकीं निज कर ठेविती झाली ॥ १ ॥

---

१ ब्रह्मकुमरी. २ दुःखास. ३ नाचेला.

( सरस्वतीनें सूत्रधाराचे मस्तकीं रुपा हस्त ठेवून स्वस्थानीं गमन करिती झाली. )

**नट** - वेल् सूत्रधार, होगया तुमारा नाटक. अब हमको और ये सब् सभाजनको आप आपने घर जानेके वास्ते परवानगी छे ना? के अजू नाटक थवानुं छे? बोला लवकर.

**सूत्रधार** - अरे नटा, तूं ह्या अनेक भाषा एकाच समयीं बोलतोस. केवढें हें तुझें ज्ञान बरें! असो, नाटकतर अद्याप पुढेंच आहे. हें मंगलाचरण मात्र झालें, यांत जगन्नियंत्या परमेश्वराचें स्तवन आणि श्रीगजाननाचें व सरस्वतीचें मंगल करून त्यांज पासून वर प्राप्ति करून घेतली. आतां सर्व सभाजनांची प्रार्थना करून, पात्रांची योजना अति सत्वर कर.

**नट** - ( सभाजनांसन्मुख मोठ्या थाटानें उभा राहून ह्मणतो) महाराज, आतां सूत्रधाराचे बुद्धीचे ठिकाणीं जें कांहीं जाड्य होतें तें सरस्वती वरदें करून नाशाप्रत पावून केवळ चकमकी सारखी त्याची बुद्धि तीव्र झाली आहे. आतां पुढें अनेक रसांनीं युक्त असा खेळ तुह्मांपुढें होणार. तर रुपाकरून निद्रारूपी जाड्य जें चक्षूंवर आलेलें असेल तें तपकिलीची योजना करून नाशाप्रत पाववून निद्रा, आलस्य दूर करून सावधानतेनें खेळ पाहण्याकडे अवधान द्यावें. ( याप्रमाणें नट स-

भाजनांची प्रार्थना करीत आहे तों पडद्यापलीकडे "निगा-कीजे महाराज" असा शब्द होतो.)

## प्रवेश २ रा.

### स्थल .... वज्रबाहुराजाचा दरबार.

### पात्रें.

चोपदार, वज्रबाहु, प्रधान, सेनापति, सुकेशादासी आणि भानदत्त-नामक राज वैद्य.

**चोपदार**- (पुढें सभेंत येऊन.) आस्ते कदम निगापेश निगानिगाकीजे महाराज. (याप्रमाणें ललकारणी करीत आहे, तों वज्रबाहु राजा प्रवेश करितो.)

**वज्रबाहु**- (सभेंत येतांच सर्व सभाजन खडी ताजीम देतात. राजा सिंहासनारूढ होतांच प्रधान, सेनापति इत्यादि सर्व सभाजन अनुक्रमें राजपदातें वंदन करून आपआपले दर्जाप्रमाणें मिसलीनें बसल्या नंतर प्रधानास प्रश्न करितो) सर्वराज्याचा बंदोबस्त कसा काय ठेविला आहे.?

**प्रधान**- महाराज, ज्याप्रमाणें मुखामध्यें जिव्हेचें संरक्षण प्राणिमात्र करितात, तद्वत् राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला आहे. कोणतेही गोष्टीविषयीं प्रजाजनांस तिलप्रायही दुःख नाहीं. अनृणी, अप्रवासी अशीसर्व प्रजा सदोदित महाराजांचें यश आणि कीर्ति-

वर्णन करून कल्याणच इच्छित आहे.

वज्रबाहु- प्रधानजी, पहाकीं, मी फक्त गादीचा मात्र अधिकारी असून सर्व राज्याचा भार तुमच्यावर ठेविला आहे. आह्मी राजेलोक कसे आहों.

### श्लोक.

चारैः पश्यंति राजानो वेदैः पश्यंति वाडवाः ॥
गंधेन गावः पश्यंति चक्षुभ्यामितरे जनाः॥१॥

आह्मी केवळ चारजनांचे द्वारें अवलोकन करणारे आहों. तर प्रजा जनांस जेथें ज्या ह्मणून कांहीं पीडा असतील त्यास्थळीं तुह्मी स्वतः गमन करून उत्तमप्रकारें बंदोबस्त करितां कीं? पर्जन्य यथाकाळीं वर्षाव करितो कीं? प्रजाजन यथा नीतीनें वर्तणूक करितात कीं? त्यांचें पाळून पदाधिकारी न्यायास अनुसरून करितात ना? ऋषि, तापसी, तीर्थ तटाकीं त्याप्रमाणेंच वनोपवनीं गिरिकंदरीं तपश्चर्या व ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण स्नानसंध्यादिक षट्कर्माचरण करणारे यांजला वेळचे वेळीं शिधासामग्री इत्यादि देऊन त्यांची तपश्चर्या निर्विघ्न चालण्याविषयीं वारंवार योजना करून बंदोबस्त ठेविला आहे कीं?

प्रधान- (राजपदानें वारंवार नमित होत्साता) महाराज, हें काय विचारणें, जे ऋषि, तापसी व ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण-

[stamp]

आहेत त्यांजला वेळोवेळीं शिधासामग्री व हवनीय द्रव्यादि सर्व तयारी प्रतिमासीं करून देत असतों आणि त्यांचे इच्छेप्रमाणें अनुकूल राहून महाराजांस पुत्ररत्न प्राप्त व्हावें, सत्कीर्ति आणि यश यांची वृद्धि व्हावी, असे आशीर्वाद ग्रहण करीत असतों.

वज्रबाहु– सेनापते, सर्व सैनिकजन कोणत्या रितीनें वर्तणूक करितात? नगराचाबंदोबस्त ठेवण्या करितां सैन्याची योजना कोणते प्रकारें केली आहे? प्रस्तुत कोणी मांडलिकां पैकीं मदोन्मत्त होऊन नियमित कालीं करभार देण्यास अनमान करीत नाहीं कीं?

सेनापति– राजाधिराज, ज्याप्रमाणें वेळोवेळीं मजला आज्ञा होते, तीस अनुसरून सैनिकजन वागतात. नगराचे बंदोबस्ता करितां अष्ट दिशांस कोट्यावधि सैन्य व शतशः उल्हाट यंत्रें यांची योजना केली आहे. मांडलिकां मध्यें प्रस्तुत कोणीही उन्मत्त नसून नियमित कालीं करभार येत असतो.

श्लोक.

असिलुतारवेटकबाणभाते॥ दुर्गंउभे घेउनियांसदांते॥
अशापरीरक्षितिदुर्गजेते॥ आज्ञामृताभूपतिसेवितीते॥ १॥

चोपदार– राजाधिराज वज्रबाहुराजे महाराज (असा शब्द करितो)

वज्रबाहु- कंचुकी, किमर्थ शब्द केलास.?

चोपदार- द्वाराचे ठायीं पांडे व सुकेशा दासी प्राप्त झाली आहे.

पांडे - दिनपिछला दोघडी रह्या महाराज (अशी वर्दी देऊन जातो.)

दासी- राज पदातें वंदन करितें.

वज्र०- हे दासी, कल्याण असो. आज अकालीं सभास्थानीं प्राप्त होण्याचें काय कारण बरें.

दासी - महाराज, सुमती बाईसाहेबांस दोन मास पूर्ण झाले आहेत. आज दोनप्रहर पासून तब्वेत फारच हैराण आहे आणि स्तब्ध आहेत. भाषण सुद्धां करीत नाहींत. हें कळविण्या करितां आलें होतें.

वज्र०-बरें, तूं सत्वर गमन कर. मी वैद्यास प्रेषित करून देतों. (भालदारास आज्ञा करितो.) सत्वर जा आणि राजवैद्य यांजला पहिले महालांत तब्येत पाहण्या करितां जाण्या विषयीं माझी आज्ञा कळीव. (दासी व भालदार निघून जातात. भानदत्त नामक राज वैद्य प्रवेश करितो.)

भानदत्त- हे दशार्णदेशाधिपते, स्वस्त्यस्तु भद्रमस्तु. सकल मनेप्सित कामना सिद्धि रस्तु (असा आशीर्वाद देऊन बसतो.)

साकी.

हेकुपते त्वां किमर्थ मजला सांगें पाचारीलें. ॥
सुमती आहे गर्भवती तिसि अन्य न कांहीं झालें ॥१॥

[library stamp]

खेदनमानींमनस्थिरवी दोहदती चेतूंपुरवीं ॥ ध्रु० ॥

हे राजा, चिंतित होण्याचें कारण नाहीं. सुमती दोहदवती आहे. ईषन्मात्र पित्तक्षोभानें स्थिर जाहली होती. तिचे दोहद पूर्ण कर. मी स्वस्थानाप्रत गमन करितो. (वैद्य निघून जातो.)

वज्रबाहु– हे प्रधान, सेनापती, कचेरी बरखास्त करावी. मी प्राणप्रिये कडे गमन करून तिचे दोहद असतील ते विचारून पूर्ण करितों (राजा उठून निघून जातो. कचेरी बरखास्त होते.)

---

## प्रवेश ३ रा.

स्थल . . . सुमतीचा रंगमहाल.

### पात्रें.

वज्रबाहु, सुमती, सुकेशा दासी.

वज्र० (सुमतीचे महालांत येतो आणि पाहतो तों सुमती मंचकावर निद्रिस्थ असून दासी व्यजनानें वारा घालींत आहे)

दासी– (स्वांरी आली असें पाहून सुमतीस जागृत करिते)

सुमती– (जागृत होऊन, पतीस सन्मुख अवलोकन करून, नमन करिते आणि लज्जीकृत होत्साती एके बाजूस उभी राहते.)

वज्रबाहु- ( मंचकावर बसून आपणाशींच ) कायतरी हा स्त्रीजा तीचा स्वभाव, हा रंगमहाल ह्मणजे एकांत स्थल होय. या ठिकाणीं फक्तसखी, मी दोघेंच असतां लज्जाती क-शाची बरें? मोठ्यानें प्राणप्रिये सन्निध ये.

सुमती- आहें ही सन्निधच आहें, तशांतून मीच ह्मणजे सन्निध आलें पाहिजे असें नाहीं. आणखी का सवती जवळ ये-णाऱ्या कमी का आहेत? तोंड देखलं बोलणं, जवळ ये जवळये हीं अक्षरें गळ्यावरचीं आहेत, हृदयांतून तर सर्व प्रीति तिकडे. मी येथेंच बरी आहे. काय आ-ज्ञा असेल ती व्हावी, ह्मणजे झालें.

वज्र०- हे गजगामिने, शशभानने, आणखी जरी कितीही अस-ल्या तथापि माझें प्रीतिपात्र व पट्टाभिषिक्त तर तूंचना? अन्य करण्याचेकारण इतकेंच कीं, या देहाला जरा प्राप्त होण्याचा समय आला, एतावत्काल पर्यंत तुझ्या ठि-काणीं पुत्रोत्पत्ति न झाल्या कारणानें तसा प्रसंग करणें भाग पडलें, परंतु ईश्वरी लीला अगाध आहे, तो ही यो-ग इकडेच येण्याचा ओघ आला आहे. आतां कुत्सित बोलणीं पुरे कर, आणि या अंकावर बैस.

सुमती- पुरे पुरे, मेलं भलतंच काय बोलावं तरी. योग कसला आणि ओघ कसला. मी बाई भोळी आहें, मलाकिनाहीं यांत कांहि समजत नाहीं.

वज्रबाहु- असो, समजो किंवा न समजो, परंतु मी सभास्थानीं बसून राज्यकारभार पहात असतां सुकेशा दासीनें कांहीं तुझ्या प्रकृतीला विकृति होऊन शरीराची आकृति नित्यक्रमाहून भिन्न झाली असें कळविलें, त्याबरोबर कचेरी बरखास्त करून आलों. तर प्रेमपुरःसर संन्निध ये बरें.

सुमती- माझ्या सारख्या वज्रदेही प्राण्याला होणारतें काय? मी मेलीं खाण्याला काळ आणि धरणीला भाररूपी आहे. ज्या कारणा निमित्य आणलेल्या असतील तिकडल्या नाजुक प्रकृति असायच्या. मला दोन प्रहरा उपरांत पित्ताचे योगानें किंचित् स्थिरता नव्हती, आतां मी चांगली खणखणीत आहें. इतक्या संकटानं येण्याचं कांहीं कारण नव्हतं, तशांत पाठी मागून तिकडलं ही बोलावणं येण्याची धास्ती असेलच. झाला माझा समाचार घेऊन, आतां जाणें असलं तर (इतकें बोलून उगीच राहाते)

वज्र०- प्रियसखे, कोकिलरवे, इंदुवदने, तूं दूर उभी असल्यानें मला फार श्रम होत आहेत, तर या अर्धासनारूढ हो, आणि गिरिजेच्या योगानें जसा शंकरांक शोभतो तद्वत् हा अंक सुशोभित कर १ सुमतीस हातीं धरून अंकीवर बसवितो.

१ मांडीवर.

आर्या.

झालाशुष्कमुखेंदू पांडुरताहीशरीरिंरमताहे ॥
नीलाननयुग्मस्तनमांसलऐसेमलाचगमताहे ॥१॥
दोहदइच्छासांगेंपुरविनजी मानसींतुझ्या आली ॥
देतोंप्रेषितकरुनी सांगायासेनिकांसही आली ॥२॥
जीमानसिंतवइच्छा दुर्मिल तरिमी स्वयेंच जाईन॥
खगनगपातालादिकधुंडाळुनियांक्षणांतयेईन॥३॥

प्राणसखे, तुझा मुखेंदु शुष्क दिसत आहे. स्तन युग्मा चीनीलवर्ण अशीं चुचुकें झालीं आहेत, जे कांहीं तुला दोहद होत असतील ते कथन कर. पुरविण्याकरितां हा वज्रबाहु सिद्ध आहे.

सुमती- प्राणनाथ हें काय मेलं विचारणं तें भलतंच काहितरी, दोहद कसले नि काय कसलं. मला बाई लाजवाटते.

वज्रबाहु- (सुमतीचें मुख कुरवाळून ह्मणतो) हे चारुगात्रे सुमती, लज्जेचा परित्याग करून इच्छा असेल ती त्वां अवश्य कथन करावी आणि मी ती पूर्ण करावी. तसें नसलें तर गर्भास अव्यंगता येते, याविषयीं प्रमाण.

श्लोक.

इच्छीत दोहद तिला न देतां॥ वातप्रकोपें तिसि होत से व्यथा॥
तो गर्भ अव्यंग ह्मणून राहे॥ निदान हें वैद्यकिं जाण आहे॥१॥

सुमती- (अत्यंत लज्जित नतमुखी) हे प्राणेश्वरा, प्रस्तुत

वसंत ऋतूमध्यें गरमी फारच होत आहे, याकरितां सात वे मजल्यावर आदर्शयुक्त बंगल्यांत सुशीतल चंद्र छायेंत क्रीडा करावी, शतशः ब्राह्मणांस अन्न वस्त्र द्यावें, अतिथी अभ्यागत यांची इच्छा पूर्ण करावी, त्याप्रमाणेंच श्रीपार्वती कांतांचीं जीं ह्मणून व्रतें असतील तीं करावी आणि सत्संगतींत काळ घालवावा अशी इच्छा आहे.

## आर्या.

कथितें गुजप्रभुऐकें ॥ वाटेसत्संगतीधरावी हो ॥
उभवुनिकीर्तियशध्वज ॥ बाहुबलेंहीधरावरावीहो ॥ १ ॥
(यावरून खचित पुत्र गर्भ असावा, असें राजानें अनुमान केलें.)

## साकी.

प्राणवल्लभा सप्त तालकीं शितकर ऐशा भांत ॥
तुह्मासहित मीं करीन क्रीडा इच्छा हे किं मनांत ॥ १ ॥
ऋषीतापसीब्रह्मनिष्ठयां पुरवावा जो हेवा ॥
गौरीशाचीं व्रतें आचरिन करूनीलवपदसेवा ॥ २ ॥

वज्रबाहु- (याप्रमाणें सुमतीचें भाषण श्रवण करून परम आनंदित होत्साता दासी सुकेशा इजला गच्चीवर उत्तमप्रकारची आरास करण्यास आज्ञा करिता झाला.)

दासी- आज्ञेप्रमाणें सर्व सिद्धता आहे (असें सांगतांच उभयतांही गच्चीवर जातात)

## प्रवेश ४ था.

### स्थल .... राजवाड्याची गच्ची.

वज्रबाहु व सुमती.

**वज्रबाहु**- ( सुमतीचे कंठामध्यें हस्त घालून ) चारुगात्रे, पाहिलेंसना, आज पौर्णिमेचा पूर्ण चंद्रोदय झालेला असून वायु कसा मंद मंद आणि सुगंध युक्त येत आहे तो.

**सुमती**- प्राणेश्वरा, वायु तर उत्तम वाहत आहे व शरीरास आनंद देत आहे. परंतु यामध्यें अनेक प्रकारचे सुगंध येत आहेत हे कशाचे बरें ?

**वज्र०**- प्रिये, आसमंतात् भागीं जागोजाग, जाई, जुई, मालती, चंपक, मदनबाण, सेवंती, गुलाब, मोगरा, गुलछबु, दवणा, चमेली इत्यादि फुलझाडें सदा प्रफुल्लित अशीं ठेविलेलीं आहेत. त्या पुष्पांवरून जो वायु वाहतो तो त्या अनेक पुष्पांचा सुवास तुज करितांच घेऊन येत आहे.

**सुमती**- प्राणनाथ, हा जो तुमचा हस्त माझे कंठाचे ठायीं आहे, याचाही भार मला सहन होत नाहीं. सर्व शरीर जड झाल्या सारखें वाटतें आणि मी हे सात जिने चढून आल्याच्या योगानें चरण भरितसे होऊन फार जड्त्व पावले आहेत. तर या हिरेजडित सिंहासनावर स्थिर होऊन सारिपाटादिक क्रीडा करावी अशी इच्छा आहे.

वज्रबाहु- फारउत्तम आहे, ( ह्मणून उभयतांही बसतात; आणि सारिपाटादिक खेळ खेळतात. )

( याप्रमाणें राजा सुमतीचे इच्छेस अनुसरून दोहद पुरविता झाला आणि पुरोहिताचे अनुमतें पुंसवानादि कृत्यें करण्याची सिद्धता करविण्याविषयीं प्रधानास आज्ञा करिता झाला. )

---

## प्रवेश ५वा.

### स्थल.... चंद्रकलेचा महाल.

### पात्रें

चंद्रकला, कुमुदिनी, सुकेशादासी व भान्या(चंद्रकलेचा सेवक.)

चंद्रकला- कोण आहेरे सेवक अथवा दासी कुणी आहां कारे बाहेर ?

भान्या- जी बाईसाहेब, मी भान्या हजर आहें दासी पैकीं वेलदोडी आजारी आहे, चमकी शिवूनयेशी आहे, दोघी जामदारखान्यांत गेल्या आहेत काय आज्ञा असल्यास मला व्हावी.

चंद्रकला- अरे आज वाडयापुढें अनेक मंगलवाद्यें वाजत आहेत. प्रधान, सेनापती इत्यादि सर्व गडबडींत आहेत, आज चार दिवसांत स्वारिचं येणं इकडे झालं नाहीं. अशी गडबडतरी काय आहेरे ?

म्यान्या- या सर्व गडबडीचें मूळ सुमतीबाईसाहेबां निमित्त आहे, असें वाटतें. तिकडील दासी सुकेशा निष्कपटी आहे, तिला विचारल्यानें सर्व कळेल. आज्ञा असल्यास पाचारण करितों.

चंद्रकला- बरें म्यान्या आज तयारी कसली चालली आहे इत्यादि सर्व माहिती कळणं जरूर आहे, याजकरितां जा बरें सुकेशेला बलावून आण.

म्यान्या- ( आज्ञे प्रमाणें जातो आणि सुकेशा व आपण उभयतां प्रवेश करितात. )

सुकेशा- बाईसाहेब आज्ञे प्रमाणें मी हजर आहें ( असें ह्मणून वंदन करिते. )

चंद्रकला- कोण ती सुकेशा का? आग बरं तुला येईनसं वाटलं मी ह्मटलं बलावणं पाठविलेलं सुद्धा परतून लावते कीं काय कोण जाणे.

सुकेशा- बाईसाहेब, आह्मी गरीब चाकर माणसें आपल्या ताटां खालचीं हुकमाचीं बाबेदार असतां आज हें बोलणं काय?

चंद्रकला- आग त्या साऱ्या गोष्टी खऱ्या परंतु तूं वडील घरची न जाणो तुला तुझे यजमानिनीची शिकवणी कशी असेल, कशी नसेल, ह्मणून ह्मटलं. असो, कांग तुझी यजमानीन सुखरूप आहे ना?

सुकेशा- होय बाईसाहेब, खुशाल आहेत. आज तीन दिवसांपूर्वी दोन प्रहरी किंचित् प्रकृति बिघडली होती; या निमित्त सरकार स्वारीचें ही येणें तिकडे झालें होतें.

चंद्रकला- स्वारी तिकडे आल्यावर कितीवेळ होती आणि काय काय कृत्यें झालीं बरें ?

सुकेशा- सुमतीबाई गरोदर आहेत, त्यांचे डोहळे पुरवून झाले; आतां पुढें पुंसवनादि संस्कार होण्याची सिद्धता चालली आहे. स्वारीचा मुक्काम एक दिवस तेथें होता.

चंद्रकला- बरें बाई तिचे पोटीं तरी पुत्र होऊ ह्मणजे झालं, जातर आतां सुमती तुला उशीर लागला तर कोपाविष्ट होईल. प्रकृतीला नीट जपत जा ह्मणून माझा निरोप सांग बरं, विसरू नको.

सुकेशा- ( वंदन करून निरोप घेऊन निघून जाते. )

चंद्रकला- ( खिन्नमानस होत्साती स्तब्ध बसते. )

भान्या- बाईसाहेब, आज सुकेशा येऊन गेल्यापासून आपला मुखचंद्र म्लान दिसतो आणि चित्त उदास असे भासतें. अशा प्रकारें चिंतित होण्याचें कारण तरी काय झालें ?

चंद्रकला- भान्या कायरे सांगूं जी गोष्ट न घडणारी ती घडून आली. सुमती गरोदर आहे, त्यांत सर्व प्रकारें मुळापासून ती घरांत आवडती असून आतां तर या कारणानें प्रीतीचें केवळ स्थानच झालें आहे. इतकें ही असू-

न पुढें जर तिजला पुत्रच झाला तर सर्व प्रकारें वर्च-स्व तिचें होऊन आमची दशा कशी होणार ? याज-करितां सत्वर जा आणि कुमुदिनीला माझा निरोप कळीव कीं, कांहीं गूढ विचारामध्यें तुझी अनुमती घेणें आहे यास्तव सत्वर येऊन जा.

साकी.

कुमुदिनिमंदिरीं जाऊनि सांगे चंद्रकलापाचारी ॥
अनुमति तुमची घेणें आहे संप्रति गूढविचारीं ॥ १ ॥

ओंवी.

अल्पह्मणूनये कृशान ॥ शत्रू नह्मणावा कदापि लहान ॥
दुःस्वप्न पडतां विष्णुस्मरण ॥ करण्या विलंब न कीजे ॥ १ ॥

भान्या- ( आज्ञे प्रमाणें कुमुदिनीचे तिसरे महालीं जाऊन निरोप कळवितो आणि कुमुदिनी सह प्रवेश करितो. )

कुमुदिनी- ( श्रेष्ठ मानानें चंद्रकलेस वंदन करून बसते. )

चंद्रकला- अग कुमुदिनी, तुझा हा अज्ञान स्वभाव जाणार तरी कधी? अग हाल्लीं गडबड चालली आहे काय आणि वर्तमान काय. याचा विचार तरी केलास का दिवसभर खेळाकडे ध्यान.

कुमुदिनी- बाई, विचार तो कसला करावयाचा पहिल्यावाड्याकडे दोहद पुरविण्याचे थाट झालें. आतां पुढील विधी होण्याची तयारी आहे.

चंद्रकला- अग, ईश्वरी संकेतानें जर तिकडे पुत्रच झाला तर आपली ( तुझी व माझी ) कायग दशा होणार? घालतील तें अन्न खाऊन आयुष्य क्रमण करीत बसावें लागणार ना?

कुमुदिनी- हों, तें खरेंच प्रालब्धापुढें कोणाचा इलाज आहे का मग व्यर्थ खेद तरी कशाकरितां मानावा?

चंद्रकला- तसें नव्हे विषवल्ली दिवसे दिवस जर वाढत आहे तर त्यावर पुढें विषफळें येणार या करितां तीच जर मुळांतून उपटून टाकिली तर फळें येतील का?

कुमुदिनी- मूळच नाहींसें झालें तर फळें येण्याविषयीं शंकाच नको.

चंद्रकला- हें खरें ना? तर मग सुमती विषयींच जर तशी योजना झाली तर पुढें पुत्र होईल ही भ्रांति राहिलीका?

कुमुदिनी- तसें झालें तर भ्रांति नाहीं हें उघडच आहे. परंतु तो योग घडून येणें ह्मणजे दुरापस्थ गोष्ट आहे.

चंद्रकला ओंव्या.

भोजनाचेनिमित्तें करून॥ पाचारावीसुमतीजाण॥
भोजनींविषप्रेरणाकरून॥विषवल्लीउपटूनटाकावी॥१॥
माझाविचारऐसाचजाण॥ यास्तवकथितेंसेवकालागुन॥
प्राणपतीसकळवींजाऊन॥दर्शनकांक्षाआह्माअसे॥२॥

( याप्रमाणें सेवकास राजाकडे जाऊन चंद्रकला वकुमुदिनी

उभयतां दर्शनेच्छेनें येत असल्याचें कळविण्याविष यीं आज्ञा होतांच सेवक नियतो आणि त्या मागून दोघीही उठतात.)

## प्रवेश ६ वा.

### स्थल .... वज्रबाहुचा महाल.

### पात्रें.

वज्रबाहु, भान्या, चंद्रकला, कुमुदिनी व सुमती.

भान्या- (राजमहालीं जाऊन राजपदातें वंदन करून ह्मणतो) महाराज, चंद्रकला बाईसाहेब, धाकट्या बाईसाहेब कुमुदिनी यां सहित दर्शनाकरितां येत आहेत.

वज्रबाहु- कोण? माझ्या प्रियकर स्त्रिया प्राप्त होत आहेत काय? येऊंदे.

राजपत्न्या- दोघीही एकदांच येऊन नमस्कार करून उभ्या राहतात.

राजा- कां आज यावेळीं उभयतांचें आगमन किंनिमित्त बरें? हां समजलों आज चार दिवस तिकडे येणें झालें नाहीं. यामुळेंच असेल.

राजपत्न्या- भलतंच कांहीं तरी बोलावयाचं. प्रस्तुत आनंद काय चालला आहे, हा समय येणं न झालं ह्मणून रुसण्याचा आहे कीं काय? "परंतु मनीं वसे तें

स्वप्नीं दिसे ११.

## आर्या.

सुमती आह्मानदुजी,प्रियकरभगिनीसमान मानुतिला ॥
ईशकृपेनें व्हावें,मदनासम पुत्ररत्न प्रासहिला ॥ १ ॥

प्राणेश्वरा, सुमती केवळ आह्मास भगिनी समान आहे.परमेश्वर कृपेनें तिचे उदरीं सुपुत्र रत्न प्राप्त होऊन,राजा निपुत्रिक असाजो कलंक आहे तो लयाप्रत जाऊ.हीच आमची इच्छा आहे. आमचे मनांत तिलमात्रही तिज विषयीं वैशम्य नाहीं.

राजा- (हीं भाषणें श्रवण करून अत्यानंदानें ह्मणतो.)

## श्लोक.

सापत्नभावत्यजुनीतुह्मिऐक्यव्हावें ॥
त्याकौतुकासहि सुखें,नयनीं पहावें ॥
आपन्नसत्वसुमतीस,तुह्मी जपावें ॥
जेणेंजगींसुकृतिचारवख्यातिपावे ॥१॥

तुह्मी तिघींनींही एकमेकीं विषयीं स्पर्धा न ठेवितां एकचित्तें वागावें आणि तुमचे ऐक्यत्वाचा सुध्वनि ध्वनित व्हावा, असेंच मीही इच्छित आहें.

राजपत्न्या- प्राणेश्वरा, आह्मी आपले इच्छे बाहेर आहों कीं काय? सदोदित आमचे वर्तन निष्कपट पणाचेंच आहे कपटतें कोणा बरोबर करायचें दांत ही आपले-

आणि ओठही आपले परंतु इतकें थाट झाले, यांत एक शब्दानें तरी या दासीनां विचारणं झालं का.?

राजा- विचारण्याचा समय तो पुढेंच आहे.

राजपत्न्या- त्यासाऱ्या गोष्टी खऱ्या परंतु आह्मीच वडिलार्जित चालत आलेली रीत श्रवण केली होती ती आज्ञा असेल तर निवेदन करूं.

राजा- कां कांहीं कुलाचार विस्मृतीनें राहिला असे असल्यास तें सांगणें अघश्य आहे.

राजपत्न्या- काल दुसरे महालांत हळदी कुंकवा करितां पुष्कळ विप्र स्त्रिया आलेल्या होत्या. त्यांत पुरोहिताची स्त्री सगुणाबाईही आली होती. तिणें हे पुंसवनादि संस्कार होणार ह्मणून सांगितलें आणि असेंही बोलली कीं, संस्कार होण्या पूर्वी कुलदेवतेच्या नांवानें ब्राह्मण सुवासिनी यांस अन्न संतर्पण करून घरचें डोहळेंजेवण होण्याची चाल आहे. तर प्राणनाथया विषयीं शोधकरून तो बेत आधी जाहलापाहिजे.

राजा- (त्यांचें कपट न जाणून निष्कपटपणानें ह्मणतो) यांत शोधतो काय करणें आहे.? ब्राह्मणभोजनादिक हें धर्मकृत्य चालूच आहे. आतां घरचें डोहाळेजेवण झालें पाहिजे असें असेल तर उदयिक तयारी करावी ह्मणजे झालें.

राजपत्न्या- कोण आहेरे ? सेवका सत्वर जा आणि सुमती बाई- स आमचें नमन कथन करून प्राणनाथ पाचारणक- रीत आहेत असें कळीव. ( सेवक जाऊन सुमतीस सांगतो. व सुमती पतीची आज्ञा कळतांच प्राप्त होते.)

सुमती- ( राजपत्नीतें अभिवंदन करून ) कां बाई चंद्रकले, कां कुमुदिनी, कुशळ आहांना ?

कु०वच०- बाई हें काय विचारवें आज आमचे आनंदास पारावार नाहीं, परमेश्वरानें आनंदाचा दिवस दाखविला आहे, याहून खुशालीती ज्यास्त कोणती ? चाललें सोहळ्यांत जे कांहीं न्यून असे आह्मी ऐकिलें तेसां गतो.

श्लोक.

आधीदोहदभोजनासिघरच्यासंपादुनीयांपुढें ॥
व्हावेसर्वविधीअशीरुढिअसेपूर्विलिले यापुढें ॥
आतांमीकरितेंतुह्माविनवणीऐकाअहोसाजणी ॥
शाकाषड्रसपाकवाढिन करींरत्नाचियाभाजनीं ॥ १ ॥

ओंवी.

प्रधानादिकसैनिकजन ॥ आणिनगरवासीजेकुलीन ॥
त्यांच्याकुलस्त्रियापाचारून ॥ ओंटीतुमचीभरवीनमी ॥ १ ॥

सुमतीबाई तुमची तर होस होतच आहे परंतु आम- चे मनातील ही जर हेतू तुह्मीन पुरवाल तर तुमच्या-

वांचून कोणबरें पुरवील ? यास्तव आह्मी दोघी-
ही विनंती करितों कीं, प्रधानादिक सरदारांच्यास्त्रि
या व नगरांतील प्रौढ कुलीन जनांचा स्त्रिया या
सहित पंक्तीस बसून आपण रत्नतार्टी भोजन क
रावें. भोजनोत्तर सर्व सुवासिनी स्त्रिया यांजला मं
गल कारक हरिद्रा कुंकुम व वायनें देऊन ओटी भर-
ण्याचा विधि रूढीप्रमाणें झाला ह्मणजेनीट होईल.

**सुमती-** ( राजाकडे बोट दारववून ) अगतें सर्व खरं परंतु तिकडील आज्ञेशिवाय माझ्यानं याचं उत्तर मुळींच सांगवत नाहीं.

**वज्रबाहु-** प्राणप्रिये सुमती, त्या प्रेमपुरःसर ऐक्य भावनेने कृत्य करणार तशांत पूर्वापार रूढीही आहे. त्याठिकाणीं अनमान करणें उपयोगी नाहीं.

**सुमती-** मी आज्ञे बाहेर का आहें ?

**वज्रबाहु-** हे चारुगात्रे, चंद्रकले, हे गजगामिने कुमुदिनी उदयीक सर्व तयारी करावी ( अशी आज्ञाहोतांच दोघीहि निघून दुसरे महालीं जातात.

---

## प्रवेश ७ वा.

### स्थल .... चंद्रकलेचें मंदीर.

### पात्रें.

चंद्रकला, कुमुदिनी, सेवक, पुरोहित, सगुणाबाई, सुमती, नागरिकजनांच्या स्त्रिया, दरकदार वसरदार यांच्या स्त्रिया.

**चंद्रकला**- कां कुमुदिनी, बहुतकरून कार्य साधलं कीं नाहीं.?

**कुमुदिनी**- बाई, तुमची ह्मणून धन्य असो एकुण मोठया थाटानें घाट रचलात खरा.

**चंद्रकला**- असो, आतां बोलण्यात वेळ घालवून उपयोगी नाहीं. पुढील सर्व तयारी होऊन मनोगत सिद्धीस गेलें पाहिजे.

## आर्या.

चंद्रकला आज्ञापी, निजदासा जा पुरोहिता आणी ॥
वेगें त्यांचे स्त्रीला, पाचारुनि तूं समागमें आणी ॥ १ ॥

अरे सेवका, सत्वर जाऊन पुरोहित व त्यांची स्त्री सगुणाबाई यांजला घेऊन ये बरें. ( आज्ञे प्रमाणें सेवक जाऊन पुरोहित व सगुणाबाई यांस घेऊन येतो)

**पुरोहित**- ( आशीर्वाद करून ) कां इतके गडबडीनें उभयतांस पाचारण करण्याचे कारण काय बरे?

**चंद्रकला**- अहो, कारण तें कसलं उदयींक सुमतीबाईनां डोहळे जेवण आणि कुलदेवतेचे नांवाने सुवासिनींच्या ओटया ही भरणें आहे तर येथें सर्व तयारी सेवक जनांकडून विधीपूर्वक तुह्मी करवावी आणि-

सगुणाबाई यांजला प्रधानादिक मंडळीच्या स्त्रियांस व नगरांतील सद्गृहस्थांच्या कुलस्त्रियांस निमंत्रण करण्याकरितां पाठविल्या पाहिजेत ना?

(पुरोहित सर्व तयारी करवितात. सगुणाबाई आमंत्रण करून येते) सूपकार पाकादिक सर्व सिद्धतेची वर्दी देतात.

सेवक - बाईसाहेब आज्ञेप्रमाणें मंडप सुशोभित करून पात्रें ठेविलीं आहेत. सर्व सिद्धता आहे.

चं० व कु०- (कांहीं सभ्य सरदारांच्या स्त्रियांसह सुमतीचे महालीं जाऊन मोठ्यासमारंभानें मंगलवाद्यें वाजत पायघड्यांवरून सुमतीस घेऊन येतात. चरणक्षालनादिक आटोपल्यानंतर भोजनस्थानीं येऊन मिसळीनें बसतात.)

## कटाव.

ऐसेंपरिच्या सुमतीला ॥ रिझवीती भोजनिं जीला ॥ १ ॥ रांगोळीचा थाट मजेचा ॥ लखलखाट बहु दाट दिव्यांचा ॥ मधें ठेविला पाट हिऱ्याचा ॥ सोसाट स्वादलो उदबत्तीचा ॥ पाट आणुनी मधें जलाचा ॥ घाट योजिला कारंजाचा ॥ दाटसडा बहु चंदनाचा ॥ परिमळ वाटे वरतीसाचा ॥ पाहूनि मोद मनिं झाला ॥ १ ॥ ऐसेप० ॥ बारापरीच्या कोशिंबीरी ॥ लोणच्यांचिती ओळ दूसरी ॥ आम्रफळें नींपाचित खारी ॥ पिवळ्या खिरण्यामधें मोहरी ॥ आं

ष्टलिंबू वाढिति नारी ॥ मालुलिंग आणीक कर्मरीं ॥ वांगिं बटाटे दुजी पडवळीं ॥ दूधभोपळा कडू कारलीं ॥ लाल भोपळा हिर वीं केळीं ॥ सुरणदोडके आणिक चवळी ॥ मेथिमोगरी घड घोसाळीं ॥ वांगीं काळीं दुजीं डोरलीं ॥ शेगट शेंगा मंद तोंडली ॥ वाढिती बहु शाकेला ॥ २ ॥ ऐसेप० ॥ पक्वान्नें बहु सुढाळ सुरसें ॥ जिलबी मांडे लाडु चसरसे ॥ तप्तपोळिवर तूप फारसें ॥ वक्र करंजा आणि अनरसे ॥ मांड्यासाठीं पयतें निरसें ॥ सिताएलची मिश्रितऐसें ॥ घिवर पांढरा तोह्री विलसे ॥ लाडु बुंदिचे मोति चुराचें ॥ आणिक मांडे शकूपयाचे ॥ पीतवर्णश्रीखंड दह्याचें ॥ पेढे खव्याचे ॥ लाडु मुगाचे ॥ भात वाढिती चार परीचे ॥ शीघ्रतसवरि आज्य धेनुचें ॥ वरान्न पिवळें वाढितिसाचें ॥ वाढिती कढी-आमटीला ॥ ३ ॥ ऐसेपरिस्या सुमतीला ॥ रिझवीती भोजनीं जीला ॥ ३ ॥

( याप्रमाणें भोजनाचा थाट चालला असतां )

चंद्रकला- सुमतीबाई. पात्रावरील पदार्थांतून जर खावववत नसेल तर मोहन भोग व बासुंदी पुरी हे पदार्थ उत्तमच करविले आहेत. त्यांतून जे इच्छेस येइल ते खाऊन पहा.

( असे ह्मणून अंतर्गृहांत जाते आणि विषमिश्रित पदार्थ करून ठेविलेले आणून सुमतीस वाढिते. )

सुमती:-(त्यांतील किंचित् किंचित् भक्षण करिते इतक्यांत स
र्वांची भोजनें झालीं असें पाहून उठतात. सुमतीस
किंचित् हृदयभागीं जळजळाट वाटतो.व मस्तक जड
होतें )

कुमुदिनी- ( सर्वांकडून सुमतीची ओटी भरविते व आप
ण त्या सर्व स्त्रियांच्या ओट्या भरिते. सर्व जणीं आ
ज्ञा घेऊन निघून जातात. इतक्यांत सुमती फार घा-
बरी झाली हें पाहून ह्मणतात.

ओंव्या.

दोघिही वदती त्या सुमतीला ॥ भोजना उशीर आज झाला॥
तेणें पित्तक्षोभ होऊन गेला॥ मस्तकीं ऐसें वाटतें ॥ १ ॥
आतां आह्मी करितों त्वरा ॥ पोंचवितो तुमच्या मंदिरा ॥
दोन घटिका घेतां निद्रा ॥ सावध क्षणांत व्हाल तुह्मी॥ २ ॥

सुमती- अग तें सर्व खरं माझं मस्तक फार जड झालं
आहे आणि हृदय कापल्या सारखें होत आहे. मला
सत्वर जाऊं दे कशी.


(चंद्रकला व कुमुदिनी उभयतां मिळून सुमतीला तिचे महालीं
पोंचवितात. )

चंद्रकला- कां कुमुदिनी, धारल्या प्रमाणें घाट सिद्धीस गेला
कीं नाहीं.? आतां दोन प्रहरांत निकाल होईल.
आज मनोगत साधलें येणेकरून मोठा आनंदा-

चा दिवस असें मानलें पाहिजे. आतां तिसरे मजल्यावर हिरवे बंगल्यांत जाऊं या आणि नाटांनीं खेळत बसूं ह्मणजे झालं.

कुमुदिनी- फार उत्तम आहे ( ह्मणून दोघीही निघून जातात.)




अरण्य
प्रधानसुमतीचा त्यागकरून रथ घेऊन जातो.
सुमती.
बालक.

# भद्रायुसत्व दर्शन नाटक.

## अंक २ रा

### पात्रें

सूत्रधार ............... नाटककर्ता
नट ................. त्याचासोबती
वज्रबाहु ............. दशार्णदेशाधिपति
सुमती ............... त्याची स्त्री
प्रधान ............... वज्रबाहुचा
वैद्य ................ राजवैद्य
पुरोहित .............. उपाध्याय
बाळक ............... वज्रबाहुचा पुत्र
वैश्यजन ............. पांथस्त
पद्माकर .............. वैश्यदेशाधिपति
सूतिका, दासीजन, पशु, पक्षी इत्यादि.

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला

स्थल.... रंग भूमि.

सूत्रधार व नट.

नट- एका एकीं कचेरीत येऊन आनंदातिशयानें हास्य करितो आणि कांहीं शोकाविर्भाव दाखवून रुदन करितो.

सूत्रधार- विदूषका, हे हर्ष आणि शोक दोन्ही भाग एकदांच चालविलेस याचें कारण कायबरें?

नट- अहो, राजानें दोहद पुरविले ते अप्रतिम खरे नाहीं-तर आमचे घरीं डोहाळे होऊं लागले ह्मणजे कायविचारता, कोळसे, खापऱ्या असे पदार्थ खावेसे वाटतात. हे राजमन्य डोहळे पाहून हर्ष झाला ह्मणून हास्य करितों. व पुढील चंद्रकला आणि कुमुदिनी यांचें घोर कृत्य त्या बिचारे सुमतीचेप्रणावर संकट पाहून दुःख वाटतें ह्मणून रुदन करितों.

सुत्रधार- अरे, थोरावर असेच प्रसंग येतात. परंतु ईश्वर चरणीं जर खरी निष्ठा आहे, तर याही पेक्षां दुस्तर प्रसंगांतून ही सहज तरून जातां येतें. त्याच सुमती वर कसे दुर्घट प्रसंग आले आणि सदय हृदय ज

गनियंत्यानें त्यांतून तिला कशी मुक्त केली त्याचा सभा जनांस खेळ करून दाखविणें आहे. तर पात्रांची सिद्धता कर आणि सभाजनांची प्रार्थना कर.

नट - (इकडे तिकडे फिरून खिन्नवदन होत्साता सभाजनां सन्मुख उभा राहून ह्मणतो) पुढें सुमतीवर जो दुस्तर प्रसंग आला त्याचा खेळ करण्याची सूत्रधाराची मनीषा आहे, याजकरितां सर्वांनी निद्रा आलस्य यांचा परित्याग करून कथाभागाकडे गंभीरतेनें अवधान द्यावें बरें (इतक्यांत पडद्या पलीकडे शब्द होतो) त्वरा करा त्वरा करा रात्रि अतिक्रमण फार झाली आहे.

---

## प्रवेश २ रा.

स्थळ .... सुमतीचा महाल.

पात्रें

सुमती, राजा, राजवैद्य, कुलगुरु आणि दासी.

सुमती - कोण आहेग, दासी, माझे प्राण फार कासाविस होत आहेत.

दासी - बाईसाहेब, हे शीतकर उदक नेत्रांस लाविलें आणि व्यजनानें वारा घातिलें (वारा घालीत बसते इतक्यांत वज्रबाहु प्राप्त होतो.)

सुमती - (प्राणनाथ आले असें पाहून उठून उभी राहूं ला-

गते इतक्यांत भूमीवर अचेतन पतन पावते.

वज्रबाहु-(सुमतीचे मुखावर हस्त ठेवून) हे प्राणप्रिये, वृद्धावस्थेंत मला हा सुखाचा दिवस प्राप्त झालेला असतां मध्यंतरी काय संकट हें, सुमती एक शब्द तरी बोल (ती भाषण करीत नाहीं असें पाहून राजवैद्य व कुलगुरु यांस पाचारणार्थ दूत पाठवितो. पुरोहित व वैद्य प्रवेश करितात.)

पुरोहित- सुमतीस कांहीं भूत प्रेतादिक बाधा झाली असेल अशी कल्पना करून विभूत मंत्रून लावितो.

राजवैद्य-(सुमतीची नाडी अवलोकन करून ह्मणतो) राजन् भिऊं नको. सुमतीस कांहीं तरी विष बाधा झालेली आहे असे निदान लक्षणां वरून होतें (असें सांगून अनेक औषधाची योजना करितो. सुमती कांहीं वेळानें सावध होत्ये.

वज्रबाहु-(कुलगुरुचे अनुमतें पुंसवनादि सर्व विधी करिता झाला, विषाचे योगानें सुमतीचे शरीराचा दाह होऊन सर्वांगावर क्षतें पडतात.)

सुमती- प्राणनाथ, माझे शरीराचा दाह होऊन जागो जागीं क्षतें पडली आहेत आणि त्यांतून रुधिर स्राव होत आहे ही व्यथा माझ्यानें नाहीं कि हो सहन होत (ह्मणून रुदन करित्ये)

वज्रबाहु-(ती व्यथा स्वनेत्रांनीं अवलोकन करून ह्मणतो) हरहर परमेश्वरा काय प्रसंग हा. अशा या कोमल-आणि गर्भवती स्त्रीला कायतरी दुःखहें मी केव्हडा हत भागी।

साकी.

हेतमानसी होता माझ्या सारा निष्फल झाला॥
व्यथा लागली दुःसह वाटे जीवित त्या सुमतीला॥१॥

(शोकाग्रस्त होऊन गमन करितो)

सुमती- अग दासी, माझे पायांतून ओढी येत आहेत. पोटांत दुखूं लागलें आहे. डोळ्यांपुढें आंधेऱ्या येतात. सूतिका गृहांमध्यें सर्व तयारी आहेना?

दासी- बाईसाहेब माहेऱ्यावरची सुवीण वगैरे सर्व सिद्धता आहे (सूतिका गृहांत सुमतीस नेत्ये)

---

## प्रवेश ३ रा.

स्थल .... सूतिका गृह

पात्रें

सुमती, सूतिका, सुकेशा दासी

सुमती- कायकरूंग आईग, आई डोळ्यापुढें आंधेऱ्या येऊन प्राण कासाविस होत आहेत.

सूतिका- बाईसाहेब धीर धरा, आपण घाबरूं नका. प्रसू-

तकाळची लक्षणें हीच आहेत.

**सुमती-** अग सूतिके, माझ्या शरीराला स्पर्श झाला असतां प्राणान्त झाल्याप्रमाणें वाटतें सार्वांगाची क्षतें व्यथित होतात. यास्तव मला फार सावधगरीनें सांभाळबरें.

**सूतिका-** बाई साहेब आपण तिळमात्र चिंता करूं नये. माझा जितका कुशलपणा आहे तितका खर्च करून आपले प्राणास क्लेश होऊं देत नाहीं बरें.

**आर्या.**

नवमास पूर्णभरतां ॥ सुषुवे सूतास भूपती कांता ॥
सांगे सुवीण दासिस ॥ कळवा वंशो द्भवें दिनीं कांता ॥ १ ॥

**ओंवी.**

सुमतीस आतांचि व्हावा मृत्य ॥ परी सायासें जाहली प्रसूत ॥
क्षतें आंगावरी बहुत ॥ जननी परी बाल काच्या ॥ १ ॥

हे दासीनों, सुमतीस महत्प्रयासानें पुत्र रत्न प्राप्त झालें याप्रमाणें राजाला कळवाबरें.

**दासीजन-** (राजापाशीं जाऊन राजपदातें वंदन करून ह्मणतात) महाराज, सुमती बाईसाहेब यांजला पुत्र रत्न प्राप्त झालें

**राजा -** (हें सुवृत्त ऐकून) दासी जनांला उत्तम प्रकारें वस्त्रालंकार देता झाला.

छंद

ऐकुनीं असें वृत्त भूपती ॥ मोदमानसीं मानितो अती ॥
मांगलीकतीं वाजती तुरें ॥ बहुत देणग्या अर्पि निजकरें ॥ १ ॥

राजा- दासीनों, पुत्र मुखावलोकनार्थ पुरोहितादि ब्रह्मवृंदा समवेत मी येत आहें असें सूतिकालयीं कळवा बरें.

दासी- (दासी सुमती जवळ येऊन विनवितात.) पुत्रमुखावलोकनार्थ भूपति ब्रह्मवृंदा समवेत येत आहे.

आर्या.

सुतमुखपाहों आला नृपहोंई सावधान बाइ अधी ॥
होइल मग नामादिक राजाज्ञेनें समग्र तो हि विधी ॥ १ ॥

राजा- ( आनंदातिशयानें विधीपूर्वक पुत्रमुख अवलोकन करून मधुबिंदु पुत्राचे मुखांत घालितो आणि शतशः क्षतें पुत्राचे शरीरावर पडलेली अवलोकन करून खिन्न मानस होत्साता गमन करितो. )

सुमती- राजाचें मन उद्विग्न पाहून खेद मानिते.

---

प्रवेश ४ था.

स्थल . . . . . राजवाडा

पात्रें

राजा, प्रधान

राजा- कायसांगावें, प्रधानजी कर्मणो गहनो गतिः कर्म-

ची गति विलक्षण आहे. आजपर्यंत पुत्र संतति नसल्या मुळें मानसाचे ठायीं उद्विग्नता होती. आतां पुत्र झाला अ सतांही पूर्वापेक्षां चित्त फारच उद्विग्नता पावलें.

प्रधान- महाराज, मी सांगावें असा अर्थ नाहीं. परंतु असें आहे कीं, भवितव्यं भवद्भिःश्च हे जे ईश्वरी नियम आ- हेत ते चुकत नाहींत. यास्तव त्या गोष्टीविषयीं उद्विग्न- ता धारण करण्याचें कारण नाहीं. ज्याप्रमाणें त्या बा लकाचे प्राक्तनीं विधीनें लेखन केलें असेल तदनु- सार होणार आहे.

राजा- प्रधाना, ते सर्व खरें परंतु बालक कसा सुंदर केवळ मदना समान आहे, शुकासारखें ज्याचें नासिक, मृगा- सारखे ज्याचें लोचन आहेत, असें असून त्या सकुमार शिशूचे शरीरांतून जे रक्त आणि पू याचे स्राव होत आ- हेत आणि व्यथें करून बालक आक्रंदत आहे तें या नेत्रांनीं अवलोकन सुद्धां करवत नाहीं. हर हर परमेश्व- रा! एकुलता एक माझें उदरीं पुत्र तोही असा व्हावा काय?

दासी- ( राज पदातें वंदन करून ह्मणते ) महाराज, बालक तर क्षण भरही स्वस्थ राहत नाहीं अहर्निशीं आ- क्रंदत आहे आणि सुमतीबाईसाहेबाचीही अवस्था तशीच झाली आहे.

साकी

रात्रंदिन आक्रं दतबालक व्रण व्यथेनें भारी ॥
सुमतीसह दुःसह दुःखानें जागत यामिनिसारी ॥ १ ॥

महाराज त्या दुःखामुळें क्षणभर ही निद्रा येत नाहीं.

राजा- हे दासी, वेळोवेळीं सूतिका आणि बाल वैद्य यांजकडू न बालकास उपचार करवीत जा. ( दासी निघून जाते )

श्लोक

केलेबहूतमिउपायशिशूस ह्या या ॥
आरोग्यजाति परिते असमग्रवा यां ॥
चिंताबहूनमनिं मीझुरतों तयानें ॥
कोणी असानभुवनिंजोहिव्यथालयानें ॥ १ ॥

हे प्रधान, बालका सहित सुमतीचे काळजीनें मी सदैव झुरत आहें. परंतु असा कोणी या भूतळीं दृश्य होत नाहीं. कीं, त्या व्याधी पासून माझे प्रियकर स्त्रीस बालका सहित सोडवील.

प्रधान- महाराज, अनेक औषधें देत असतां कोणतें तरी औषध त्या व्यथेस वर्मी पोंचून गूण येईल त्याविषयीं चिंता वाहून काय होणार आहे.

राजा- त्या सर्व गोष्टी खऱ्या आणि मनामध्यें विवेकहि अनेक प्रकारें आणितों. परंतु पुत्राविषयीं आणि माझे प्रियपत्नीविषयीं हृदयस्थ जो मोह आहे तो मला सोडून-

इषन्मात्रही दूर होत नाहीं. वारंवार मानसाचे ठायीं चिंता रूपी वृक्ष उगवला आहे, त्याजला विवेकरूपीं कुऱ्हाडीने छेदन करितों, तथापि तत्काल त्या वृक्षातें कोमल असे नवपल्लव उद्भवतात. ते आपली वृद्धि करून घेण्याकरितां या माझे नेत्रकमलांतील उदक आकर्षण करीत आहेत; असें ह्मणून नेत्रांतून अश्रुपात टाकितो.

### साकी.

मानसिंचिंता करूनि सांगा पावे कोण सुखाला॥
चिंताग्निची शिखाप्रखरही दाही जितशरिराला ॥ १॥

हे पृथ्वीपते, असें आहेकीं, " सजीवं दहते चिंता निर्जिवं दहते चिता ॥ चिताचिंता समाख्याता बिंदुमात्र विशेषतः " ज्याप्रमाणें निर्जिवातें चितादहन करिते त्याप्रमाणेंच चिंताही सजीव प्राण्याला दहन करणारी आहे. तर या चिंतेचा त्याग करावा महाराज.

राजा — प्रधान "आशायां परमं दुःखं निराशायां परमं सुखं." आजपर्यंत माझे मानसाचे ठायीं अशी इच्छा होती कीं, सुमतीची वर्णव्यथा बालकासह आरोग्यातें पावेल आणि मी बालकांचें जातकर्मादि संस्कार करून आनंदानें मनीषा पूर्ण करून घेईन. परंतु तो योग येण्याची आशा वाटत नाहीं.

ओंव्या

रात्रंदिवस रडे बाळ॥ सुमती राणी शोकें विव्हळ॥
मृत्यु हि नो हे व्यथा सबळ॥ वर्णन करूं चि सर्वथा॥१॥
लेंकरूं सदां करितसे रुदन॥ निद्रा नये चि रात्रंदिन॥
आतां उभयतांसी रथावरी घालून॥ घोर काननी सोडवेगीं॥२

(याप्रमाणें माया पाश दूर करून निष्ठुर मनानें प्रधानास आज्ञा करिता झाला.)

प्रधान- महाराज आपली आज्ञा शिरसामान्य आहे. परंतु कांहीं दिवस आणखी उपाय करून पहावा असें मला वाटतें. या उपर जसा हुकूम.

राजा- अरे, तुला जी आज्ञा केली त्याप्रमाणें कार्य करणें सोडून विशेष भाषण करण्याचें काय प्रयोजन? सत्वर रथ सिद्ध करून आण आणि बालका सहित सुमतीचा घोर वनीं त्याग करून ये.

प्रधान- (राजाचें मन स्त्री पुत्राविषयीं फारच निष्ठुर झालें असें जाणून) आज्ञेप्रमाणें रथ सिद्ध आहे, सुमती बाईसाहेबांस बालका सहवर्तमान घेऊन जातों.

राजा- अशा पतित स्त्री पुत्राविषयीं दयामानणें विहित नाहीं. घेऊन जा लवकर. (असें सांगून अंतर्गृहांत जातो.)

(प्रधान सुमतीस बालका सहवर्तमान रथावर घालून पवनवेगानें रथ नेतो. नगरवासीजन सुमतीचा राजानें त्याग केला हें ऐकू-

न अत्यंत दुःखं पावतात.)

---

## प्रवेश ५ वा.

स्थल रंग भूमि

पात्रें

सूत्रधार व नट

नट - हाय हायरे, हाय हाय ( वक्षस्थळ पिटित ) सूत्रधार, आतां त्या बिचारे अबला स्त्रीची काय दशा होणार? हरहर ! जी स्त्री अत्यंत सकुमार जिला सूर्य किरण दृष्टीलाही सहन होणारें नव्हे ती अशा व्याधीनें ग्रस्त असतां तीक्ष्ण तापानें त्रस्त होऊन हा वनवास कसा तरी सहन करील. !

सूत्रधार- अरे, ईश्वरावर भरवंसा ठेविला तर तो सर्व संकटांतून मुक्त करितो, हें मी तुला पूर्वी कथन केलें आहे, तें विसरलास काय?

नट - छे, विसरलों नाहीं. परंतु ध्यानांत नव्हतें. एकुण सुमती या संकटांतून पार पडेल. बरें तर चालूं द्या पुढें.

## प्रवेश ६ वा

स्थल अरण्य

पात्रें

सुमती, बालक, प्रधान, पशू, पक्षी व वैश्य जन.

**प्रधान-** ( सुमतीस राजाज्ञा कथन करून रथा खालीं उतरतो )

**सुमती-** हे प्रधानश्रेष्ठा, प्राणेश्वराचें आजपर्यंत माझे ठिकाणीं अवर्णनीय ममत्व असून त्याचा परिणाम हाच्हा वा काय? या समयीं माझे प्रत्यक्ष बंधूहू नहीतूं मला अधिक आहेस. मी कशी दीन अनाथ धेनूसारखी आहें. तर माझा त्याग करून नकोरे जाऊं.

पद.

सचिवारे नको माझा त्याग करूं ॥ दीन अनाथ मी भगिनीसम तुज कोणाची आस धरूं ॥ १ ॥ ध्रु० ॥ न कळे मजवरी कोण्या दोषास्तव पडला हा दुःखतरू ॥ २ ॥ प्राणपती मज चाहत असतां झाला रुष्ट काय करूं ॥ ३ ॥ चालु ॥ अपराधाविण त्यागिलें मजला ॥ प्राणनाथें माझा घातच केला ॥ कैसि मी साहूं या दुःखाला ॥ कांहिं तरी दया येऊं दे तुजला ॥ अथवा जाई वधुनि तूं मजला ॥ आतां मी कोणा स्मरूं ॥ ४ ॥ सचिवारे नको माझा त्याग करूं ॥ ५ ॥ ॥ ॥

हे प्रधाना, हें दुःख नाहीरें माझ्यानें सहन करवतयापेक्षां जरी माझा घात करून जाशील, तरी फार बरें होईल. परंतु या घोर अरण्यांत नकोरे माझा त्याग करून जाऊं (वारंवार प्रधानापुढें ओंडवी होते )

प्रधान- ( नेत्रांतून अश्रुपात टाकून ) सुमती बाईसाहेब ही सेवा करण्यापेक्षां मलाच जरी मृत्यु आला असतां तरी फार चांगलें झालें असतें. फक्त सेवक धर्मानें वास करीत आहे ह्मणूनच हा दुर्घट प्रसंग आज माझे प्राक्तनीं आला हर हर ! काय सांगावें ! मातोश्री, आपली करुणा श्रवण करून व या अज्ञान शिशू कडे अवलोकन करून हृदय स्फोट होत आहे. परंतु

श्लोक.

आज्ञाभंगोनरेंद्राणां विप्राणांमानखंडनं ॥
पृथक्शय्याचनारीणां अशस्त्रवधमुच्यते ॥ १ ॥

स्वामी आज्ञेचा भंग होईल यास्तव मला जाऊं द्या.

सुमती- अरे, ज्यावेळीं मी राज्याची स्वामिणी स्वगृहीं पती सहवर्तमान होतें, त्यावेळीं यत्किंचित् निरोपानें येत होतास आणि हस्त जोडून वारंवार लीनपणानें वागत होतास, त्या तुला आज विनवीत असतां ही नाहिं कारे दया येत ? अरे, प्राण नाथांनींच माझा हत भागिणीचा त्याग केला, मग तुजवर तरी काय बोल ठेवणें आहे ? ज्या जगन्नियंत्यानें निर्माण केलें त्यानेंच माझे प्राक्तनीं असें लेखन केलें असेल अस्तु. ( धरणीवर आंग टाकिते )

प्रधान- हे वनदेवतानों, हे जलदेवतानो ही माझी स्वामिणी

सुमती, आजमी कठोर हृदय होत्साता स्वामि आज्ञेनें तुमच्या स्वाधीन केली आहे. तर इचें संरक्षण करणें तुह्माकडे आहे. हे पश्वादिक श्वापदांनों या अज्ञान बालकाचें होईल त्याप्रकारें साह्य करावें (अशी प्रार्थना करून सद्गदितांतःकरण होऊन पवन वेगानें रथ घेऊन स्वनगरीं गमन करिता झाला.)

**सुमती**– (कांहीं वेळानें मूर्छना सांवरून सावध होऊन पाहतेतों प्रधान नाहीं आणि बालक आक्रंदत पडला आहे, असें अवलोकन करून) हरहर ! यादुर्घट अरण्यांत अज्ञान लेंकरास घेऊन मी कोठें तरीजावें. हे विधात्या, तुजला या दीन कन्यकेची कशीरे दया आली नाहीं? ज्या प्राणपतीची मजवर अत्यंत प्रीति. आह्मी जर उभयतां दोन दिवस परस्परांस भेटलों नाहीं. तर मध्यें दोन युगें च गेलीं कीं काय. याप्रमाणें वाटत असे. प्राणनायाचें चरण सोडून मी क्षणाभरही दूर राहिलेली नाहीं. असें असून एकाएकीं निरपराधी या गरीब अबला स्त्रीचा त्याग करावा अशी इच्छा त्यांजला व्हावी काय? असो त्यांजवर तरी कायशब्द? आपले प्राक्तनींच विधीनें लेखन केलें असेल तें कदापि मिथ्या होणार नाहीं.हे भक्तवत्सला, हे करुणा समुद्रा, हे हिमनग जामाता, हेगंगाधरा, तुजवांचून या अनाथ दासीनें आतां को-

णाची आस धरावी? यावेळीं मी कशीं तव चरणीं लीन आहें, दीन आहें तर सत्वर या संकटांतून मुक्त कर. हर हर हे परमेश्वरा.!

पद (सारंगात)

हर हर कर्म कोण्यादोषें दुस्तर मजवरि ओढवलें पर्वत वत अधकिति जन्माचें नेणों होतें सांठवलें ॥ ॥ धृ०॥ दुस्तर काननीं श्वापद गत ध्वनि ऐकुनि वाटे चित्ताला॥ भीति बहू कशिस्थिती करू मी घेउनिया वनीं बाळाला॥ कंटक दुर्घट प्रस्तर रुतती सहन न करवे चरणाला॥ धांव विधात्या, विश्वपालका, सरणि न त्यागीं शरणाला॥ भक्त वत्सल ब्रीद तुझें हें वेदशास्त्र गाती लीला॥ हतभागी मी समर्थ न हे अगाध तव स्तव करण्याला॥ सत्वर येउनी तारीं श्रीहरी वनवासि मी बहु श्रमलें॥ हर हर कर्म कोण्यादोषें दुस्तर मजवरि ओढवलें ०॥ १॥ ॥

कायतरी ही कर्मदशा, परमेश्वरा, किती जन्मांचें पाप समूह सांचलेले कीं, त्या योगानें मजवर हा असा प्रसंग आला. व्याघ्रादिक श्वापदें घोर गर्जना करीत आहेत. अशाया दुस्तर काननामध्यें अज्ञान बालकास घेऊन मी कशी तरी वास करूं? कंटक आणि पाषाण यांहीं चरण स्फोट होऊन रुधिरस्राव

होत आहे, हे परमेश्वरा, विश्वपालका, दीन दासीव र कृपाकरून यासंकटातून मुक्त करण्यास तुजवां चून दुसरे कोणाला शरण जावें. हर हर हे परमेश्वरा!

मागील पदांतील कडवें.

करुणा माझी ऐकुनि सारे पशुपक्षी हे रडताती ॥ भानु तीव्र तापानें श्रम बहु शरीरीं माझें घडताती ॥ ह्मजिव देण्या शार्दुल सन्मुख जातां त्यागुन पळताती ॥ बहू-त पापिणी जाणुन मातें न शिवूं ऐसें मनि ह्मणती ॥ हा परमेशा अशा संकटीं धांव पाव मज त्वरित गती ॥ तुझ्या कृपेनें पतितादिक ही भूलोकीं या उद्धरती ॥ दीन दासिची दया न ये कां काय कारणें उपेक्षिलें ॥ हर हर कर्मा को० ॥ २ ॥ साधु अवज्ञा केली किंवा ईश्वरतातें त्यागियेलें ॥ अनाथ विप्रा दंडुनि सारें होतें त्याचें धन हरिलें ॥ दाता देतां दान तयाला विघ्न च वाटे म्यां केलें ॥ कंन्याविक्रय गोत्रघात वा ता-ताला गीं म्यां वधिलें ॥ कर्मगती असे घोर थोर हीने यें पातक किति घडलें ॥ कोणे कारणीं न कळे मज वरी अरिष्ट ऐसें हें आलें ॥ हर हर कर्मा कोण्या दोषें दुस्तर मजवरी ओढवलें ॥ पर्वतवत अघ किति जन्माचें नेणों होतें साठवलें ॥ ३ ॥ ॥

हे करुणाघना, दीनतारका, परमेश्वरा ज्यावेळीं

शंखासुर प्रबळ होऊन ब्रह्मदेवाचे वेद हरण करून नेत होता, त्यावेळीं तूं मत्स्य रूप धारण करून त्या असुराचा नाश करून वेद ब्रह्मदेवाला आपून दिलेस. त्याचप्रमाणें भक्तांच्या संकटसमयीं अनेक अवतार धारण करून निज भक्तांना संकटांतून सोडविलेस. गजेंद्र केवळ पशु असतां त्यानें एक कमलपुष्प तुला अर्पण केलें त्या कालीं तूं लक्षल निजस्वरूप दाखवून गजेंद्राचा उद्धार केलास. असें असून या दीन दासीची तुला नाहीं कारे करुणा येत.? अशीं पातकें तरी माझे हातून काय घडलीं नकळे. साधुवृंदाचा अपमान केला किंवा अनाथ विप्राचें द्रव्य हरण केलें, कन्याविक्रय पितृहत्या अशा कांहीं महत्पातकांचा मममस्तकीं भार असल्यामुळें तुला करूणा येत नसेल. अरे, या दुःखातून मुक्त व्हावें ह्मणून प्राण त्याग करण्यास व्याघ्रापुढें जातां तोही मी पापिणी ह्मणून मजला स्पर्श न करितां पलायन करितो. अशा या पापिणीची करुणा येऊन या दुःखाब्धींतून तुजवांचून कोण मुक्त करणार आहे ? माझे पंचप्राण कासाविस होऊन अन्नावांचून जाऊं पहात आहेत. परमेश्वरा नकोरे माझा अंत पाहूं ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.



पशु॰पक्षी- ( सुमतीची करुणा श्रवण करून रुदन करितात. आणि आप आपल्या पंखांनीं बालकासह सुमतीवर छाया करून चंचूनीं शीतल जल आणून उभयतांवर सिंचन करितात व कितीएक पक्षी चंचूनीं मधुर रस बालकाचे मुखांत घालितात.

## ओंव्या

सुमतीची करुणा ऐकून ॥ पशुपक्षी करिती रुदन ॥
कोणी मधुर रस आणून ॥ बालकामुखीं घालिती ॥ १ ॥
वनगाइ स्वपुच्छें करोनी ॥ वारा घालिति रक्षिती रजनी ॥
ऐसी यापरिते राजपत्नी ॥ हिंडता अपूर्व वर्तलें ॥ २ ॥

सुमती- परमेश्वरा, अशा संकटांत ठेवण्यापेक्षां जरी मृत्यु देशील तरी फार चांगली गोष्ट होईल. ( अशी करुणावाणीनें परमेश्वराचा स्तव करिते.

## धावा.

धांव धांव धांव आतां धांव माधवा ॥ अमित भक्त प्रियकरा तूं येई केशवारें ॥ ध्रु॰ त्रितापशमन त्रिदोष हरण अरिदमन विघ्नकंदन मुक्तिसदन येशि केधवांरे ॥ धांव धांव॰ ॥ १ ॥ विघ्नजाळ पडलि माळ महान व्याळ दिसति काळ क्रमु मि काळ कशि हियेधवांरे ॥ धांव धांव॰ ॥ २ ॥

( असा एकाग्र चित्तानें जगदीशाचा स्तव करीत आहे.

इतक्यांत मनुष्यवाणीची ध्वनी व घंटारव ऐकुं येतो ह्मणून बालकास उचलून घेऊन कांहींशी पुढें जाते तों वैश्यजन वृषभ भार घेऊन येत आहेत. त्यातें अवलोकन करतांच त्यांचे अग्रभागीं जाऊन सास्टांग नमस्कार करिते.

**वैश्यजन-** हे मातोश्री तूं कोण आहेस, अशा या व्याधीनें ग्रस्त असतां शरीराला त्रस्त करणारा वनवास किमर्थ योजिला आहेस बरें

**सुमती-** ( आपला सर्व वृत्तांत सांगून ह्मणते ) या संकटसमयीं तुह्मी मजला केवळ बंधू प्रमाणें दिसता आहां.

**वैश्यजन-** माते भिऊं नको. आमच्या समागमें वैश्य नगराप्रत यावें त्या नगरीचा अधिपति पद्माकर या नामें करून वैश्य मोठा धार्मिक आणि निती मान आहे. त्याजला तुझा सर्व वृत्तांत कथन करूं ह्मणजे तुला आश्रय देईल.

**सुमती-** कृपा करून या आरण्य वासातून मला मुक्त केलेंत तर मजवर तुमचे अनंत उपकार होतील. ( असें ह्मणून त्यांज समवेत वैश्य नगराप्रत गमन करिती जाती.

## प्रवेश ७वा

स्थळ ..... पद्माकराचें नगर

पात्रें

**पद्माकर, वैश्यजन, सुमती व बालक.**

**पद्माकर**-( प्रातः काळीं उठोन नित्यकर्म आटोपून परमेश्वराचें नाम स्मरण करीत बसलेला आहे. इतक्यांत वृषभ भारा समवेत वैश्यजन प्रवेश करितात. )

**वैश्यजन**-( सर्वत्र पद्माकराचे चरणाप्रत वंदन करून बसतात.

**पद्मा०**- हे सेवकजनहो तुह्माप्रत कल्याण असो. सर्व सुरक्षित पणी आलाकीं, आणि व्यापार धंदा उत्तम प्रकारे साधला कीं?

**वैश्य०**- महाराज, याखेपेंस व्यापार फार चांगला जमला आणि दोन लक्ष रुपये नफा राहिला. (ह्मणून हिशेब दाखवितात. )

**पद्मा०**- हिशेब पाहून समाधान पावतो. इतक्यांत सुमतीला एके बाजूस उभी आहे असें पाहून )हे सेवक जनहो ही स्त्री कोण आहे व येथें किन्निमित्त प्राप्त झाली आहे.

**वैश्य०**- महाराज ही कोणी निराश्रीत राजपत्नी आहे इजला प्रारब्ध योगानें वानवास प्राप्त झाला. ती आमच्या संगतीनें प्राप्त झाली आहे.

**पद्मा०**- ( उठून बसतो ) आणि कां बाई क्षेम आहेसना? तूं कोणते राजाची कांता आणि तुजवर असा प्रसंग किंन्निमित्त आला हें कथन कर बरें?

**सुमती** साक्या.

**दशार्ण देशाधिपती नामक, वज्रबाहु जो राजा ॥**
**नाम सुमति हे यादेहाला, परिणित त्याचि मि भाजा ॥ १ ॥**
**सवतीनीं विषमला घातलं, गर्भिणि असतां भारी ॥**

प्रसूत होतां झाली शिशूसह, देहिं क्षतें हीं सारीं ॥ २॥
त्या योगें या बाळास ह मज, भूपतिनें वनवासी ॥
त्यजिलें ह्मणुनी झाली ताता, मातें गति ही ऐसी॥ ३॥
धर्मतात तूं होऊनि रक्षी, शरण तुला मी आहें ॥
निराश्रितासी आश्रय देतां, कीर्ति जगीं बहु आहे॥ ४॥

हे ताता, दशार्णदेशाधिपति जो वज्रबाहुराजा त्याची मी पट्टमहिषी गर्भिणी असतां सवतीनीं द्वेषें करून मजला विष घातलें. त्या योगानें या बाळका सहित माझे शरीरावर ही वर्ण व्यथा उत्पन्न झाली. आणि याच कारणानें राजानें माझा वनी त्याग केला ती मी या तुझ्या सेवकांसंगती येथें प्राप्त झालें आहे. तर तूं माझा धर्म पिता आहेस. या अनाथ दीन कन्यकेचें सौंरक्षण कर येणेंकरून जगांत कीर्ति होऊन महत्पुण्य पावशील.

**पद्माकर-** ज्यापेक्षां तूं मला तात असें ह्मणतेस त्यापेक्षां भीऊ नको. मी तुझें आपले कन्येप्रमाणें पालन करण्यास सिद्ध आहे, व तुलाही मी धर्मकन्याच मानिली आहे.

दिंडी.

धर्मकन्ये तूं राहि सुखें येथें ॥ वसे देतों मी गेह तुला तेथें ॥
सेवकातें योजितों तुझ्या सेवें ॥ त्यागि दरतो मानसीं तो कपावें॥

( याप्रमाणें सुमतीला अश्वासून आपले समीपच एक गृह आणि सेवे करितां सेवकजन देऊन आनंदानें

ठेवून घेता झाला. )

(सुमती त्या अरण्यवासाचे संकटातून मुक्त होऊन सुस्थळ मिळाल्यामुळें पद्माकराचे व परमेश्वराचे अभार मानुन तेथें वास्तव्य करिती झाली. )




पद्माकर.
सुमती शोक करीत आहे.
योगी.

# भद्रायुसत्वदर्शन नाटक

## अंक ३ रा

### पात्रें

सूत्रधार .............. नाटककर्ता
नट .................. त्याचासोबती
सुमती ................ वज्रबाहुची स्त्री
पद्माकर .............. वैश्याधिपति
शिवयोगी ............ ऋषभ नामक
बालक भद्रायु ......... सुमतीचा पुत्र
सुनय ................ पद्माकराचा पुत्र
सेवक ................ सुमतीचे



## अंक ३ रा.

### प्रवेश १ ला.

स्थल .... रंगभूमि

पात्रें

सूत्रधार व नट

सूत्रधार- अरे नटा, सुमती वनवासांतून मुक्त होऊन तिजला पद्माकरानें आश्रय दिल्यानंतर तिचा कसा काय परिणाम झाला त्याचा खेळ करून सभाजनांचे मन रंजन करण्यास तूं दक्ष आहेस तर लवकर सिद्धता करून पात्रांची तयारी कर बरें.

नट- ओ यस, हम सब तयारी करके खडा हैं. (सभेकडे अवलोकन करून) हे सर्व सभाजन हो विपत्ती काळीं धैर्य धारण केलें असतां परमेश्वर त्यांतून मुक्त करितो. याविषयीं झालेले खेळानें कांहींशी खात्री झाली. आतां पुढील भागाचा खेळ करून दाखवीवण्याची सूत्रधाराची मनीषा आहे तर सर्वत्रांनीं गांभीर्यपणें अवलोकन करावें.

### प्रवेश २ रा

स्थल .... पद्माकराचें नगर.

## पात्रें

## सुमती, बालक, पद्माकर आणि ऋषभ नामक-शिवयोगी

पद्माकर- हे सुमती तूं निर्भय मनानें यास्थळीं वास्तव्य करावें आणि तूं व्यथित आहेस याज करितां वारंवार मी तुझा समाचार घेत जाईन. समय विशेषी सेवक जनां कडून मला जें कळविणें अवश्य असेल तें कळवीत जा बरे.

## ओंवी

पद्माकरें सुमतीलागून ॥ शेजारीच सदन देऊन ॥
वारंवार समाचार घेऊन ॥ उपचार बहू करीतसे ॥ १ ॥

सुमती- हे तात तुमचे हे मजवर अनंत उपकार आहेत. अशा दुर्घट प्रसंगी मला आश्रय देऊन ही व्यथा निरसन होण्याविषयीं आपण अनेक उपाय योजीत आहा येणें करून मी फार अभारी आहे.

## आर्या.

तव सुकृतीस पाहुन ॥ ताता हुनि तात सा मला गमला ॥
वनवासाचे योगें ॥ झालेला दुःखवन्हि तो शमला ॥ १ ॥

वनवासाचे योगानें या देहाला जो दुःख वन्ही दाह करीत होता तो तुझ्या दयारूप मेघानें शांत झाला.

पद्माकर त्या सर्व गोष्टी खऱ्या परंतु तुमची व्यथा निरसन

होण्याकरितां अनेक उपाय करीत असतां लेशही क-
मीपणा होत नाहीं. ही मोठी चिंता लागून राहिली आहे.

समती- या महद्व्यथेला श्रीशंकरच कृपा करील तर निरसन हो
ईल व्यर्थ आपण तरीं किती श्रम घ्याल बरें.

पद्माकर ओवी.

नित्य नूतन वैद्य आणून ॥ देत असतां दिव्य रसायण ॥
व्यथेस लेशही नसे ऊण ॥ ह्मणूनी शीण वाटतो ॥ १ ॥

( अनेक औषधें देत असतां गूण येत नाहीं. यास्तव
स चिंत असा पद्माकर आपलें मंदिरी गमन करितो )

सुमती- ( बालका सह सेजेवर शयन करितें कांहीं वेळानें जा
गृत होऊन बालकाचा श्वासोश्वास बंद झालेला पा
हून घाबरी होते )

सेवक- ( पद्माकरास हें वर्तमान श्रुत करतात. पद्माकर प्रवे
श करितो )

पद्माकर- बालकास अवलोकन करितों ( तों बालक पंचत्व पाव
ला. हें जाणून नेत्राश्रु ढाळितो )

सुमती- बालकाचे चलनवलनादि सर्व व्यापार शून्य आणि
पद्माकराचे नेत्रांतून अश्रुपात होत आहेत असें पा-
हून शोकाग्रस्त होत्साती ) हे परमेश्वरा, प्राणना-
थांनीं माझा त्याग केला त्या दुःखातून पद्माकराचे कृ
पेनें मुक्त होऊन या बालकावर सर्व दुःखें विसरून

सुखानें वास करीत होतें. दीनपालका तो बालक ही तुझ्यानें नाहीं कारे पाहववला.

## पद

( आहारे दैवा या चालीवर )

आहारे कर्मा केसें हें घडवीलें ।। शोकाब्धीमध्यें मज लागीं बुडवीलें ।। ध्रु० ।। बालक माझें सगूण सकुमार ।। स्वरूप ज्याचें अमूपसुंदर ।। ज्यातें पाहोनी लज्जीतमनिमार ।। ।। त्यागूनी मजला गेला कोठें दूर ।। आतां मी योजू कोणता विचार ।। कैसारे झाला मजवरी निष्टूर ।। कायहें दैवा विंदान त्वां केलें ।। आहारे कर्मा केसें हें घडवीलें ।। शोकाब्धीमध्यें मजलागीं बुडवीलें ।। १ ।। ।। ।। ।। ।। ।। ।।

आहा हे नृप किशोरा, राजीवनेत्रा, कोमलगात्रा तूं माझे उदरीं जन्म घेतलास परंतु तुजला सुखाचा वाराही या हतभागीचे हातून लागला नाहीं. बालका प्राणनाथांनीं माझा निष्ठूर मनानें वनी त्याग केला परंतु एक तुजवर भंरवसा होता कीं, अल्प काळांत तूं सज्ञान झाल्यावर माझे संरक्षण करिसील. बा तान्हुल्या तें सर्व विचार स्वप्नवत् होऊन आज कसारे माझा त्याग करून गेलास, मी तुजवांचून कशी दीन झालें आहें आतां सकुमारा, तुजला कोठेंरे पाहूं, हे प्राण तुझ्यावि-

योगानें कसे तरी वांचवूं यापेक्षां जर मलाच मृत्यु-आला असतां तर फार चांगली गोष्ट जाहली असती. हर हर हे परमेश्वरा !

( मागील पदांतील कडवें )

त्यागीलें मजला रायानें वनवासीं ॥ आशा ही होती
बातूझी मानसीं ॥ सज्ञान होतां रक्षीसी मजसी ॥
बालकावरती त्यजूनी दुःखासी ॥ स्वस्थमी होत्यें
आतां वनवासी ॥ तान्ह्याावीणें झाल्येंहो परदेशी ॥
रुसुनी बालका कांमातें त्यागीलें ॥ २ ॥

हरहर हे विश्वव्यापका, जगदीश्वरा, माझें एकुलतें एक बाळ निरपराधी परमेश्वरा त्याजवर कसा तरी काळानें घाला घातला हा. अरे, मी अशा प्रकारे वन-वासी असतां माझी ही कां दया त्या काळाला आली नाहीं. मी केवळ अंध असून यष्टीरूप माझें बालक कसेंरे नेलेंस, चोंहिकडून माझी ग्रहदशा एकदांच फिरून अशा अनिवार्य दुःख वन्हीत माझा देह कोण त्या दोषास्तव दहन होत आहे. आतां बाळकासंगती प्राण त्याग केल्यावांचून किमपि राहणार नाहीं. ( मस्तक भूमीवर आपटिते )

( मागील पदांतील कडवें )

कायम्यां केलें नकळे तें पाप ॥ किंवा तो घडलासा

धूचा मज शाप ॥ अथवा न दिधलें तृषितासी मी-
आप ॥ तेणें हा घडला दुर्घट संताप ॥ कोणत्या पा
पें भरलें तें माप ॥ निष्ठुर जाह्ला जगाचा कां बाप ॥
भगवंते नेणों मजला कां त्यागीलें ॥ आहारेक० ॥ ३

जगदीश्वरा हें कोणत्या पापांचे फळ अथवा साधुवृंदा
चा मजला शाप घडला, किंवा मी तृषिताला उदक दि
लें नाहीं, असें महत्पाप माझे हातून काय तरी घडलें
कीं, परमेश्वर मजवर आज सर्वस्वी क्षोभून माझे
अनाथाचें बालक मरण पावले आतां मी कोणाची त
री आस धरूं व हे प्राण तरी कसे वाचवूं. या पुत्र विर
हा पेक्षां माझेच प्राण जातील तरी बरें. आतां या ज
गामध्यें कशी तरी वास करूं हर हर हे परमेश्वरा.

( मागील पदातील कडवें )

हे शंभो जाह्ले चरणी मी लीन ॥ सर्वस्वी आहें अ
नाथ अतिदीन ॥ देईं हो मातें इच्छीत सुतदान ॥ अ
घटील तूझें मायेचें विंदान ॥ कृपाळू पणें तारी बा
येऊन ॥ बालका संगे अथवा जा घेऊन ॥ मजला
हें चिन्ही आह्मी आणीलें ॥ आहारे कर्मा कैसें हें
घडविलें ॥ शोकाब्धी मध्यें मजलागीं बुडविलें ॥ ४ ॥

हे भूताधिपते, हे अनंता, हे पुराणपुरुषा, हे नीलकंठा
हे शंकरा तूं माझें आराध्य दैवत असून सर्वस्वी-

जन्मापासून तव चरणीं मी सेवक लीन असतां तुझे दासावर असे संकट यावें याची लाज तुला कशी रे नाहीं. भक्त वत्सल हें ब्रीद जगत्त्रयांत ध्वनित झालेलें असून जेजे तुझे भक्त संकटीं पडतात, त्यांजला त्यां संकटांतून तूंच मुक्त करीत आहेस. असें असून या हत भागीची नाहींना करूणा येत. परमेश्वरा आतां थो वडीं हेंच मागणें आहे कीं, माझा बालक मजला दे अ थवा या बालका संगती मजलाही घेऊन जा. हें दुःख माझ्यानें नाहींकीं रे सहन होत. शिव शिव हे परमेश्वरा.

(वक्षस्थल पिटिते.)

**पद्माकर**- हे सुमती वत्से, शोकाचा त्यागकर गतवस्तूसाठीं शोक करणें हे व्यर्थ होय, चारी प्रहर रात्र अतिक्रमण होऊन गेली आतां त्या बालकाचा पुढील विधी झाला पाहिजे, कांहीं तरी मानसी विवेक करवें.

**सुमती**- हे ताता हें काय हो आपण भाषण करितां या बालका विना एक घडीभर तरी माझे प्राण वांचतील काय?

## ओवी

ऐसी सुमती शोक करीत ॥ तों निशांती गभस्ती उगवत ॥
तेवीं शिवयोगी अकस्मात ॥ तयेस्थानी पातला ॥ १ ॥

( सुमती शोक करीत आहे आणि पद्माकर शांतवन करीत आहे इतक्यांत ऋषभ नामक शिवयोगी प्रवेश करितो. )

**पद्माकर**– (जटाजूट मंडित रुद्राक्षाभरण त्रिपुंड धारक भस्मोधुलित केवळ शंकरा समान आनंदित असे मूर्तीस अवलोकन करून सप्रेम अंतःकरणानें सन्मुख जाऊन योगीयांतें वंदन करून आसनीं स्थित करून मानसपूजा करितो )

श्लोक.

पाहूनि पद्माकर योगियातें॥ जावोनि सन्मूख नमीतयातें॥
आणूनियां आसनिं बैसविलें॥ यथामतीमानसिं पूजियेलें॥ १॥

**योगी**– आहाहे वैस्योत्तमा कल्याण असो.

**सुमती**– हे ऋषिराज ही हतभागी सुमती वंदन करीत आहे.

**योगी**– वत्से कल्याण असो ( हा आशिर्वाद शकूनच मानिते )

**सुमती**– हा अवलोकन केलांतना माझा सकुमार बालक पंचत्व पावला आहे. माझा पतीनें त्याग केल्यानंतर जीं जीं संकटें आणि दुःखें भोगिलीं, तीं सर्व परमेश्वरावर भरंवसा ठेवून, या बालकाची मजला मोठी आशा असतां आज माझा त्याग करून कसाहो गेला. ( याप्रमाणें शोकातिशयानें रूदन करिते. )

**योगी**– वत्से सुमती तूं राजपत्नी सर्वज्ञाती असून अज्ञानांत शिरून हा काय शोक करीत आहेस. शोकाचा त्याग कर जी जी वस्तू आकार आणि नाम पावली ती निश्चयें करून लयाप्रत जाणार आहेच. प्रलयकाळीं स्थावर जंगम आदिकरून सर्व सृष्टि जलगर्भी गुप्त

होऊन निर्गुण झाला आकार नाहीं, ज्याला नाम नाहीं, ज्याला रूप नाहीं, केवळ तेजोमय जो ब्रह्मादिकांना अतर्क्य, असा कांहीं पदार्थ तो मात्र शेष राहणार आहे. यक्ष गण गंधर्व किन्नर प्रत्यक्ष सृष्टिकर्त्ता ब्रह्मदेव आणि यम इत्यादि सर्वच नाश पावणार मग हा तर पंचतत्वात्मक देह ज्याप्रमाणें जलावरती शतशः उर्मी उत्पन्न होतात क्षणेंकरून नाश पावतात. तद्वत् ही मानवी तनू क्षणभंगुर यासाठीं शोककरणें हें व्यर्थ आहे

श्लोक.

जी दृष्ट वस्तू तिलयासपावे॥ कथीकसें त्याकवणें जपावें
ललाटरेषाकधिंनाटळेहो॥ भूतोह्मिपाहें प्रलयीं ढळे हो॥१॥

दिंडी

इंद्रचंद्रादीसर्वदेवतांला॥ प्रळयकाळींनाशतोअसेत्यांला॥
क्षणिकजाणेमानवीतनूआहे॥स्वप्नवत्याशाश्वतीकशीराहे॥१॥

हे वत्से, तूं कां व्यर्थ शोक करीत आहेस, लक्षचौऱ्यायशी योनी फिरत फिरत तूं या मानवी देहातें पावलीस, तर ज्या ज्या योनीत पूर्वी तुझे जन्म झाले त्यात्या ठिकाणीं पति, पुत्र, मातापितर इत्यादि जे आप्तजन होते ते कोणत्या स्थळाहून आले आणि कोणत्या स्थळीं गेले अजून तुला किती जन्म घ्यावे लागतील. पुत्र-कोणाचा आणि माता कोणाची. प्राणी ज्याज्या वर्णा-

मध्यें शरीर धारण करितो. त्या त्या कुळाच्या अभिमाना मध्यें तल्लीन होतो. परंतु आपण मूळ उत्पन्न कोठून झालों याचा विचार करीत नाहीं. तूं ह्या पुत्र कोण त्यास्था नाहून आणिला होता आणि आतां मृत्यु पावून कोण त्या स्थळीं गेला. तूं व ही जी सृष्टि दृष्टिगोचर होत आहे, ही पुढें कोठें जाईल हें कथन कर बरें. आत्मा केवळ अविनाशी शाश्वत आहे, तो कोणाचाही पुत्र नाहीं, अथवा माता नाहीं. शरीराला जर तूं आपला पुत्र असें मानीत असशील तर शोक करण्यास कांहींच कारण दृश्य होत नाहीं. कांकीं, शरीर तुझ्या सन्निध आहेच.

साक्या

जन्मजन्मिचे सुमतीसांगें, आप्तसुहृत्तुतव कोठें ॥
असती आले कोठुनिगेले, स्थानींकवण्यावाटे ॥ १ ॥
मायामयहा प्रपंचलटिका, आत्मातोअविनाशी ॥
कोणाचाही आप्त नसेतो, आहेगतिहीऐशी ॥ २ ॥
मृगजलमिथ्यातरीखरेमग, असतीलकैसे भंग ॥
ज्ञानदृष्टिनेंविचारूनिहें, सुमतीमजला सांग ॥ ३ ॥

आर्या

माया प्रपंचतरुवरि ॥ शिवजिवहेदोनबैसलेपक्षी ॥
शिवसावधान असुनी ॥ विषयफळेंअज्ञजीवतोभक्षी ॥ १

सुमती उत्तम कल्प वृक्षाचे चित्र काढले असेल ह्मणून त्याचे शीतल छायेस बसण्याचा उपयोग होईल काय? अथवा चित्रांमध्यें जर प्रखर वन्ही काढलेला असेल तर तेणें करून कोणतेही वस्तूचें दहन होईल काय? चित्रामध्यें जर जलचरा सहवर्तमान गंगा लेखन केली असेलतत्राप त्या गंगोदकानें कोणी वाहून जाईलकाय? तद्वत् जे मुळीच लटिकें आणि अशाश्वत हे शरीर ह्मणजे केवळ क्लेशाचावृक्ष होय. कृमि कीटक यांचे वसति स्थान सर्व रोगांचे केवळ भांडार आणि पापांचा जसा समुद्रच. ज्याप्रमाणे काष्टभार रज्जूनीं बंधन केलेला असतो त्याप्रमाणें ही एक शरीर रूपी अस्थिची मोळी चर्मरूप रज्जूतें बंधन केलेली आहे. शुक्र आणि शोणित या अपवित्र संयोगापासून जें उत्पन्न होतें तेंकेवळ पशु पूत्रानें पवित्रतेप्रत कसें पावेल. जे कोणी सद्गुरुप्रत अनन्य शरण जातात. ते मात्र तरतात. पुनरपि जननं पुनरपि मरणं अशा मालीकेंत जे गुंतलेले ते कधीं कसे बरें मुक्त होतील? ज्याप्रमाणें एखादे वृक्षावरती अनेक पक्षी बसतात. कांहीं वेळानें अन्यत्र स्थळीं गमन करितात. अथवा पांथिक शीतल छायेस वृक्षाखालीं स्थित होतात उष्णा सरल्यावर गमन करितात. त्या प्रमाणें पिता, माता,

बंधू पुत्रादिक सर्व आहेत. या तुझे पुत्राचे शरीरामध्यें कोणती वस्तू होती आणि ती आतां कोणत्या स्थानीं कोणत्या मार्गानें गेली याचा विचार कर. जसें स्वप्नामध्यें सार्वभौमत्व तद्वत् सकल प्राणी माया रूप पाशांमध्यें आच्छादित होऊन धन धान्य पुत्र पौत्र यांची इच्छा करितात. परंतु आपण मूळ उत्पन्न कोठून व आपण असें ह्मणणारा पदार्थ शरीरामध्यें कोणता-आहे या विषयीं आत्मानात्म विचार करित नाहीं. जशीं गंगेमध्यें अनेक काष्टें एकत्र होतात काळांतरानें विघड पावतात त्याप्रमाणेंच हें माया जाळ आहे. कोणी कोणाचा पुत्र नाहीं, कोणी कोणाचा पितर नाहीं, तर अशा मिथ्या वस्तूसाठीं शोक करणें अनुचित आहे. वत्से शोकाचा त्याग कर.

## पद

सुमती त्यागितूं शोकातें॥ हृदईं आणि विचारानें॥ मायामय हा प्रपंच लटिका॥ साच कसा वदसितें॥ १॥ ध्रु०॥ शाश्वत आत्मा भंगनसे त्या॥ शरीर हे निगुतें॥ २॥ आजवर फिरलिस असंख्य योनी॥ नेणें गमन कोण्या पंथें॥ ३॥ देही मी ही वस्तु कोणती॥ सांग काय गमतें॥ ४॥ सुमती त्यागि तूं शोका

तें ॥ हृदई आणि विचारातें ॥ ॥ ॥

हे सुमती तुझे पूर्वी अनंत जन्म झाले तेथील स्वज-नादिक कोणत्या स्थांनीं आहेत याचा विचार कर. तुझ्या देहा मध्यें आणि सर्व सृष्टि मध्यें जे जीव जंतू वास करीत आहेत त्यांचे देहीं व्यापक कोण आहे हे मना मध्यें आण आणि व्यर्थ शोक करून शीण पाऊं नको. वाग्मनः कायजें करून परमेश्वरावर विश्वास ठेवून ज्या स्थितीत ठेवील त्या स्थितिमध्यें सुखानें वास करावा शोक करण्याचें मुळीच कारण नाहीं.

पद्माकर व सुमती साकी

सुमतीसह पद्माकर, ऐकुनी दिव्य निरूपण ऐसें ॥
वंदुनि चरणांबुज, मनि मानिती योगीईशचऐसें ॥ १ ॥

( उभयतांही बद्धांजुली विनवितात. ) हे रूपाघना तुझें ज्ञान अगम्य आहे हा जो केवळ अमृत समान एतावत्काल पर्यंत ज्ञानामृताचा वर्षाव केला त्याश्रवण करून आमची मनें या संसार सागरा पासून मुक्त होऊन तव चरणीं लिप्त झालीं आहेत. तूं त्रिकाळ ज्ञानी प्रत्यक्ष शंकरच आमचे संकटसमयीं प्राप्त झाला आहेस. हें चराचर सर्व आपल्या मायेनें मोहित आहे. उत्पत्ति स्थिति आणि लय ही भवदिच्छा मात्रें करून होत आहेत तर आतां नको आमचा अंत पाहूं

योगी– ( अंतरी सद्गद होत्साता सुमतीस सन्मुख पाचारू न मृत्युंजय मंत्राचा उपदेश करिता झाला. )

साकी

मृत्युंजयमंत्रें अभिमंत्रुनि चर्चित त्यासुमतीला ॥
भस्मप्रतापें निरसुनि व्याधी, लाधेरतिसमतेला ॥ १ ॥

श्लोक

मंत्रुनी विभूति योगिलाविता तये क्षणीं ॥
सजीवबाळजाहला अनंगवत्सुलक्षणी ॥
जाउनीमहद्व्यथाशरीर दिव्यपावला ॥
ऐकतां जगांतमात तोकुमारजाहला ॥ १ ॥

( मृत्युंजय मंत्रानें अभिमंत्रून बालकाचे शवास विभूति चर्चन करतांच तत्क्षणी बालक ज्याप्रमाणें निद्रिस्त प्राणी जागृत होतो तद्वत् व्यथारहित दिव्य तेजःपुंज शरीर होत्साता उठून वंदन करितो.

योगी– बालका भद्रायू तुला मदाशिर्वादानें आयुरारोग्य ऐश्वर्य प्राप्त होऊन सर्व पृथ्वीचे राज्य करशील आणि तुझा सत्कीर्तिघोष जगामध्यें प्रसिद्ध होईल. व तुला चौदा विद्या आणि चौसष्ट कळा अनायासें प्राप्त होतील.

सुमती– ( बालक सजीव झाला असें पाहून ) योगी याचे चरण वंदन करून ह्मणते ) महाराज, आज मजवर आपले अनंत उपकार आहेत. आपण प्रत्यक्ष श्रीशं

करच माझें संकटसमयीं प्राप्त होऊन मला पुत्रदा
न दिलें

योगी- वत्से सुमती सांगतो श्रवण कर. या बालकाचें नामा
भिधान भद्रायू असेंमी ठेविलें आहे. हा सर्वस्वी तु-
झ्या सुखास कारण होईल.

ओव्या

हाराजपुत्रनिश्चित॥लोकांत प्रगटोंनेदिमात॥
हाहोईलविद्यावंत॥चतुःषष्ठीकलाप्रवीण॥१॥
ऐसेंशिवयोगीबोलोन॥पावलातेथेंचिअंतर्धान॥
गुरुपदांबुजआठवून॥सुमतीसद्गदक्षणक्षणीं॥२॥

( योगी अंतर्धान पावतो. )

( गुरु वियोगानें सुमती सद्गद होते तिचे पद्माकर शांतव-
न करून सर्व आनंदमय होऊन पद्माकर भद्रायूस घे
ऊन आपले महालीं जातो )

## प्रवेश ३ रा

स्थल .... पद्माकराचा वाडा

पात्रें

पद्माकर, भद्रायु व सुनय

पद्माकर- वत्सा भद्रायू हा माझा पुत्र सुनय तुज समवेत
क्रीडा करण्या करितां तुझे स्वाधीन केला आहे, तर

उभयतां आनंदानें निष्कलह क्रीडा करीत जा बरें.

भद्रायू- हे ताता वारंवार सद्गुरुचरणांबुज हृदयीं वागवून परमेश्वरस्मरणीं सावधान असावें त्याविना दुसरी क्रीडा ती कोणती करणें आहे. कर्ममार्ग विद्याभ्यास करण्याचा परंतु त्याजला अधिकार प्राप्त झाल्यावांचून उपयोगीं नाहीं. आह्मा क्षत्रियांची क्रीडा हीच कीं, मृगया करावी, व्याघ्र सिंहादिक दुष्ट पशूंचें हनन करावें. दुष्टांचा नाश करून सुष्टाचें पालन करावें.

पद्माकर- हे बालका धन्य आहेस. ज्या कुलामध्यें तुझें जनन आहे तदनुसार तूं जीं कृत्यें कथन केलीस हीच योग्य आहेत. आतां तूं सज्ञानत्व पावलास त्यापेक्षा तुझा आणि सुनय याचा वृतबंध करून वेद मार्ग उचित कर्मे करण्याचे अधिकारी करितो बरें (पद्माकर अमुप द्रव्य खर्च करून उभयतांचा वृतबंध आचार्यांचे अनुमतें करिता झाला.)

भद्रायु- (मौंजीबंधन झाल्यानंतर अल्प काळांतच सर्व विद्या संपादन करिता झाला.)

---

## प्रवेश ४ था.

स्थल .... सुमतीचे गृह

पात्रें

## भद्रायु, सुनय सुमती

**सुमती**- ( नित्यकर्म उरकून गुरुपदांबुजांचे ध्यान करीत आहे इतक्यांत भद्रायु सुनयासह प्रवेश करितो )

**भद्रायु**- ( मातुश्रीतें वंदन करून ह्मणतो ) माते आज मानसाचे ठायीं अशी इच्छा आहे कीं, सुनयमित्र याजला समागमें घेऊन मृगये करितां अरण्यांमध्यें गमन करावें. तर जाण्या करितां आज्ञा असावी.

**सुमती**- अरे वत्सानों तुह्मी उभयतांही अज्ञान आहा. वनामध्यें अनेक सिंह व्याघ्रादिक महान महान हिंस्र पशू असतात. बालकानों त्या वनचरांनां पाहून भीति पावाल, भलताच दुराग्रह धारण करूं नका.

**भद्रायु**- मातुश्री, तुझ्या कृपें करून आणि सद्गुरु प्रसादें करून प्रत्यक्ष काळाकाही शासन करण्याचें शरीरामध्यें सामर्थ्य आहे. आपली आज्ञा ग्रहण करावी इतकाच हेतू आहे आज्ञा देणें असेल तर दे. न दिली तथापि कुळाला उचित जो मार्ग तो आचरण करण्यास आज्ञा नसली तथापि शास्त्र मार्गानें बाध येत नाहीं.

**सुमती**- ज्यापेक्षीं तुह्मी दुराग्रहच धारण करितां त्यापक्षीं जा परंतु फार भयंकर अरण्यात जाऊं नका आणि फार

लवकरच परत या बरें

भद्रायु- मातुश्रीते वंदन करून सुनया सह वर्तमान शिकारी करितां निघून जातो.

---

## प्रवेश ५ वा.

स्थल ००००० अरण्य

पात्रें

भद्रायु, सुनय आणि वनातील श्वापदें

भद्रायु- मित्रा सुनया, पाहिलेंस ना काय या अरण्याची शोभा अहे वसंत ऋतुमध्यें अनेक वृक्ष कसे फलपुष्पें इहीं करून लीन जाहले आहेत. याजवरून कसा मंदमंद सुगंध वायू वाहत आहे तेणें करून शरीरास किती बरें आनंद होत आहे.

सुनय- हे प्रियकरमित्र मुगुटमणे भद्रायु आज तूं नरपतीसुत या स्थळीं प्राप्त झालास ह्मणून हे सर्व वृक्ष, फल, पुष्परूप संपत्तिचा तुला करभारच देऊन तुझ्याचरणीं लीन झाले आहेत. या प्रमाणेंच तूं गुरुभक्त आणि ज्ञानी असें समजून वायू, देव तुझे श्रम परिहार करण्या करितां मंदमंद वाहात आहे. जलदेवतांनीं तुज करितां हीं सर्व सरोवरें प्रपूरित केलेलीं आहेत यांत आश्चर्य तें काय !

भद्रायु- शाबास, शाबास, सुनया तुझ्या वाक्यरत्नमाळें करून मी कसा भूषित झालों आहें. बरें चला आतां सन्मुख महान महान पशु दिसत आहेत तिकडे गमन करूं या (उभयतांही पुढें गमन करितात व यांजला पाहून भयभीत होत्साते श्वापदें उठतात.

## कटाव

घेउनि सर्वे सुनयास।। भद्रायु करी मृगयेस ।। ध्रुव।।
सिंह व्याघ्र आणीक वनकरी।। वनगायी मृग दुजीं भेकरीं।। जंबुकशशकांच्या त्याहारी।। श्वेत वानरी पीतकेसरी।। साळू भालू आणिक सारी।। कस्तूरी मृगवनमार्जारी।। कपोत आणिक काकाकूवे।। होले चिमण्या गीध पारवे।। राजहंस बहु उंचसारवे।। नीलकंठ ते मयूर बरवे।। रानकोंबडी कवडे रावे।। असंख्य वनचर किति वर्णावे।। संहारित बहुत पशूंस।। काननीं फिरे आस मास।।
घेउनि सर्वे सुनयास।। भद्रायु करी मृगयेस।। १।।

या प्रमाणें अनेक पशुपक्षी यांचा संव्हार करून समागमें कांहीं मृग, सिंह, व्याघ्र इत्यादि घेऊन स्वगृहाप्रत गमन करितात.

## प्रवेश ६ वा

स्थल ...... सुमतीचें गृह

पात्रें

सुमती, भद्रायु, शिवयोगी, पद्माकर, सेवक

सुमती- बालक मृगये करितां अरण्यांमध्यें गेलेला असून अद्याप येत नाहीं. कोण आहेरे सेवक जाबरें सामोरा आणि येत आहेत का पहा.

( सेवक जातो भद्रायु व सुनय प्रवेश करितात. )

भ॰ व सु॰ - ( एका एकीं येऊन मातोश्रीतें वंदन करून सर्व शिकार करून आणीलेली दाखवितात. ती पाहून माता हर्षभरीत होते ) इतक्यांत शिवयोगी त्यास्थळीं प्रगट होतो. व पद्माकर प्रवेश करितो. )

सुमती- सद्गुरु चरणीं पुत्रासमवेत लीन होते आणि आसनारूढ करून यथाविधी पूजन करितात.

पद्माकर- स्व पुत्रा समवेत योगी चरणी प्रणिपात करून आशिष ग्रहण करितात.

योगी- वत्साभद्रायु तुजप्रत आनंत कल्याण असो, कां कुशल आहेसना ?

भद्रायु- महाराज एक आपले चरणाची कृपा असल्याच्या योगानें सदोदित आनंद भरीत मातृसेवा करून क्षेम आहें.

**योगी-** धन्य धन्य सुमती तुझे भाग्यास पार नाहीं. केवळ वाचस्पती समान पुत्ररत्न प्रसवोन याजगीं धन्य-जाहलीस.

**सुमती-** महाराज मी हतभागी मला पुत्र कोठून असाव-याचा परंतु एक आपले चरण रूपेंकरून मी पुत्रव-ती आहें हा सर्व प्रसाद आपला आहे.

**योगी-** बालका भद्रायु आतां तूं सज्ञान झालास, अल्प कालांमध्यें स्वराज्य पावसील, मानसीं चिंता धारण करूंनको तुला वर्तमान कालास अनुसरून नीति सांगतो.ही श्रवण कर.

## श्लोक

श्रुतिस्मृतिआणिपुराणउक्ती।। घ्यावीसदांमानसिधर्मनीती ।। जयापथेंसज्जन लोकगेले ।।तूंजापथें त्या समतेशि तोले ।। १ ।।

श्रुति स्मृति पुराणोक्त जी नीति आणि धर्म आहे. त्यातें अनुसरून वर्तमान करावें महान महान सज्जन ज्या पथानें गेले त्याच मार्गानें आपणआचरण करावें गोब्राह्मणाचें पालन करावें सर्व चराचर या मध्यें शंकरच वास्तव्य करित आहे. असें जाणून आपला स्वधर्म आणि वर्णाश्रम हा किमपी सांडूनये कोणतेही गोष्टीचा पूर्णपणें विचार के-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



त्यावांचून शब्दोच्चार करूं नये, वशपथ करूं नये. विद्यमानकाळीं आपल्यास शत्रू किती आणि मित्र किती आदा काय व खर्च काय आपले सामर्थ्य किती, सेवकजन कोणत्या प्रकारें करून नित्य वर्तन करितात. त्यांच्या वर्तना पासून यश प्राप्त होईल किंवा आपयश याचा शोध वारंवार करीत असावा. अतिथी, देव, मित्र, स्वामी, अग्निहोत्री, विद्वान या प्रमाणेंच सत्कर्माचरण करणारे या सर्वांचा यथाकाळीं समाचार घेत असावा. माता पिता आणि यती यांची निंदा प्राणांतीही करूं नये.

## आर्या

कांताशिशुदासअरी, यांचिउपेक्षाक्षणेकहीनकरीं॥
तैसाचरोगजाणें;करुनी॥हानीक्षणांतहीनकरी ॥१॥

भार्या, पुत्र आणि रोग यांजला अपराधानुरूप शासन तत्कालच करावें. उपेक्षा केली असतां हानी करून हीनत्वाप्रत पाववितात. वैश्वदेव समयीं अतिथी प्राप्त झाला असतां त्याजला भोजन द्यावे परंतु परपीडा कधी करूं नये, परोपकार करीत जावा. जनांची निंदा न करितां सर्वदा शिवस्मरणीं सावधान असावें षड्रिपूंची जीं जीं स्थानें कथन करितों त्यात्या स्थानीं त्यांजला ठेवावें. स्व स्त्रीशी काम ठेवावा. क्रोधें करून शत्रूस दंड


करावा. विप्रादिक साधू संत यांचे चरणीं लीन असावें. द्वेषी असतील त्यांजशीं मद ठेवावा प्रापंची शत्रू अस तील त्यांजशी मत्सर ठेवावा. दुर्जनासी दंभ ठेवावा. आणि अहंकारें करून पृथ्वी जिंकावी. ईश्वरेच्छेनें सज्ञानी अलभ्य मानवी तनू प्राप्त झाली आहे हिचें सार्थक करावें कशानें तें सांगतों श्रवणकर. चरणांनी यात्रेचे ठिकाणीं व देवालयीं गमन करावें हस्तें करून सत्पात्रीदान व शंकराचें अर्चन घडत असावें वाचेनें अहर्निशी शिवस्मरण घडत असावें, कर्णानी पुराणा दिक भगवल्लीला श्रवण करावी, त्वचेंकरून संतासीं आलिंगन घडत असावें, शिवध्यान अवलोकनीं नेत्र सादर असावें, घ्राणेंकरून शिवनिर्माल्य अवघ्राण करावा. या न्यायानें सर्व इंद्रीयें परमेश्वर प्रीत्यर्थ सत्कारणीं ला वून धन्यता पावावें.

भद्रायु- महाराज, आपली आज्ञा प्रथमच झाली आहे कीं, वेदशास्त्र संमत जो मार्ग तो आचरण करावा. तर वेद आणि शास्त्र यांचा अभ्यास मजला अधिकार प्राप्त झाल्यावर मी केला आहे. त्यामध्यें ज्या प्रमाणें सर्व नि ति आपण कथन केली असाच सर्व नीतिमार्ग दाख विलेला आहे. मजला श्रीगुरु आज्ञा प्रमाण आहे अ नितीनें कधिही गमन होणार नाहीं.

**योगी –** बालका तुझीं मधुर वचनें श्रवण करून मानसीक साआल्हाद होत आहे वत्सा तुजला शिवकवच मंत्राचा उपदेश करितों. या मंत्रेंकरून भस्म अभिमंत्रून सर्वांगी लेपन करून महान रणांगणीं गमन केलें असतां शस्त्रास्त्र बाधा तुजला होणार नाहीं. (मंत्राचा उपदेश करून) भद्रायु या वेळीं तुलामी प्रसन्न आहें. जी जी इच्छा असेल ती पूर्ण करूनघे माग माग माग.

**भद्रायु-** महाराज, मी सर्वस्वींच आपला आहें मग मागणें तें काय आपण सदय हृदयानें जें याल त्यांत मी संतुष्ट आहें.

**योगी –** वाहवारे वाहवा !!! एकून माझ्यावरच का ठेवितोस कांहीं चिंतानाहीं. बालका तुजला हा एक शंख आणि खड्ग देतों हा ग्रहण कर (म्हणून योगी देतो व भद्रायु घेतो) या शंखनादें करून तुझे सन्मुख जे शत्रू असतील ते मूर्छा पावतील आणि शत्रूंप्रत हा खड्ग नग्न करून दाखविला असतां शत्रूसमूह तत्काल दग्ध होईल आणखी तुजला द्वादश सहस्त्र गजांचें बळ माझ्या वरदें करून प्राप्त होऊन यश, श्री कीर्ति यांतें पावशील व भूमंडळीं सर्व रायांत तूं श्रेष्ठ होशील. (याप्रमाणें आशीर्वाद सह वर्तमान शंख खड्ग व द्वादश सहस्त्र गजांचे बळ देऊन योगी तत्काल अंतर्धान पावतो. योगी याच्या वरप्रसादें करून आनंदभरीत होत्सातीं कुलदेवतेचें पूजन करण्यास सर्व जातात)



राज-मंडळ
भद्रायु
हेमरथ
रणभूमि.
सुनय.
भद्रायु.

# भद्रायुसत्वदर्शन नाटक

## अंक ४ था.

### पात्रें

| | |
|---|---|
| सूत्रधार | नाटककर्ता |
| नट | त्याचासोबती |
| हेमरथ व त्याचे प्रधानादिक | मागधदेशाधिपति |
| वज्रबाहु व त्याचे प्रधानादिक | दशार्णदेशाधिपति |
| चारजन | वर्दिसांगणारे |
| सुमती | वज्रबाहुची स्त्री |
| भद्रायु | सुमतीचा पुत्र |
| पद्माकर | वैश्य |
| सुनय | पद्माकराचा पुत्र |
| चित्रांगद | नैषधपुराधिप |
| सिमंतिनी | त्याची स्त्री |
| किर्तिमालिनी | चित्रांगदाची कन्या |
| योगी | शिवयोगी |
| चंद्रकला व कुमुदिनी | वज्रबाहुच्या स्त्रीया |

ज्योतिषी, सख्या, पौरजन, समस्त राजमंडळ, कुळोपाध्याय, वाटोळे, रामजोशी इत्यादि.

## अंक ४ था

### प्रवेश १ ला

स्थल .... रंगभूमि

पात्रें

सूत्रधार व नट

**नट** – गंमत, गंमत, गंमत उडाली सूत्रधार काय योग्याचें देणें, बाराहजार हत्तीचें बळ शंख आणि खड्ग भद्रायुला दिलें थोराचें सर्वच थोर. बरें तुह्मी मला एका ढेंकुणा इतकें तरी बळ देऊं सकाल काय.?

**सूत्रधार**– विदूषका, किती अज्ञान आहेस. अरे, जगांमध्यें साधूं सारखा श्रेष्ठ कोण आहे परमेश्वराचे हातून ही जें कृत्य घडणें अशक्य तें साधूचे वचनमात्रें करून होतें, आतां पुढें भद्रायुचे हातून शत्रूपराजय होऊन त्याचा विवाह आणि वज्रबाहुसी आनंदाची भेट याचा खेळ करून दाखवितों अवलोकन कर.

---

### प्रवेश २ रा

स्थल .... मागधदेश

पात्रें

हेमरथ, प्रधान सेनापति

**हेमरथ**–( प्रधाना समवेत सभा स्थानीं राज्य कारभार पहात

असतां प्रधान सेनापति यांजला सर्व सैंन्य शस्त्रास्त्रांस मवेत सिद्ध करण्याची आज्ञा करितो. )

**प्रधान**- महाराज, आज्ञेंप्रमाणें सर्व सैन्य चातुरंग दळभार सिद्ध आहे. स्वारीची तयारी कोणीकडची ती मात्र आज्ञा व्हावी.

**हेमरथ**- प्रधानजी, या भूमंडळावर जन्मास येऊन कांहीं तरी कीर्ति मिळवूंन प्रख्यात व्हावें. आज मानसाचे ठायीं अशी इच्छा उत्पन्न झाली आहे कीं, दशार्णदेशाधिपति वज्रबाहु याजकडे आपणाकडून करभार जात असतो तो बंद करावा आणि आज त्याचे नगरावर स्वारी करून सर्व संपत्ति गो अश्वशाला हरण करून आणाव्या कां सेनानीं या गोष्टीस तुझी अनुमती आहे किंवा नाहीं.

आर्या

मानशिऐसी इच्छा आहे कीं वज्रबाहुनृपतीशी ॥
युद्ध द्वंद्व करोनी जिंकुनियाआणुसर्वसंपतिशी ॥१॥

**सेनापति**- महाराज विनंती करितों श्रवण करावी. वज्रबाहु केवळ वृद्ध असून त्याजला साह्यकरणाराही पुत्र अथवा बंधु नाहीं. एकाकीं आहे अशाचा पराजय करण्यास अशक्यता आहे अशी गोष्ट नाहीं. मजलाच आज्ञा दिली असतां मीजाऊन त्याराजाचा पराजय करून सर्व संपत्ति हरण करून आणितों.

**प्रधान**- हे नरवर मुगुटमणे माझाही विचार असाच आहे कीं,

श्लोक

मनांतमाझ्या बहुदीनहोतें ॥ जिंकूनियावज्रबाहुनृपातें ॥
संपत्तित्याचीतिसारीहरावी॥ भूमंडळीकीर्तितुह्मीवरावी॥ १॥

मम मानसीं पुष्कळ दिवसांपासून वज्रबाहुविषयीं विचार आला होता परंतु आज्ञा होईल नहोईल यास्तव बोललों नव्हतों. आज सरकारचे मनामध्येंही गोष्ट आली आतां चिंता नाहीं

आर्या

अगणितसैंधव[1]वहितसे दिग्गज आणिअयूततेरथिह्मो ॥
स्वामीकार्याझटुनी मानितिनिजआसेवासजेंरतिह्मो ॥ १ ॥

अश्व, गज, रथि, महारथी इत्यादि सर्व तयारी आहे. चालावें महाराज.

**हेमरथ**- फार उत्तम आहे (प्रस्थान करून सर्व सैन्यासहवर्तमान निघून जातात. आणि वज्रबाहुचें गोहरण करून शहरावर स्वारीची ढाल देतात.)

---

## प्रवेश ३ रा

स्थल दशार्णदेश वज्रबाहुचेंनगर.

बज्रबाहु, प्रधान व चारजन

---

१ घोडे. २ प्राणासरतिसमान.

**वज्रबाहु**- नित्य क्रमा प्रमाणें राज्यासनारूढ असून सर्व प्रधानादिक कामदार यांजकडून राज्य कारभार समजून घेत आहे इतक्यांत चारजन प्रवेश करितात.

**चारजन**- महाराज चरण कमलीं लीन आहों.

**राजा**- हे चारजनहो तुह्माप्रत कल्याण असो. काय न्युनाधिक्य आहे नित्यक्रमाहून आज अकाळीं प्राप्त होण्याचें कारण काय बरें.

**चारजन**- महाराज नगरा बाहेर अफाट सैन्य घेऊन कोणी हेमरथ या नामें करून राजा प्राप्त झाला आहे त्याणें आपले सर्व गोहरण केलें. कांहीं वेळानें नगरा भोंवती सैन्याचा वेढा देणार तर फार त्वरा झाली पाहिजे.

## ओंव्या

**चारजन ह्मणती राया लागुन॥ हेमरथें केलें जी गोहरण ॥**
**युद्ध इच्छा करुनी धारण॥ पातलासे नगर द्वारीं ॥ १॥**
**आतां सत्वरी करावी त्वरा॥ नातरीं न दिसे प्रांत बरा ॥**
**हरालत द्रव्य जरी सारा॥ तरीं थारा येथें घडे ॥ २ ॥**

**राजा**- ( कोपाविष्ट होऊन ) काय प्रधान हाय: कश्चित हेमरथ आपले मांडलिका पैकीं असून मदांध होऊन माझें राज्य हरण करण्या करितां प्राप्त झाला आहे काय? सत्वर युद्धाची सिद्धता कर आणि नगर दुर्गावरून उल्हाट यंत्राचा भडिमार सुरू करीव.

छंद

सिद्धसारि द्वारि असे सेना योजिली ॥
शत्रुसन्निधानि असे ढाल दाधली ॥
आज्ञावेगीं द्यावी मज लागीं भूपती ॥
संहारुनि सर्व शत्रु येतों संप्रती ॥ १ ॥

महाराज, सर्व सैन्य शस्त्रास्त्रां समवेत सिद्ध आहे. नगर दुर्गावरून उल्हाट यंत्राचा भडिमार सुरू केला आहे. यादासाला आज्ञा असावी क्षणामध्यें जाऊन शत्रूचा पराजय करून प्राप्त होतों

राजा- प्रधाना त्या सान्या गोष्टी खऱ्या, परंतु ज्यापेक्षां हेमरथ स्वताहा प्राप्त झाला आहे त्यापेक्षां मीही तुझे साह्यार्थ येतों (रथांत बसून सैन्यासह वर्तमान निघून जातात.)

---

प्रवेश ४ था

स्थल........ रणभूमि

पात्रें

हेमरथ सैन्यासह व वज्रबाहु सैन्यासह

वज्रबाहु- (सन्मुख हेमरथास अवलोकन करून) हे हेमरथा अद्याप तूं प्रौढ दशे प्रत पावलास नाहीं जवळ सचिवादिक आहेत ते ही समवड्‌ आणि मर्जिप्रमाणें बोलणारे

---

१ खरित

असे होत अरे, मजसमागमें युद्ध कांक्षा धारण करून प्राप्त झालास. अधमा तुला लज्जा कशिरे नाहीं. वाटत तूं माझा मांडलिक असून करभार देणारा. मूढा तुजस मागमें युद्ध काय करणें आहे. तुजला प्राणदान देतों आ त्या मार्गे करून गमन कर.

**हेमरथ-** हे थेरड्या आजपर्यंत अनेक राजे जिंकिलेस तेणेंक रून तुझ्या शरीरामध्यें गर्वरूपी कवच जडलें आहे तें आ ज छेदन करितों, आह्मा क्षत्रीयांचा धर्मच आहे कीं, पर राज्य स्व पराक्रमें करून हरण करावें आणि कीर्ति मिळ-वावी. आज तुझे आयुष्य पूर्ण झालें असें समज आणि युद्धास सिद्ध हो मुखानें व्यर्थ वल्गना करण्याचें कारण नाहीं.

**वज्रबाहु-** हे प्रधाना अवलोकन काय करितोस. या हेमरथाला मृत्यु समयीं फांटा फुटला आहे, तर याची उपेक्षा करू न उपयोग नाहीं. सर्व सैन्यासहवर्तमान एकदम उठाव करावा. (उभय दळें एकवटतात आणि निकरानें संग्रा-म होतो. हेमरथ पाशघालून प्रधाना सहवर्तमान वज्र बाहूस धरितों.)

**हेमरथ-** **ओवी.**

**हेमरथ आज्ञापी प्रधानास॥ रथीं बांधा या उभयतांस॥**
**संपत्ति आणि राणी वस्त्रास॥ हरण करूनी आणावें गीं॥१॥**

हे प्रधाना या उभयतांस एका रथावर बंधन करून ठेव

आणि राजपत्न्यांसह वर्तमान सर्व संपत्ति हरण करून आण.

**प्रधान-** आज्ञेप्रमाणें करितो. नंतर जयवाद्यांचा ध्वनी करीत स्वनगरीं जाण्याकरितां मार्गे फिरतो.

**वज्रबाहु-** परम दुःखीत होत्साता. हे प्रधाना पाहिलेसना कर्माची गति कशी गहन आहे ती. अरे ज्या मी स्वपराक्रमें करून शतावधी क्षत्रियांचा रणांगणीं पराभव करून सार्वभौमत्व पावलों त्या मला आतां वृद्धपणी असें संकट यावें काय? जर यावेळीं मजला पुत्र अथवा बंधु असता तर साह्य करता परंतु परमेश्वरानें ती ही आशा ठेविली नाहीं. आतां मी कोणाची रे वाट पाहूं या दुःखांतून कोण सोडवील.

**प्रधान-** "भवितव्यं भवद्भिश्च" हे नियम कधिही चुकणार नाहीत. त्याविषयीं शोक करून काय उपयोग आहे. ( याप्रमाणें सशोकांतःकरणानें जगदीशाच्या स्तवकरितात.

---

## प्रवेश ५ वा

### स्थल.... पद्माकराचें नगर.

### पात्रें

### सुमती, भद्रायु, सुनयव पद्माकर.

**सुमती-** प्रातःकाळीं नित्यक्रमाप्रमाणें पुत्र शिकारीस गेले-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ला दोन प्रहर होऊन गेले तरी प्राप्त होत नाहीं ह्मणून सचिंत बसते. इतक्यांत भद्रायु वसुनय प्राप्त होतात.

भद्रायु- मातेप्रत वंदन करून विश्रांतीनें व्याप्त होत्साता) मातोश्री आज मृगया करण्यास्तव अरण्यामध्यें गमन करीत असतां अनेक अपशकून होऊं लागले. तसाच अग्रभागीं गमन करीत असतां पांथिकजनाचे मुखें करून अशी वार्ता श्रवण केली कीं, कोणी हेमरथ या नामें करून महान प्रबल राजा होऊन त्यानें माझे पित्यास युद्धीं पराभवून प्रधाना सहवर्तमान धरून नेत आहे आणि सर्व संपत्ति हरण केली तर देदे सत्वर आज्ञा दे एक क्षणामध्यें जाऊन शत्रूचा निःपात करून प्राप्त होतों.

सुमती- हें वर्तमान ऐकून शोक करीते, हरहर परमेश्वरा, माझे प्राणनाथ ह्मणजे कसे धीरगंभीर, उदार, सुशील, महान रणपंडित असतां आज शत्रूनें याला कसा रे घातला ! गुरुप्रसादें करून एक दुःखांतून मुक्तिच मुक्तता होत आहे तंव हें विपरीत ऐकू आले.. काय हा अनर्थ.

भद्रायु- मातोश्री, शोक करण्याचें कांहीं कारण नाहीं मीही वार्ताश्रवण करून तसाच गमन करणार होतों परंतु फक्त एक तुझी आज्ञा ग्रहण करण्या करितां प्राप्त झालों आहें तर सत्वर आज्ञा दे, विलंब करण्याचे कांहीं प्रयोजन नाहीं.

सुमती- बाळका तूं केवळ अज्ञान सकुमार युद्धप्रसंग कधीही अवलोकन केलेला नाहीस. अफाट शत्रूसैन्यावरती एकाकी रथ सारथ्या विरहित कसारे जाशील.

भद्रायु- माते सांगतो श्रवण कर. आज याबाल्काचे शरीरामध्यें श्रीगुरुच्या आणि तुझ्या कृपें करून इतकें सामर्थ्य आहे कीं, या भूभागीं जर एक लत्ताप्रहर करीन तर धरत्री रसातलास नेऊन मिळवीन आकाशीं भ्रमण करणारे चंद्र सूर्य यांची स्वपराक्रमें करून गति बंद करीन तूं मला बालक ह्मणतेस परंतु

श्लोक

वाटतो तुलाच बाळ काळरूपशत्रुतें ॥
जाउनी क्षणीं रणीं करीन भस्म शत्रुतें ॥
मानसीं तुझ्या पदा, वध्याउनी उमावरा ॥
युद्धि आजतोषवीनत्यासमभ्रनिर्जरा ॥१॥

सुमती- बाळका संगाती सुनय याजला घेऊन जा आणि वि-जयी होऊन लवकर ये बरें.

भद्रायु- मातोश्रीची आज्ञा होतांच वंदन करून

पद

आज्ञाघेउनिया मातेची मग भद्रायु निघत असे ॥
योगी दत्त कवचासिलेत असे ॥ ध्रु० ॥ करोनियां-
स्नान गुरुपद पूजन मानसी करीत असे ॥१ ॥ चिमणें

धनुर्बाण शोभती हातीं खड्ग शंख घेत असे ॥ २॥
शिवभक्त भासत केवळ शिवसम वीरश्रीनें विलसे
॥ ३॥ सुनय वीरासह मनवेगें मार्गक्रमीत असे॥
योगीदत्त कवचा सिलेत असे ॥ ४॥

सुनय वीरास समागमें घेऊन स्नान करून शंख खड्ग धनुर्बाण हस्ताचे गायीं धारण करून गुरु पदांबुजाचें ध्यान आणि मातोश्रीतें वंदन करून निघतो. (उभयतांही रण भूमिसमीप येतात.

---

## प्रवेश ६वा

स्थल ........ रणभूमि

पात्रें

भद्रायु, सुनय, हेमरथ, ससैन्य. वज्रबाहु व प्रधान

भद्रायु– हे मित्रा सुनया सन्मुख गज, रथ, वाजी आदिकरून दलभार गमन करीत आहे तेणें करून रजांनी दिशा धूसर दिसताहेत हाच शत्रू संभार तर नव्हेना?

सुनय– विरोत्तमा भद्रायु, यावेळीं तुझे क्रोधें करून नेत्र कसे आरक्त दिसताहेत, बाहू स्फुरण पावताहेत. तुझें हें उग्र तेज आणि रूप अवलोकन करून मलाही भीति उत्पन्न होत आहे. अग्रभागीं अवलोकन कर, ही रणभूमि लक्षावधी प्रेतें पडलीं आहेत, रक्तसरिता वाहत

आहे यावरून याच ठिकाणीं दारुण संग्राम होऊन अग्र भागीं गमन करीत आहेत ते शत्रुच असावे असें वाटतें.

भद्रायु- शत्रूचें नाम श्रवण करून अत्यंत कोपाविष्ट होत्साता) अलअलअल सुनया हाच शत्रू संभार काय? धनुष्य सज्ज करून शत्रूस अनुलक्षून सिंहासारखी गर्जना करितो.)

## ओव्या

ऐकऐकरेमागधा॥ अज्ञानतस्करामतीमंदा॥
फिरेंमाघारातुझाचेंदा॥करितोंआजसमरंगणीं॥ १॥
वज्रबाहूऐसीदिव्यवस्त॥चोरूननेतारेतस्करसमस्त॥
आजकरितोतुमचानिःपात॥ सावधानअसावें॥ २॥

## छंद

(त्रिवट)

पाचारुनीभद्रायुमागधातें॥क्रोधावेशेंबोलतसेत्यातें॥
दावितूझावीक्रमजलागीं॥यमपंथेधाडितोंतुजलागीं॥ १॥
मांडूनिठाणबाण सोडीत। भेदिलेंशत्रुदळ समस्त॥देतहा
कतेणेधाकवाटतसे।शत्रुला यम समगमत असे॥ २॥

अरे दुष्टा मागधा वज्रबाहु महान पराक्रमी वसुशील असतां आज त्याचे वार्धक्यावस्थेंत निर्दया घाला घालून चौर्य कर्म करून पलायन करितोस काय आजवज्र बाहूचे साह्यार्थ आह्मी प्राप्त झालों आहों तर मा-घार। फीरून तुझा जो कांहीं पराक्रम असेल तो दस्य

कर मूढा तस्करा तुझें आज नासिक कर्ण आणि करच रण छेदन करून टाकितों (असख्य बाण वृष्टी करितो)

**हेमरथ-** अनेक बाणांची वृष्टी व घोर गर्जना श्रवण करून ह्मणतो, हे प्रधान वज्रबाहुचे साह्यार्थ तर येण्यास कोणीही नसून हे दोघे दिसताहेत हे कोण बरें असावे.

**प्रधान-** महाराज, हा समय येथें विचार करण्याचा नाहीं. करण त्या वीरांच्या असंख्य बाणवृष्टीचे योगें करून शत शः सैन्य नाश पावत आहे. यास्तव माघारे फिरून त्यांजशी समर करणें हें उचित आहे.

(सैन्यासह वर्तमान हेमरथ माघारा फिरून उभयतांसी सन्मुख होतो.)

**हेमरथ-** हे उभय किशोरानों तुह्माप्रत अवलोकन करून माझे हृ दयीं दयाउत्पन्न होत आहे. तुह्मी सकुमार बालकें असून जावत्काळपर्यंत माझे धनुष्यापासून बाण सुटला नाहीं तावत्काळच दृष्टी गोचर होत आहां. नाहीं पेक्षा एकाशरें करूनच तुमची तनू छिन्नविछिन्न होईल आणि तुमचे मातापितर तुह्मा करितां शोक करितील तरप्राणदान देतों स्वस्थानीं गमन करा.

## आर्या

हे शिशुनो तुह्माला सदयपणें प्राण दान मीं देतों ॥
तूर्ण स्वगृहिं जावें मत्करशरें पुरव भेद लानातों ॥ १ ॥

१ मुलानो, २ लवकर, ३ माझे हातचा बाण,

भद्रायु- छिः मूढा मिथ्यावाग्जल्पन करण्याचें कारण नाहीं आ ह्मी तुला बाळ दिसतों परंतु आज तुझे काळच प्राप्त झा लों आहों असें समज. तृणाचे जरी पर्वत असले तथा पि जों पर्यंत अग्नीचा इषन्मात्र स्पर्श झाला नाही तों पर्यंतच दिसणारे आहेत. दिग्गज जरी शरीरानें स्थूळ आहेत तथापि सूक्ष्म सिंह त्यांचे गंडस्थल विदार ण करितो मूर्खा आज आह्मीं कसे वीर सिंहा प्रमाणें आहों. वनगजा प्रमाणें यः कश्चित तुझें शरीर हेंच गं डस्थल विदारण करण्याला काय उशीर लागणार आहे.

आर्या

हे मूढा तव संगति भाषण करणों वृथा मला वाटे ॥
छेदुनि तव कर चरणा लाविन सकळांहि मृत्युच्या वाटे ॥ १ ॥

हेमरथ- हे प्रधान या कारट्यांना बोधाच्या गोष्टी सांगून उपयोग नाहीं. अवलोकन काय करितोस. एका बाणें करून यांचा नाश करून टाक.

प्रधान- ( आज्ञे प्रमाणें ) युद्धास सिद्ध होतो.

सुनय- हे वीर मुगुटमणें भद्रायु हा प्रधान युद्धा करितां प्राप्त हो त आहे, याजसी युद्ध करणें हें तुला विहित नव्हे हा माझा भाग आहे तर मला आज्ञा दे याचा क्षणांत नाश करितों.

भद्रायु- फार उत्तम आहे सुनया विजयोस्तु ( ह्मणून मानसीं गुरु पदांबुजांचें ध्यान करून शंखनाद करितो. )

केका

तदां भडकती बहु हय तसेच तेही करी ॥ नमू
नि गुरुत्त्यापदी जेरुजवादना जेकरी ॥ बहूत अ
रि कांपती तरु जसे वनी डोलती ॥ तसीच लेंध
राफणींद्रसिरि तोलवी खालती ॥ १ ॥

आर्या

शंखध्वनि ऐकुनियां थरथरथर कांपलेंच दळ
सारें ॥ कांहीं मूर्छित पडले खधाकें नष्टलेंच
बळ सारें ॥ १ ॥

**सुनय-** शाबास शाबास भद्रायु धन्य असो, तुझी; फक्त शंख ध्वनी मात्र केलास तेवढ्यानेंच शतशः वीर मूर्छित पडले, रिते रथ भडकताहेत. मित्रा शत्रूनी रथारूढ असून आपण पादचारी युद्ध करावें यापेक्षां जर आज्ञा देशील तर यांतून उत्तम दोन रथ आणितों. ( भद्रायु आज्ञा देतो आणि दोघेही रथारूढ होतात. )

**प्रधान-** हेमरथ महाराज अद्याप परयंत बालकांसीं युद्ध प्रसंग तर झाला नाहींच. परंतु फक्त त्याचे शंखनादानें सर्वसैन्य कंपायमान होऊन दाणा दाण उडाली यांच्या या दुर्घट कृत्यानें पृथ्वी सुद्धां कंपायमान होऊं लागली हें कांहीं मनुषी कृत्य नव्हे असें वाटतें.

१ घोडे, २ हस्ती, ३ शंख, ४ शत्रू, ५ कांपलेली.

## आर्या

**हरिहरअथवा हलधर[1] पवनेज[2] हेवाटतीमला आले॥ रक्षा यानिजदासा मन्मथ समसान[3] रूपहे जाहले ॥ १ ॥**

प्रत्यक्ष हरिहर अथवा बलिराम भीम किंवा अंजनी सुत या पैकी कोणी तरी हे बालवेषानें निजभक्त कैवारार्थ प्राप्त झाले असावे असें वाटतें

**हेमरथ–** हे प्रधाना तूं केवळ मूर्ख आहेस. अरे, माझ्या संन्निधयः कश्चित बालकाचा पराक्रम वर्णन करितोस, आजमाझ्या सारखा पराक्रमी या जगतीतलाचेठायीं कोण आहेरे? मूढा यापेक्षां जरी मृत्यु पावला असतास तर फार चांगली गोष्ट झाली असती धिःकार असो तुला.

**प्रधान–** महाराज कोप शांत करावा माझे मानसाचे ठायीं जी कल्पना प्राप्त झाली ती कथन केली. आज शत्रूंचा नाश करीन तरच मुख दाखवीन. ( अग्रभागीं जाऊन युद्धास आरंभ होतो.

## छंद

**अग्नि अस्त्र ते एकसोडिती ॥ मेघस्यावरी अन्य योजिती ॥ वातमेघतो शांतवी क्षणें ॥ अद्रिवातत्तो रोधिमीपणें॥ १॥**

( याप्रमाणें अनेक शस्त्रास्त्रानीं घोरांदर युद्ध होत आहे इत-

---

१ बलीराम, २ मारुती, ३ रुहान,

क्यांत वज्रबाहूचें दळ येऊन भद्रायूस मिळतें.)

## अभंग

आपले स्वामींचा केवारि सबळ ॥ ह्मणूनियां दळ मिळे बहू[1] ॥ १ ॥ पातलें जें दळ चढे त्यासी बळ ॥ कैवारि सबळ देखोनीयां ॥ २ ॥ रक्ताचि सरीता वाहतसे थोर ॥ संग्राम तो घोर होत असे ॥ ३ ॥

**हेमरथ**- वज्रबाहूचें सर्व सैन्य भद्रायुस अनुकूल होऊन घोरांदर रण चाललें आहे. जो जो वीर समर करण्या करितां भद्रायुसन्मुख जातो तो पुनरपी सजीव दृष्टीगोचर होत नाहीं असें पाहून सर्व सैन्यासहवर्तमान चोहोंकडून एकदम उठाव करितो.

**सुनय**- वीरोत्तमा भद्रायु एतावत्काल पर्यंत चाललेला उद्धक्रम क्षात्रधर्मास अनुसरून होता. एकेक वीराशीं एकेक वीर संग्राम करीत असे. त्यांत यश येत नाहीं. ह्मणून शत्रूनीं एकदम चोहों कडून उठावा केला आहे, तर यावेळीं माझ्या सुद्धां सर्वांचा साह्यकर्ता तूं आहेस.

**भद्रायु**- हे सुनया अशीं दलें जरी आणखी शतशः प्राप्त जाहलीं तत्राप श्रीगुरुप्रसादें करून त्यांचा निमिषांमध्यें नाश करीन मानसीं भीति पावूं नकोस धैर्य धारण कर (श्रीगुरु दत्त खड्ग शत्रूसन्मुख दाखवितो)

---

१ नदी.

(ओव्या.)

भद्रायूनें शिवयोगीदत्त ॥ खड्ग काढिलें तेज अद्भूत ॥
देखुनी शत्रुदळ भस्म होत ॥ निमिष मात्रें तेधवां ॥ १ ॥
मागें होता हेमरथा ॥ देखोनि जहाला भयाभीत ॥
रण सांडूनियां त्वरित ॥ पळों लागला तेधवां ॥ २ ॥

**हेमरथ**- भद्रायुनें खड्ग सन्मुख करतांच सर्व सैन्य दग्ध होऊं लागलें हें अवलोकन करून पलायन करितो.

**सुनय**- हे भद्रायु, सर्व शत्रू दळाचा निःपात झाला आहे परंतु हेमरथ पलायन करून उत्तर दिशेकडे जात आहे.

**भद्रायु**- काय (दुष्ट पलायन करितो काय ? ) खड्गास गवसणी घालून पवन वेगानें जाऊन हेमरथाची शिखा धारण करून र था खालीं ओढून पाडितो) हे हेमरथा मूढा तुच मल बालक ह्मण त होतास आतां अवलोकन कर बाळ आहे किंवा तुझा प्रत्यक्ष काळ आहे (हृदयावर लत्ताप्रहार करितो.)

## आर्या

हृदभागीं लत्तेच्या[1] प्रहरानें तो अशुद्ध बहु वमेला[2] ॥
त्यावेळीं काळापरि काळ असा असुनि बाळ त्या गमला[3] ॥ १

(सर्वत्र भद्रायुवर पुष्पवृष्टी करून जयवाद्यांचा घोष करितात.)

**सुनय**- हे विजय रत्नमाळ धारका भद्रायु जो शत्रू हस्तगत झाला त्याची आतां विटंबना करणें हें रितीहून विरुद्ध आहे तर याला प्राण दान दे.

---

१ रक्त. २ ओकला, ३ भासला,

भद्रायु- सुनया या अधमाला रथास बंधन कर आणि जी जी संपत्ति गो अश्वशाळा इत्यादि या दुष्टानें हरण केलेलें असेल तें सर्व पूर्वस्थळीं नेऊन स्थापन कर.

सुनय- आज्ञेप्रमाणें करितो.

भद्रायु- वज्रबाहु आणि प्रधान यांजला बंधनापासून मुक्त करून स्वपिता वज्रबाहु याचे चरणी मस्तक ठेवितो.

## आर्या

भद्रायुस्वपित्यातें सोडउनीतत्पदीं करीनमन ॥
कारागृहिंशत्रूतें रक्षणकरूनीकरा अरवेदमन॥ १॥

वज्रबाहु- भद्रायु आपला कैवारी असें समजून त्याजला आलिंगन देतो

---

## प्रवेश ७ वा

स्थल.... वज्रबाहूचें नगर

### पात्रें

वज्रबाहु, प्रधान, राजपत्न्या, प्रजाजन, भद्रायु व सुनय.

भद्रायु- ( रणभूमीतून स्वपित्यास अनेक मंगल वाद्यांनी युक्त सर्व दळ भारा समवेत आणून राज्यासनावर बसवितो आणि चरणीं साष्टांग प्रणिपात करितो.

## छंद

मांगलीकतीवाजतीतुरें॥त्याध्वनीसहेंस्वर्गाहिनापुरे॥

तातघेउनीनगरिंपातला॥राज्यीस्थापुनीचरणिसूद्ला॥१

**वज्रबाहु-** हे बालका तुजप्रत अवलोकून करून मोहानें माझें मन व्यास जाहलें आहे यावेळीं तूंच मला परमेश्वरा समान भासत आहेस आजमी अपेश समुद्रांमध्यें बुडत असतां मजला सर्वस्वीं तारिलेंस तुझे उपकार मजवर अनंत झाले आहेत त्या उपकारांस मी काय उत्तीर्ण होऊं. बालका तूं कोणाचा. तुझी माता पिता कोण आणि देश कोण हें सर्व वर्तमान कथन करून माझे चित्ताचें समाधान कर. मला असेंच वाटतें कीं.

## आर्या

तूंईशचि आलासी, दासाच्या धांवण्यांसि धांऊन ॥
मानसिकरुणाआणुन, बाल्यरूपें तारिलें सयेऊन॥१॥

मला असेंच वाटतें कीं, तूं प्रत्यक्ष शंकर कौतुकानें द्वादश वर्षात्मक रूप धारण करून अमानुषी असें घोर कृत्य करून मजला मुक्त केलेंस.

**राजपत्न्या-** हे बालका आज सर्वस्वी प्राणदान आह्मास तूंच दीलेंस या शरीरचर्माच्या जरीं पादुका करून तुझ्या कोमल चरणीं लेवविल्या तत्रापि तुझे उपकार फिटणार नाहींत. तर कृपा करून नाम देश इत्यादि कथन कर बरें

**प्रजाजन-** ( भद्रायुसह वर्तमान राजदर्शन करून भद्रायुचे पराक्रमाचें वर्णन करीत होत्साते आनंदोत्साहामध्यें तो दिवस क्रमण करितात.

**भ० वसु०**–हे राजचक्र मुगुटमणें आतां या दासांना आज्ञा अ सावी. शत्रूचें सौंरक्षण कारागृहीं उत्तम प्रकारें ठेवावें. ( वंदन करितात. )

**वज्रबाहु**- हे बालकानों नामदेश कथन करण्याविषयीं वारंवार मी विनवीत असतां कां बरें कथन करीत नाहीं.

**भद्रायु**- महाराज सांगतों श्रवण करा.

## दिंडी

आजपासोनीतीनदिसाआंत ॥ येउनीयां मी कथि
न आत्मवृत्त ॥ अतां आज्ञा आह्मासि जाव-
यातें ॥ तूर्णद्यावीतोषवूंस्वमातेतें ॥ १ ॥

( उभयतांही वज्रबाहूचा निरोप घेऊन रथारूढ होऊन पद्माकराचे नगरीं प्रवेश करितात.

---

## प्रवेश ८ वा.

स्थल.... पद्माकराचेंनगर

पात्रें

सुमती, भद्रायु, सुनय व पद्माकर

**सुमती**- ( पुत्र रणामध्यें गेलेला असून कांहींच वर्तमान कळ त नाहीं ह्मणून सचिंत बसते )

**पद्माकर**- सुमती, श्रीगुरु प्रसादें करून भद्रायु त्रैलोक्याला अजिंक्य आहे व्यर्थ कां मन चिंतित करितेस. ( इतक्यांत

भद्रायु व सुनय प्रवेश करितात.)

सुमती- उभय बालकांस अवलोकन करून

## ओवी

माताधांवोनउठाउठी ॥ पुत्राचेगळां घालीमिठी ॥
बहूतहर्षपावोनपोटीं ॥ निंबलोणकरीतसे ॥ १ ॥

दृढालिंगन देऊन निंबलोण करिते.

भ०वसु०- पद्माकर व सुमती यांस अनुक्रमें वंदन करितात.

प०वसुमती- बालका सुनया रणामध्यें कसा काय पराक्रम केलात आणि काय वृतांत झाला कथन करवें. प्राणनाथ खुशाल आहेत ना?

सुनय- माते धन्य धन्य असो तुझा भद्रायु कृतांतासम हेमरथाला निमिषामध्यें जिंकून स्व पित्यातें मुक्त करून राज्यीं स्थापना केली आणि त्यांची आज्ञा गृहण करून आपले दर्शनास प्राप्त झाला. आज त्रैलोक्यामध्यें भद्रायुचाकीर्तिरव गर्जत आहे.

## आर्या

धन्यअसोतवपुत्रा सूत्रामारहि क्षणांत हरवील ॥
भूपतिजिंकुनिसारे कारागृहिवासत्यांसकरवील ॥ १

फार तर कायसांगूं प्रत्यक्ष इंद्रासही स्वपराक्रमानें जिंकील अवनीचे सर्व राजे पादाक्रांत करील.

सुमती- सर्व वृत्तांत श्रवण करून

---

१ इंद्रास.

## प्रवेश ९वा

स्थल............नैषधपुर.

पात्रें

चित्रांगद, सिमंतिनी, कीर्तिमालिनी व शिवयोगी.

**चित्रांगद**-(प्रातः काळीं नित्यकर्म आटोपून स्नान करून सिमं-तिनीसह वर्तमान शिवपूजा करीत बसतो.) इतक्यांत शिवयोगी त्या स्थानीं प्रगट होतात. त्यांस अवलोकन करून लीन होत्साता पूजाकरून आसनीं बसवितो

श्लोक

पाहूनएकाकिचयोगियातें॥जावोनिसन्मूखनमीतयातें॥
देवोनियांआसनपूजिराजा॥आणीतयाचीहितशीचभाजा

हे वीर श्रेष्ठा, चित्रांगदा, हे निःसीमपतिव्रते सिमंतिनी क्षेम आहा कीं, १

**चिं० व सिमं०** - महाराज हें काय विचारावें. एक या चरणाचा प्रसाद दासांला वारं वार होत असल्यानें त्रिविधताप लयाप्रत जाऊन कुशल आहों

**कीर्तिमालिनी**- क्रीडा करीत असतां एकाएकीं येऊन गुरुपदीं साष्टांग प्रणिपात करिते.

**योगी**- आहाहा वत्से कल्याण असो मदाशीर्वादें करून या जगतीची स्वामिणी होशील. बरें. राजा ज्यावेळीं मी यास्थळी प्रा

म होतों तेव्हां तुझें मूख प्रफुल्लित असतें आज मुखश्री म्लान कां बरें दिसतें.

चित्रांगद- महाराज आपण अतिंद्रियद्रष्टे आहांत एक वृक्षाचें पर्णही आपले आज्ञेवांचून चलन होऊं सकत नाहीं माझे मनांतील हृद्गत आपण जाणतच आहां परंतु आज्ञा होते त्यापेक्षा सांगतो.

लावणी

हीममकन्या सुरुपा धन्या उपवर कीं जाहाली ॥ ध्रु० ॥
अपुंहि कोणा चिंता मजला निशीदिन बहू लागली ॥
स्वामी मजनिशीदिन बहू लागली ॥ १ ॥ पाठवुनी
द्विजराज कुलें हीं ॥ भूतलीं शोधविलीं ॥ २ ॥ शू
रपराक्रमी वीर गमेना खटपट बहु केली ॥ ३ ॥ शी
लकुलानें बाहु बलानें कीर्ति बहु जाहाली ॥ ४ ॥ ऐ
साधव इस मिळेल कैसा मनि चिंता भिनली ॥ ५ ॥ ही
ममकन्या सुरुपा धन्या उपवर ही जाहाली ॥ १ ॥

दयाघना ही माझी कन्या कीर्तिमालिनी उपवर झालेली असून कुलानें आपले समान सुस्वरूप इचे योग्य वर मिळावा ह्मणून देशोदेशीं द्विज पाठवून अनेक राजपुत्रांच्या तसबिरी आणविल्या परंतु कोठें कांहीं तरी न्यूनपणा असतो. इजला उत्तम वर कसा मिळेल हीच चिंता आहे.

योगी- चित्रांगदा ही चिंता करणें नलगे, तिचा जो पति ब्रह्मदे

यानें नियमित केला आहे. तोसुस्वरूप सुशील, कुलज्याचें उत्त?
पराक्रमाविषयीं जसा भगीरथ याप्रमाणें आहे; कोणता तो
श्रवण कर.

## आर्या

जिंकुनिमागधअधिपा, सोडविनिजतातमातख्यातअसे॥
त्यावीरातेंअर्पीहीतव कन्यामलासुयुक्तदिसे॥१॥

दशार्ण देशाधिपति बज्रबाहु यानें आपली स्त्री सुमती ईचा बालकासह वनांतरी त्याग केला. ती सुमती पद्माकर वैश्याच्या नगरांमध्यें वास्तव्य करीत आहे आणि तिचा बालक महान पराक्रमीं ज्याणें स्व पित्यातें सोडवून कीर्तिध्वज उभारिला. परमेश्वराची ज्यावर पूर्ण कृपा आहे त्याजप्रत ही कन्या द्यावी

**चिंत्रांगद-** महाराज भद्रायुचा कीर्तिघोष मीही श्रवण केला होता परंतु सविस्तर वृत्त आपण कथन केलें त्यापूर्वी विदित नव्हतें आतां आज्ञे प्रमाणें त्याजलाच विधिपुरस्सर पाणिग्रहण करवून ही कंन्या देतों.

**योगी-** चातुरंग दळभार पाठवून भद्रायुप्रत आणावें. देशोदेशींचे राजे पाचारण करावे आणि सोहळ्यानें विवाह समारंभ उत्तम प्रकारें करावा (असेंसांगून अंतर्धान पावतो.)

**चिंत्रांगद-** (देवपूजा करून भोजनोत्तर सभास्थानी जातो.)

## प्रवेश १०वा

### स्थल .... चित्रांगदाचा दरबार

### पात्रें

### चित्रांगद, प्रधान व पुरोहित

(सभास्थानीं सर्व दरकदार, मानकरी आप आपले मिसलीवर उभे आहेत. इतक्यांत चित्रांगद प्रवेश करून सिंहासनारूढ होतो, सर्व वंदन करून बसतात.)

चित्रांगद- हे प्रधानश्रेष्ठा आजपर्यंत कीर्तिमालिनी इजला उत्तम वर योजनेची चिंता होती; आज परमेश्वर रुपेनें ती निरसन झाली आहे. तर आतां मंगल कार्यास सुमुहूर्त पाहण्याकरितां ज्योतिर्विदांस पाचारण करीव बरें.

प्रधान- सेवकास आज्ञा करितो आणि ज्योतिर्विद प्रवेश करितात.(रामजोशी इत्यादि.)

राजा अनंत कल्याण असो.(आसनावर बसून) कां गड वडीनें पाचारण केलें.

राजा- ओव्या

हीममकन्याउपवरा। योजिलाअसे इजलावर॥
वज्रबाहुराजकुमर॥ महानशूरभद्रायुजो॥१॥
जेणेंस्वपराक्रमें करून॥ हेमरथासीसमरींजिंकुन॥
सोडविलेंआपिल्यालागुन॥ ऐसाअतुलप्रतापीजो॥२॥

रुपेंकेवळ जैसामदना। कुंभिनीसारीपाहतांशोधुन॥
दुजानमिळे यासमान॥ म्हणूनि हाचवरयोजिला॥ ३॥
तरींतुम्ही अविलंबें करून॥ सुमुहूर्तकाढावाशोधुन॥
नसावेंत्यांत काहिंन्यून॥ ऐसामुहूर्त असावातो॥ ४॥

वज्रबाहूचा सुत भद्रायु याजप्रत कन्या देण्याचा मानस आहे तर अविलंबें सुमुहूर्त शोधून काढावा.

**रामभटजोशी**– फार उत्तम आहे म्हणून मुहूर्त पाहूं लागतात.

**वाटोळे**– कां जोशीबावा चित्रांगदा सारखा विचारी त्या चा तोच धन्य असो; अहो हा मुलगा कोणाचेही लक्ष्यांत येण्यासारखा नव्हता प्रत्यक्ष त्या मुलाचे बापाला ही हा आपला मुलगा असें माहीत नाहीं परंतु राजानें कसा शोध लाविला कोण जाणें.

**जोशी**– हीकल्पना तरीकाय. जोप्रत्यक्ष तक्षकाचा वरद पुत्र योग्याची ज्यावर कृपा साजला त्याचें इष्ट इष्टदेवत नकळ वितें असो आतां मुहूर्त पाहून कळवूं या. (सर्वांनुमतें मुहूर्तपाहून राजास कळवितात.)

## अंजनी गीत.

शुक्लपक्षत्यामाधवमासीं॥ मुहूर्त आहे द्वादशि
तिथिसी॥ इंदूबलहीतवकंन्येशी॥ पूर्णत्वें आहे॥
१॥ अविलंबेंसामग्री कराहो॥ पाचारावेंशीघ्र

१ वैशाखांत.

वराहो ।। भद्रबहूत्यावधूवरांहो ।। मुहूर्तघड वील ।। २ ।।

आर्या

ज्योतिषिह्मणतीराया, आहेसुमुहूर्त याचमासांत ।।
अवधीउरलीथोडी, आजपुनीदिवसतेमधेंसात ।। १ ।।

वैशाखशुद्ध द्वादशीस उत्तम मुहूर्त आहे, अवकाश मात्र थोडा आहे. तयारीस त्वरा झाली ह्मणजे साधेल (याप्रमाणें सांगून निघून जातात.)

राजा- (दूतास आज्ञा करितो) कुलोपाध्याय यास माझे साष्टांग नमन कथन करून पाचारण करितों असें कळीव.

आर्या

पाचारणार्थतेव्हां आचार्याधाडिभूपदूताला ।।
कथुनीतत्पदिंनमना संगतिं अपुल्याचआणितूंत्यांला ।। १ ।।

दूत- आज्ञेप्रमाणें आचार्य (कुलगुरु) यांस कळवितो.

आर्या

दूतकथीआचार्या पाचारीनृपतुह्मासविनयानें ।।
तुमच्याअनुशिक्षेनें चालुविजोराज्यभारसुनयानें ।। १ ।।

(राजाचें पाचारण ऐकून कुलगुरु दरबारांत प्रवेश करितात)

गुरु- हेराजचक्रमुगुटमणे, किमर्थपाचारण केलें सबरें.

---

१ कल्याण. २ चांगल्या नितीनें.

## आर्या

त्वद्दूतानें कथिले वंदुनि राजा तुह्मास पाचारी ॥
आलों मी अविलंबें होतो जे पद्धत वेदतें चारी ॥ १ ॥

राजा-(कुलगुरूस ह्मणतो) हे आचार्या कीर्तिमालिनीचा विवाह करण्याचा निश्चय केला आहे. ज्योतिषी यांणीं मुहूर्त वैशाख शुद्ध द्वादशीचा नेमिला आहे; मध्यें अवकाशमात्र सात दिवसाचा आहे आणि लग्न समारंभा करितां देशोदेशींचे ऋषिवर्य, ब्राह्मण, तसेंच सर्व राजे यांजला लग्नपत्रिका लिहून मंगल कार्याची सर्व सामग्री करण्यास आज्ञा पाहिजे.

## श्लोक

जें उक्त विधिनें आहे ॥ करवातें तुह्मि स्वयें ॥ राजे भूदेव पाचारा ॥ कांहीं न्यून पडो नये ॥ १ ॥

आचार्य- सर्व सामग्री विधीपूर्वक मी करवितों. ब्रह्मवृंदांसही पत्रें मी लिहितो, समस्त राज कुलांस प्रधानाकडून कुंकुमांकित पत्रें पाठवावी.

राजा- (कुलगुरूस निरोप देऊन प्रधानास आज्ञा करितो)

## ओंव्या

राजा आज्ञापी प्रधानास ॥ लग्नपत्रें धाडीं समस्त रायांस ॥ कीर्तिमालिनीचे विवाहास ॥ सहपरिवारया

---

१ ब्राह्मण.

वेऐसीं ॥ १॥ मंडप करावा सहस्त्रखणी ॥ मंडित असावा आदर्शनीं[1] ॥ चित्रविचित्र वितानांनीं ॥ मना मोदकारकतो ॥ २ ॥ पडदे लावावे वाळ्याचे ॥ पाणी उडवावें कारंजाचें ॥ बैठकी बरी मुखेसाचे ॥ गुच्छ असावे ठायींठायीं ॥ ३ ॥ द्राक्षादिकलता सुंदर ॥ लावीं भोंवत्या मनोहर ॥ पाहतां भुलती नारीनर ॥ ऐसा मंडप करावा ॥ ४ ॥ जानवशासी सदन एक ॥ निर्मविते अति सुरेख ॥ ज्यातें पाहतां उपजे हरिख[2] ॥ समस्त सुहृदां मानशीं ॥ ५ ॥ ठायींठायीं नृत्यांगना ॥ उभ्या कराव्या शशीवदना ॥ ऐसे परी जानवशाचे सदना ॥ रमणीय उपचारें[3] शोभवावें ॥ ६ ॥ मंगल तुरें वाजावीं अपार ॥ शृंगारावें समस्त नगर ॥ उल्हाट यंत्रांचे भडिमार ॥ विवाहसमयीं करवावे ॥ ७ ॥ अज्ञापुनियां सूपकार ॥ षड्रस अन्नें करा परिकर ॥ भोजनीं तोषवावे वर्णवर[4] ॥ वऱ्हाडी इतरही तैसेची ॥ ८ ॥ ऐसी सर्व सिद्धता करून ॥ संगें चातुरंग दळ घेऊन ॥ जावें पद्माकराच्या नगरालागुन ॥ जामातातें आणावया ॥ ९ ॥ ॥ ॥

प्रधान-( आज्ञे प्रमाणें सर्व सिद्धता करून शिष्टजनांस-

---

1 आरशानी, 2 आनंद, 3 आचारीं, 4 ब्राह्मण.

मवेत चातुरंग दळभार गज, रथ, शिबिका सहित पद्माकराच्या नगरीं जाऊन भद्रायु, सुमती, पद्माकर व नागरीकजन यांजला समागमें घेऊन नैषध पुराप्रत येतो)

(चित्रांगद शिष्टजनासह भद्रायुस सामोरा जातो)

**चित्रांगद-** भद्रायुचे सुस्वरूप तेजशील व गुण इत्यादि अवलोकन करून संतोष पावतो.

### श्लोक

रतिपतिसमयाचेंलाजवी मन्मथाला ॥ स्वरुपमुखज
याचेंझाकितेंचंद्रमाला ॥ धवरमणिय आहे योग्य
हा कंन्यकेला ॥ ह्मणुनिमनिंबहूतोरावहर्षोनिधाला ॥ १

कंन्ये योग्य भ्रतार सुस्वरूप व सर्व गुणानीं मंडित असा पाहून हर्ष युक्त होत्साता मंगल तुरें वाजवीत शिष्ट मंडळी सह जानवशाचे सदनांत प्रवेश करितात.

*:

## प्रवेश ११ वा

स्थल .... जानवशाचें गृह.

### पात्रें

चित्रांगद, भद्रायु, सुमती, पद्माकर, वज्रबाहु व कित्येक राजेमंडळ.

**नट—** सूत्रधार भद्रायु चित्रांगदाच्या नैषधपुरामध्यें स्वयंव

---

१ पति. *: कथारंभा पूर्वी नट व सूत्रधार यांचे भाषण आहे.

रा करितां प्राप्त झाला आहे आणि चित्रांगदाच्या पाचारणानें सर्व राजे आले आहेत यामध्यें वज्रबाहुही सपरिवार ( स्त्रीयांसह ) प्राप्त झाला आहे तर आतां पुढें काय होणार बरें ?

**सूत्रधार-** अरे भद्रायुचा आणि सुमतीचा अपत्तीकाल जाऊन त्यांजला सुदिन प्राप्त झाले आहेत. आतां परस्परांस एकमेकाच्या रखुणा करून आनंदाची कशी लूट उडते ती पहा.

**नट-** ठीकवेल. मी एक घागर आणितों; थोडासा आनंद घरीं माझे प्रीय स्त्रीये करितां घेऊन जाऊं. ( इतकें बोलून निघून गेल्यावर )

---

**चित्रांगद-** ( सर्व सभास्थानीं देशोदेशींचे राजे आपआपले मानाप्रमाणें बसतात. व मुख्य स्थानीं भद्रायु याजला बसवून हार, तुरे, अत्तर, गुलाब ही कांहींकांस स्वतः व कांहीकांस प्रधाना कडून देववीत आहे. )

**वज्रबाहु-** मुख्य स्थानीं बसलेला आणि जो चिंत्रागदाचा ज्यामात होणार तोच हा आपला कैवारी होय असें ओळखून प्रधानासह उठोन त्याचे चरण वंदन करण्या करितां जातो.

## ओंवी

लग्नाकारणें पातले भुपती ॥ तयेस्थानीं वज्रबाहु नृपती ॥
प्रधानासह शीघ्र गती ॥ विवाहसंभ्रमा पातला ॥ १ ॥ भ
द्रायुसि अवलोकून ॥ हाच आपला कैवारी ह्मणोन ॥
प्रधानासह त्याचे चरण ॥ वंदन करावयास जातसे ॥ २ ॥

चरण धरावया धाविन्नला ॥ भद्रायुनें वरचेवर धरिला
॥ आलिंगन देतां तयेवेळां ॥ कंठ उभयतांचे दाटले ॥
३॥ वज्रबाहु पुसे वरा ॥ फेडीं माझे संशय समुद्रा ॥
गोत्र ग्राम नामा अतित्वरा ॥ सांगें उदारा मज प्रती ॥
४॥

( भद्रायुनें स्व पितायेत आहे असें अवलोकन करून त्याजला वरचेवर धरून प्रेमानें एकमेकांस आलिंगन दिल्यावर तुझी माता, पिता, देश, गुरु, इत्यादि सर्व कथन करून संशय समुद्रापासून मुक्त कर या प्रमाणें वारंवार वज्रबाहु त्याजला ह्मणतो. )

---

## प्रवेश १२ वा

स्थल ...... अंतर गृह

### पात्रें

वज्रबाहु, चित्रांगद, सुमती, भद्रायु, सिमंतिनी, पद्मा०

**चित्रांगद**- वज्रबाहुस हाती धरून एकांत स्थलीं नेतो आणि भद्रायुचे सर्व चरित्र व योगी याचा प्रसाद हे कथन करितो.

### आर्या

सुमती राणी सह तुह्मी केला जो त्याग अज्ञ बाळाचा ॥ हा
तोच त्वत्सुत गा जो समरीं काळ त्याहि काळाचा ॥ १ ॥

### दिंडी

महाशिव योगी याचि रूपा भारी ॥

तत्कृपेनें निरसली व्यथा सारी ।।
मातृसेवा करुनि जो सदां राहे ।।
पुत्रतुमचा ह्याजगीं धन्य आहे।। १।।

या प्रमाणें भद्रायु ह्याच आपला पुत्र असें वज्रबाहुनें श्रवण करून आनंदाश्रुनी परिपुरीत अशा नेत्रांनी अधोभागीं अवलोकन करून ह्मणतो. हर हर कसा मी पाषाणहृदयी अशा बालकाचा आणि सकुमार सुमतीचा घोर वनीं त्याग करून जगांमध्यें निपुत्रिक अशा दुषणांस पात्र झालों होतों. परमेश्वरा तुझी लीला आगाध आहे. पुत्र माझा मला भेटेल ही स्वप्नी सुद्धा आशा नव्हती परंतु विश्वव्यापका तुझी माया अतर्क्य आहे. आज जगत्त्रया मध्यें माझ्या सारखा प्रारब्धवान कोणी नसेल असेंच मी मानितों. आज माझे सुखास आणि आनंदास पारावार नाहीं. याप्रमाणें परमेश्वराचा स्तव करतो)

**सिमंतिनी**- सुमतीस हाती धरून वज्रबाहूचे चरणावर नत करिते.

**सुमती**- प्राणनाथ ही दुर्बळ राज्यभ्रष्ट दासी चरण कमलीसाष्टांग नमस्कार करित आहे. असें ह्मणून राजाचे चरणावर मस्तक ठेविते आणि आपलीं सर्व प्रारंभापासून झालेलीं दुःखें आठवून रुदन करिते.

**वज्रबाहु**- धन्य धन्य धन्य आहेस सुमती परमेश्वरापुढें माझे

सारखा अपराधी निर्दय माझा मीच दुसरा कोणी नाही मीकेव
ळ पुत्रहीन अभागी असतां ज्याप्रमाणें मोहरी पर्वताहून श्रेष्ट
व्हावी तसा हा बालक.तूं मला दिलास सर्व राज्य बालकासहि-
त तुझें आहे आतां पुर्वीलि माझें हातून घडलेलीं घोर कर्मेंत्या
मर्माचा उच्चार करून हृदय भेद करूं नकोस.

## साकी

बिंदूचातूं करूनि सिंधू दावीला मज कांते॥
तवसह तूझ्या उपकारें मीजाईन मोक्षपंथे॥१॥

**चित्रांगद**- भद्रायूस आणून वज्रबाहुचे चरणाप्रत वंदन करविते।

**वज्रबाहु**- पुत्रासक्षेमालिंगन देऊन अंकावर बसवून घेऊन बा
ळका आज तूं माझा पुत्र आहेस हें कळल्यानें माझा आनंदोद
धी परिपूर्ण होऊन उचंबळला आहे. वत्सामी कठोरपणानें तु
म्हाउभयतांस दिलेलें दुःखानें मी परम श्रमी आहें. ती दुःखें
अतां मनामध्यें आणूनका. त्यासमयाचें स्मरण झालें असतां
हृदय स्फोट होत आहे.

**चंद्रकला व कुमुदिनी**- सुमती सश्रेष्ठ मानानें वंदन करून
कृत कर्माची क्षमा मागून भद्रायूस ह्मणतात, तान्हुल्या आह्मी
अज्ञानपणानें जें कृत्य केलें त्याची फळें पावलों त्यांतून तूंच
मुक्तता केलीस. आह्मी हतभागी आह्माला पुत्र रत्न कोठून अ
सणार परंतु सुमती बाईना परमेश्वर अनुकूल होऊन तुझ्या
योगानें आह्मी पुत्रवत्या आहों. आतां आपलें श्रेष्टत्व एकीकडे

ठेवून कृत कर्माची क्षमा मागत आहों वत्सा आमच्या प्राणाहून ही तूं आह्माला अधीक आहेस.

भद्रायु- हे मातानों, आपला अपराध तिलमात्र ही नाहीं. ज्याज्या प्रमाणें प्राणी मात्रांचे प्रारब्धी विधीनें लेखन केलें अस तें तें किमपि मिथ्या होत नाहीं आमचा प्रारब्धयोगच तसा त्याप्रमाणें आपलें हातून जें कृत्य झालें; तो केवळ आपला मजव र अनुग्रहच आहे. असा योग घडला नसता तर पित्यानें मा तोश्रीसह माझा त्याग कां केला असता बरें. पितात्याग नक रता तर आमचीं मनें प्रभुचरणीं लागून श्री गुरूचा प्रसाद क सा घडतां तस्मात आपले हे मजवर अनंत उपकार आहेत. (सर्वांच्या भेटीं आनंद कारक झाल्या इतक्यांत मुहूर्तवेळा स न्निध आली ह्मणून सर्व लग्न मंडपांत निघून जातात. )

---

## प्रवेश १३ वा

स्थल........ लग्नमंडप

पात्रें

आचार्य, ज्योतिषी, उभयपक्षींचे वऱ्हाडी, पौरजन व वधुवर इ०

उपाध्याय- वधुवरांस अंतःपटांत उभीं करून मंगलाष्ट कें ह्मणतात.

चित्रांगद- (समारंभानें पाणिग्रहण विधीनें कंन्यादान भद्रा-

सूचे हाती दिल्यावर लाज्जा होमादिक सर्व कृत्यें आचार्य करवितो.)

आर्या

नैषध पुरपति अर्पी विधिनें भद्रायुसी स्वकन्याती ॥
विप्रांसि दक्षिणा बहु देउनि करितुष्ट सर्व ही याती ॥ १ ॥

श्लोक

दंपत्य शोभ ते भारी ॥ रतीमदन ज्यापरी ॥
इच्छीत देत अतिता ॥ उत्साहा रावतो करी ॥ १ ॥

पाणिग्रहण विधी झाल्यावर उभयतांस उत्तमासनीं बसवून उभयपक्षींच्या लहान थोर स्त्रीया मिळून वधुवरांचा कौतुकानें खेळ करितात.

सख्या- हे कीर्तिमालिनी पतीहस्तीचा ग्रास मुखीं ग्रहण करून तूं आपले हातानें भद्रायुचे मुखांत ग्रास दे. तुझी माता आदिकरून सर्व कौतुक पहाण्या करितां उभ्या आहेत.

आर्या

भद्रायूसी वदती, नारी द्यापत्नि आननी ग्रास ॥
मगन वरी हस्तींचे, पांच तुझ्मी ध्या मुखांत सुग्रास ॥ १ ॥

( या प्रमाणें भोजन समारंभ झाल्यावर सख्या पुन्हा सांगतात.)

पद

( माधवासी कोणी सये या चालीवर. )

त्यजि लाज सखे आज किर्तिमालिनी ॥ दावी
आह्मालागीं चोजविडी तोडुनी ॥ ध्रु० ॥ कुतु-

हूल पहावया लवमाय पातली ।। सन्मूख सीमंतिनी ।। १ ।। अवकाश बहुत हा होउनी गेला ।। तिष्टती सान्या गडिणी ।। २ ।। पतिसह इहलोकीं नांदे आनंदें ।। संसारीं सुख भोगुनी ।। ३ ।। वासुदेवासी स्तवितांचि विनयें ।। लाधे इच्छित साजणी ।। ५ ।। त्यजि लाज सखे आज कीर्तिमालिनी ।। १ ।। ।। ।।

आर्या

भद्रायूला वदती तत्पुर वासी समग्र त्या नारी ।।
बहुल्यावरी चलावें उचलुनि घ्यावी कडेवरी नवरी ।। १

श्लोक

तदा भद्रायू तो उचलुनि कडे घेत रमणी ।। हरिद्रादी खेळीं बहुत विलसे तो नरमणी ।। अति आनंदानें सकळ रिझवी त्या करवल्या ।। बहु शृंगारानें रति सम अशा ज्या मिरवल्या ।। १ ।।

( याप्रमाणें कौतुकानें अनेक प्रकारचे खेळ व लग्नासंबंधी सर्व कृत्यें झाल्यावर भद्रायुस्वनगरी जाण्याची आज्ञा मागतो व स्व स्त्रीसमवेत समस्त श्रेष्ठांतें वंदन करितो )

सिमंतिनी अभंग

कीर्तिमालिनी ही आहे साळी भोळी इसी तूं सांभाळीं ममत्वानें ।।१।। नवमास ओझें साहिलें उद-

१स्त्री,

री॥ आतां तव करीं दिधली हे ॥ २ ॥ जातहीस्त्रियांची पतीच्या आधीन आजही स्वाधीन तुमच्या केली ॥ ३॥ ममत्वानें येती मायेचे उमाळे वियोग अनळे बोलवेना ॥ ४ ॥ चुके जरी सेवा उपदेश द्यावा क्षेमार्थ कळवावा वेळोवेळीं ॥ ५ ॥

(याप्रमाणें सिमंतिनीचा निरोप घेतल्यावर चित्रांगदाची आज्ञा ग्रहण करून वत्सानें गज रथ वाजी रत्नालंकार सर्वांस वस्त्रें भूषणें देऊन गौरव केल्यावर कीर्तिमालिनी आपले जिवलग गडणीचा निरोप घेते व वज्रबाहु, भद्रायु, सुमती, चंद्रकला, कुमुदिनी, कीर्तिमालिनी इत्यादि सहवर्तमान चिजनगरीं जाण्याकरितां निघतात.)





# भद्रायुसत्वदर्शननाटक

## अंक ५ वा

### पात्रें

सूत्रधार .......... नाटककर्ता
नट .......... त्याचासोबती
वज्रबाहु .......... दशार्णदेशाधिपति
प्रधान .......... वज्रबाहुचा
भद्रायु .......... वज्रबाहुचापुत्र
सुमती .......... वज्रबाहुच्यास्त्रीया
चंद्रकला .......... ,,
कुमुदिनी .......... ,,
कीर्तिमालिनी .......... भद्रायुचीस्त्री
आचार्य .......... कुलगुरु
ब्राह्मण .......... कपटानें झालेलें
स्त्री .......... ,,
व्याघ्र .......... ,,
शंकर .......... कैलासपती
पार्वती .......... शंकरपत्नी
फुली .......... दासी
भाट .......... ,,

# भद्रायुसत्वदर्शन नाटक

## अंक ५ वा

## प्रवेश १ ला

स्थल........ रंगभूमि

पात्रें

सूत्रधार व नट

नट- (सभेसन्मुख उभा राहून आनंद लहरी जिरवून ह्मणतो.) केम् सूत्रधार थयुं तमारु नाटक एतो भाइ बधो झुटो खेळ, मारा मनमां लगनमा चारदाडा लाडवा मळशे पण ते तो तमारी बधी गप्प लाडू एक पाम्या नथी जइएक मळ्योनथी हुं जउछुं भाई रामराम

सूत्रधार- अरे विदूषका तूं इतका भोजन लंपट आहेस हें जर मला विदित असतें तर तशी योजना केली असती आतां तुला प्रत्यक्ष कैलासपती शंकर यांचे गिरिजेसह दर्शन घडणार आहे. पुढील खेळाची तयारी कर.

नट- असें आहे काय? चालुं द्यातर.

---

## प्रवेश २ रा

स्थल.....वज्रबाहुचाराजवाडा

पात्रें

वज्रबाहु, सुमती, भद्रायु, कीर्तिमालिनी,

**चंद्रकला, कुमुदिनी, कुलगुरू व प्रधानादिक.**

**वज्रबाहु**-(भद्रायु आणि कीर्तिमालिनी या उभयतांस अं-कावर घेऊन कुलगुरूस ह्मणतो) परमेश्वराची व आपली केव्हडी मजवर कृपाही सुमती सारखी स्त्री जगतीतला चे ठायीं दुर्भिल याविषयीं शंकाच नको काय रति मन्मथा सारखीं पुत्र स्नुषा शोभताहेत, धन्य असो माझें प्राक्तन.

**गुरू** – राजा हें काय ह्मणतोस अरे तुला पुत्र होऊन तो सुमतीनें वाढवावा. आणि पुढें त्यानें तुझें साह्य करून निजराज्य पावावें ह्यामुळींच ईश्वरी संकेत तो कसा मिथ्या होईल. सर्वगोष्टी तदनुसार घडून आल्या आज तुझ्या सारखा जगत्रयामध्यें सुखी कोण आहे.

(याप्रमाणें स्नुषा पुत्रा समवेत कित्येक दिवस आनंदांत गेल्या वर.)

**वज्रबाहु**- महाराज कुलगुरो आतां माझी वृद्धावस्था झाली असून पुत्रही राज्यभार चालविण्यास योग्य आहे याजकरितां सुमुहूर्तानें भद्रायूस पट्टाभिषेक करून स्त्रियांसहवर्तमान हिम केदारीं तपस्या करण्या करितां जाऊन देहाचें सार्थक करावें अशी इच्छा आहे.

**आर्या**

**सांगे नृप कुलगुरुतें अर्पावा राज्यभार सूतास ॥**
**जावें तप करण्याला आळवुनी देहिं पंचभूतांस ॥ १ ॥**

**गरू**— राजा आजपर्यंत राज्यभार चालवून काईक, वाचीक, मानसीक, ज्ञातवा अज्ञपणानें जीं पातकें घडलीं असतील त्यांचें तप तीर्थी क्षालन करून मुक्त व्हावें हा विचार योग्यच आहे. लग्नांत उदयीक मुहूर्त तर उत्तमच आहे पुन्हा असा मिळणें दुर्घट.

**वज्रबाहु**- (प्रधानास आज्ञा करितो) सर्व सजांस जासूद पाठवून पाचारण करावें, सप्त मृत्तिका सप्तोदकें हीं सर्व सिद्धता गुरुजीचे आज्ञेप्रमाणें सत्वर करावी (प्रधान सर्व सिद्धता करितो.)

## ओंव्या

शुभवेळीं भद्रायुवरी ॥ छत्र उभविलें सत्वरी ॥
राज्याभिषेक आनंदें करी ॥ विप्रां करवीं वज्रबाहू ॥ १
भद्रायुसी सिंहासनीं स्थापुन ॥ सर्व राज्यभार देत निरवून ॥ आपण स्त्रियांसह वर्तमान ॥ हिमगिरी पंथे जातसे ॥ २ ॥

(याप्रमाणें कुलगुरूच्या अनुमतें भद्रायूस समारंभानें भद्रासनीं स्थापून आपण सुमती आदि करून स्त्रियांसमवेत हिमकेदारी तप करण्या करितां गमन करिता झाला.)

---

## प्रवेश ३ रा

स्थल.... भद्रायुचा दरबार.

## पात्रें

प्रधान, सेनापती, नागरीकजन, भाट, चोपदार.

## भद्रायु

**भद्रायु**-(स्व पित्याच्या व मातेच्या वियोगानें कांहीं खिन्नमानस होत्साता प्रधानाकडून राजसंबंधी सर्व माहिती करून घेतो)

**प्रधान**- महाराज आपण सर्व ज्ञातेच आहां असें असून कांहीं वियोगा मुळें मन स्थिर नसेल परंतु झालेला मार्ग विहितच आहे खेद कां असावा बरें.

**भद्रायु**- प्रधाना मायाजाळ फार कठिण आहे, बरें असो आतां गुणी जनांचे गायनादिक प्रकार सुरू करावें

( कंचनीचें नृत्य व गायन होते. )

**नागरीकजन**- यथाशक्ति राजास नजरनजराणें ठेऊन वंदन करितात.

**चोपदार**- राजाधिराज भद्रायु राजे महाराज असा शब्दकरितो.

**प्रधान**- छडिदार किमर्थ शब्द केलास.

**चोपदार**- महाराज कोई भाट आयाहैं और मुजरेकु आनेकी फारज रखताहै.

**भद्रायु**- येऊंदें त्याला.

**भाट**- राजपदातें वंदनकरून कवीत ह्मणतो.

## दोहोरे

नागनसे नारी बुरीतीन ठोरकर खात ॥ कायाह्नी

जेधन हरे लाज लोकमें जात ।। १ ।। महाराज नारी-का झपाटा ऐसा है ।। दरिद्री चले दर्यावकु कर-मचले साथ ।। मोतिके खातर मारे डुबी तो शंख लगे हात ।। २ ।। करम प्रताप तुरंग नचावत क-रमसे छत्रपति पत होत ।। करम घटे राजा राव-णकू तो सुनेकी लंका पलखमें खोत ।। ३ ।। कर-मके आगे किसिका नहि चलता सरकार ।। ध्या न कर ध्यान कर कुलदेवतका ध्यान कर अतित कामानकर ।। मित्रसें अभेद कर ।। शत्रूका भेद कर ।। खेदका त्याग कर ।। मनकूं स्थिर कर ।। नितीपर निगा कर ।। १ ।। राजा थडकत घोडा फडकत निशाण ।। चूक जात अस्वार घोडे चडनको ।। चूक जात बिप्र बेद पढनको ।। चूक जात सती पति सेवा करनको ।। चूक जात चितारो चित्र ग वय्या गावनको ।। इतना सबही चूके पण एक न चूके चुगली चुगल चूत मारीको ।। १ ।।

(महाराज चुगलका भरोंसा कबी न रखना. वंदन करितो)

महाराज मे गुणीजनकी रत लेकर फिरनेवाला हूं ।। सूरतसे कीरत बडी जो बिन पंख उडजाय ।। सूरत तो जाती रहे कीरत कबू न जाय ।। १ ।।

(भाट उत्तम प्रकारें बक्षीस मिळाल्यावर निघून जातो. )

भद्रायु- हे प्रधानजी हेमरथ याजला कारागृहांतून मुक्तकरून नियमीत काळीं करभार येण्याचा बंदोबस्त करून घेऊन वस्त्रालंकार देऊन निजनगरीं जाण्याची आज्ञा द्यावी (प्रधान आज्ञेप्रमाणें करितो हार,तुरे, अत्तर गुलाब तांबूल दिल्यावर कचेरी बरखास्त होते.

## प्रवेश ४ था

### स्थळ..... कीर्तिमालिनीचारंगमहाल.

### पात्रें

### भद्रायु, कीर्तिमालिनी व दासी.

**कीर्तिमालिनी-** कोणआहे ग दासी कोणती लवंगी कांग

**फुली-** जी बाईसाहेब लवंगी नव्हे मी ती फुली, काय आज्ञा आहे ?

**कीर्ति०-** अग ज्यावेळीं ह्मणून हाक मारावी कीं नाहीं त्यावेळीं लवंगी ह्मणजे कधीं हजर असल्ये अशी गोष्टच नाहीं. ती माहेरची ह्मणून मीकीं नाहीं तिला फार बोलत नाहीं. पण मेला माणसांनीं अगदींच ताळ सोडला आतां मी बोलम तीका लबाड.

**फुली-** महाराज लवंगी आताशी जामदाराच्या मुला बरोबर नित्य हिरा बागेंत जात असते ठीकच आहे ती ममतेंतली तेव्हां तिच्या साऱ्या गोष्टी खपल्या जातात मीमेली उगाच ही बातमी सरकारा पर्यंत कशाला कळवूं पण ओठ आलाह्मणून

विसरतांना बोललें.

**कीर्ति**- अग आहा मला ठाउक एका माळेचे मणी नी मो जायला नाहीं कुणीं बरें असो, आजकीं नाहीं दरबारांतनं फार श्रमून कदाचित् येणं होईल, मी मेली अद्याप कधींही सन्मूख उभी राहिले नाहीं परंतु सर्व सुमन शेजेचीं तशीच उष्णोदक परिमळ द्रव्यें यांचीसिद्धता करून ठेवा बरं का.

**फुली**- महाराज आपण निद्रिस्त होतां तेव्हां तो सेवक गुला ब्या आला होता. त्यानें सायंकाळीं स्वारी येणार आहे सर्व सिद्ध ता असूंदे, असें मला सांगितल्यावरून मीसर्व सिद्धता करू न ठेविली आहे, मला सर्व माहिती आहे. कांहीं न्यूनपडणारनाहीं

**कीर्ति०**- अग ह्मणतेस तरीं काय? सांगून पाठविणं कां झालं होतं परमेश्वरा आज या हस्तांनीं मी तांबूल देण्यास सन्मूख गेलें तर क्रोध नाहींना येणार? अद्याप तबेतीचें मान कसं असेल कसं नाहीं हें सुद्धा मला माहीत नाहीं. (आपलेचमनांत) येणं झालं तर प्रथमारंभी मी बोलूं तरीं काय? हांहां झाली आठवण. लहानपणीं बाबाजवळ जर मी कधी असलें आणि मातोश्री आली तर येण्याबरोबर वंदन करीत असे, आणि हस्त जोडून उभी राही. आपणही तसंच करावं ह्मणजे झालं (अशा विचारांत आहेतों)

**फुली**- बाईसाहेब स्वारीचं येणं झालं बार द्वारी पर्यंत चो-पदार ललकारणी करीत आला होता. (इतक्यांत भद्रासु

प्रवेश करितो. )

**भद्रायु-** कोण आहे ती दासी कुत्र्ये राबता बंद ठेव. (फुं-ली निघून जाते भद्रायु रत्नजडीत चोकीवर बसतो. )

**कीर्ति॰-** लज्जानिगूढ नतमुखी होत्साती चरणांतें वंदन करिते. आणि दूर उभी राहून आपणासींच बोलते, कायतरीं हेंउगाच बोलायला फुली जवळ होती तीसुद्धा गेली.

**भद्रायु-** हे लज्जीरूत गजगामीनें कल्याण असो, कां दुर उभी ये सन्निध ये. कायतरी स्त्री जातीचा स्वभाव कीति लज्जा,बरें आज शृंगार तर काय अप्रतिमच बनला आहे. तूं दूर उभी आहेस परंतु शृंगाररूप शस्त्रास्त्रांनी भरलेले तुझ्या भात्यांतील भ्रुकुटी धनुष्यापासून जे शर सुटत आहेत ते शर माझे मर्मस्थानीं भेद करीत आहेत. आणि त्या शर रंध्र द्वारें करून स्मरानें यादेहामध्यें प्रवेश केला आहे तेणें करून शरीराचा दाह होत आहे. याजकरितां देदे दृढालिंगन दे आणि अधरामृताचा स्पर्श होऊंदे ह्मणजे ह्या दाह शांत होईल.

**कीर्ति-** मी की नाहीं बाई भोळी आहें मला असलीं मारपेचाचीं बोलणीं समजत सुद्धां नाहींत मलतंच काय बोलणं तें, धनुष्य कसलं नी बाण कसले

**भद्रायु-** ( जवळ जाऊन हस्त धरणार तंव ती किंचित पुढें जाते. हें पाहून ) अहोहो एकुन. धन्य असो मी प्रारब्धवान खरा काय विधात्यानें ही शृंगार लता निर्माण करण्याकरितां

कीति श्रम घेतले असतील, या स्वरूपाचें वर्णनकरण्या-
ला एकवेळ मला वाटतें कीं, सरस्वती सुद्धा थक्कित होईल.
ज्याप्रमाणें कृष्णसर्प असावा तसी पृष्ठ भागीं वेणी शो-
भत आहे, धनुष्याकार जीच्या भ्रुकुट्या आहेत, नेत्र कम
लें कशी कीं, या नेत्रांतें अवलोकन करून मृगही लज्जा
पावत आहेत, मुखासजर कलेशयाची उपमा द्यावीतर
त्याचेठिकाणीं क्षयत्व आहे परंतु ज्याप्रमाणें पोर्णिमेचा
पूर्ण चंद्र असतो तद्वत् मुखेंदु शोभत आहे ज्या नासि
कातें अवलोकन करून शुक ही लज्जायमान होत आ
हेत. दंतपंक्ती ज्याप्रमाणें हिरकण्या कोंदणामध्यें विराजमान
असतात त्याप्रमाणें झळकत आहेत, अधरजीचे प्रवाळवल्ली
प्रमाणें आरक्त आहेत, हस्तीच्या गंडस्थला प्रमाणें हृदयभाग
यौवन मदानें शोभत आहे, कटी केवळ सिंहासारखी सूक्ष्म
आहे, पोठऱ्या कशा ज्याप्रमाणें कर्दली स्तंभ असावे त्यासमान
भासत आहेत गमन पाहून हस्ती लज्जा पावत आहेत.

## लावणी

कितीतुझे बानुमीरुपाला ॥ तवमुखइंदूलज्जितक
रितोत्यानभिंचंद्राला ॥ ध्रु० ॥ वेणीपाहून कालियस
र्पला ॥ होतांलज्जा सूर्यकुमेरीवनींलपवीवदना
ला ॥ अवलोकुन प्रीयेतुझ्या नासिकाला ॥ र-
क्तानन तो शुकहोऊनियांफिरतां बहुश्रमला ॥

१ यमुनेच्याजळीं

॥चाल॥ पाहूनीमनींस्तन चक्र वाक लाजती ॥ हरि कटीसमही नाजूक कटी भासती ॥ लाज ती मृगतवनेंत्राला॥ पाहुनी अधरां प्रवालवल्ली लाधेंनिरसतेला॥ दिननिशीपाहतां आननांला॥ बहु आनंदें मानितसें मीमनिं त्यामोदाला॥ किती तुझें वानुमी रुपाला॥ तवमुख इंदू लज्जित करितो त्यानभिंचंद्राला॥ १॥

प्रीये तुझें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच आहे. आतां एकांतस्थळीं उभयतां वाचून अन्य कोण आहे बरें; लज्जेचा त्याग कर आणि सन्निध ये.

**कीर्ति०-** अहोंही संन्निधच आहे काय आज्ञा असेल ती झाली ह्मणजे झालें. जंव दूर उभी आहें तोंपर्यंतचहीं भाषणें दोन दिवसानी आणखीकोणीतरीप्रीतीचें स्थान झालें ह्मणजे माझी गरीबाची आठवण सुद्धा होणार नाहीं. तसं झालं नाहीं तोपर्यंतच हा तोंडापुरता गोंडा घोळणं आहे.

**भद्रायु-** कोकिलस्वरे, इंदुवदनें, कंबुग्रीवे,. असी उदासपणानें भाषण कां करितेस. संसारांत ग्रहस्थाश्रमामध्यें स्वस्त्री सह आनंदामध्यें असावें हेंच मुख्य होय, तशांत ज्याप्रमाणें स्त्री असावी तसी तूं मला प्राप्त झालेली आहेस, तुझ्या इच्छेस अनुसरून वागण्या करितां हाभद्रायु सिद्ध आहे, मग मानसीं उद्विग्नता कां बरें. या तुझे भाषणांतील अभि

प्राय मुळींच मला समजला नाहीं.

**कीर्ति-** अभिप्राय तो कसला जसं स्त्रीयांचं जिणं एकझा लं घर किंवा एक दिलेलं घर, स्त्री जातीला दुसराका कांहीं मार्ग आहे? पुरुषांलाकाय आजही, उद्यां ती; असे प्रकार अ सतात. तशांत सापत्नता होण्याचा प्रकार तर चालतच आ लेला आहे. कदाचित् तसा जर योग झाला तरहीं भाषणं मग स्वमीं सुद्धां वागणार नाहींत.

**भद्रायु-** हां,हां, ठीक आतां समजलों ( क्रोधाविष्टहोऊन ) स्त्रियां सारखी अधम जाती अशी कोणती नसेल. आज या स्त्रीनें मजला सापत्न माता आहेत हें जाणून कांहिंसा माझा उपहास केला आणि दुषणलाविले लें धिःकार असो, असे दु ष्टस्त्रीस ( आपणांशींच ) एकुन भाटानें आज ( नागन- सें नारीबुरी ) ह्यायथा योग्य आहे इतकेंही असून साहसीक अविचारी मर्मभेदक भाषणें करणाऱ्या होत. असे स्त्रियां- शीं संभाषणही करणें योग्य नव्हे. ( उठून महाला बाहेर निघून जातो.

**कीर्ति०-** ( निजकांत रुष्ट झाला हें पाहून ) हेदेवामी भोळे पणानं प्राणपतीसमागमें विनोदाचं भाषण केलं त्याचाइतका का राग यावा ज्यामाणं सकुमार कर्दळीवर वज्रघात व्हावा तदनुसार प्राणनाथ दुरुक्तीनें विनाकारण ताडण करून गे ले. परमेश्वरा यांत माझा कायतरी अपराध. ज्याभाटानें

दोहोरा ह्मणून दाखविला ती उपमा मला दिली परंतु त्या भाटानें आणखी हाएक दोहोरा कां बरें नसेल ह्मटला?

## दोहोरा

नारी नारी सब कुई कहे नारी नरक की खाण ॥ जि सनारीसैंपैदाभये ध्रुव प्रल्हाद समान ॥ १ ॥

प्राणनाथ या दीन दासीवर नकाहो रुष्ट होऊं आह्मास्त्रीयांचे मुख्य दैवत पति. जर विनोदानें मी या चरणा जवळ भाषण न करावं तर कोणापासी बरं बोलावं याचा मानसी विचार झा ला असतांतर बरं होतं (धरणीवर आंग टाकिते.)

भद्रायु- (महालाबाहेरचे दिवाण खान्यांत उभाराहून मान साचे ठायीं विचार करितो) हर हर काय मी दुष्ट, निर्दयबरें प्राणसखीनें जें भाषण केलें त्याचा मला कां बरें राग यावा. कारण पूर्वी पित्याचे हातून तसा प्रसंग घडून आलेला आहे च. कदाचित् तसें न व्हावे आणि ममत्वांत उणीवन यावी याहेतूनें जी सूचना मला तिनें केली तेणेंकरून मी रुष्ट होणें हा माझा असमंजसपणा असेंच मी मानिलें पाहिजे. आतां अशा मन्मथ सुंदरीचा निरपराध त्याग करून जाणें हें मला विहित नव्हें (पुन्हा महालांत येऊन शोकग्रस्त अशा स्त्रीच्या नेत्रांस उदक लावून निज अंकावर घेऊन ह्मणतो.) प्राण सखे सावध हो, कायहा अज्ञानपणा सर्व श रीरावर रोमांच उभे राहिले आहेत, स्वेदोद्भवानें देह शिथि-

रु झाला आहे. या मुखचंद्राला कुरल केशरूपी अभ्रानें आ-
च्छादित केलें आहे सर्व शृंगार विछिन्न झाला आहे. सावध हो
सावध हो.

**कीर्ति०**- ( उठून बसते आणि दीनपणानें ह्मणते ) प्राणेश्वरा
यासर्व देहाचे अधिकारी आपण आहां याचरणासीं माझाजन्मा
चासंबंध जडलेला आहे. स्त्रियांना पति वांचून अन्य दैवत कोण
तेंबरें. प्राणेश्वरा वांचून मनोगत कोणाजवळ बरें बोलावें हें आप
ण जाणतच असून आजमी विनोदानें केलेल्या भाषणाचा परिणा-
म असाव्हावा काय?

## पद

(लावणीचे चालीवर)

प्राणनाथकां बिन अपराधें केला कोप मजवरी ॥
दुर्बळ मी नतही चरणावरी ॥ ध्रु० ॥ सहजविनोदें
भाषण केलें शेवट त्याचा तरीं ॥ असा होता भ
लतसा बहु मी मनिं झालें भेदरी ॥ अनाथस्त्रि
यांना नाथपतिवीण नाहीं दुजा अंतरी ॥ जाण
त असतां व्यर्थ मारिली शब्दबाण जंजिरी ॥ जं
जीरीबरी पण त्याहून ही बहू खोच बोंचली उरीं ॥
प्राणसख्या वेल्हाळा राजसा काहिं मि चुकलें जरीं
॥ तुह्मी कोपतां थार नसे मज रहाया उर्विवरी ॥
प्राणनाथकां बिन अपराधें केला कोप मजवरी ॥

दुर्बलमी नतही चरणावरी ॥ १॥ ॥ ॥ ॥

भद्रायु- मृगनेत्रे ममहृदयानंद वर्धिनी प्राणसखे जसा तूं विनोद केलास तसाच मीही विनोद केला त्याचा असा दुस्तर परिणाम कां बरें केलास. तू एक दोहोरा ह्मटलास तो ऐकून तुझे चातुर्याविषयीं माझी पूर्णत्वे खात्री झाली तशांत तूं जी सूचना केलीस ती उत्तमच आहे. आणि मला मान्यही आहे, कारण कीं, माझे मनोवृत्तानुसारीणि तुझ्या सारखी स्त्री अनुकूल असतां अन्यत्र ठिकाणीं आसक्ती होण्याचें मुळीच कारण नाहीं. (प्रेमानें दृढालिंगन देतो) उभयतांही सुमनशेजेवर शयन करितात.)

कीर्ति०- प्राणनाथ आपला क्रोध शांत झाला कीं,१ मी सर्वस्वी आपली दासी आहें. अज्ञानपणानें जर कांहीं चूक झाली तर उपदेशकरून संभाळून घेण्याचा अधिकार इकडचाच आहे.

भद्रायु- सखे, जावत्काल पर्यंत हा मोहनी रूप तुझा हस्त माझे ग्रीवेवर पडला नव्हता तोपर्यंतच तो विनोदाचा भाग होऊन गेला आतां त्याचें स्मरण कशाला पाहिजे.

कीर्ति०- प्राणनाथ, माझे मनांत एक इच्छा उत्पन्न झाली आहे आज्ञा असेलतर बोलेन पण मला ती इच्छा पूर्ण करण्याचं वचन मिळालं पाहिजे.

भद्रायु- कीर्ति अज्ञानत्व हें. तुझें मनोगत असेलतें तूं क-

थन करावें, पूर्ण करणेंविषयीं मी सिद्ध आहें. वचनांतच काय अर्थाक आहे.

कीर्ति०- नाहींबाई मी आधी बोलणार, मीमेली सहज बोलायाला जाईन आणि इकडे राग येणं होईल.

भद्रायु- हां, हें येतर वचन आणि सांग काय इच्छा असेल ती (वचन देतो)

कीर्ति०- वचन देणं झालं आतां सांगण्याला काय हरकत.

श्लोक

मममनिअशि इच्छाजाहली वल्लभाही ॥ करूनि वन विहारापाहुं तेथील भाही ॥ नाना असंख्य तरु नि कानन जे विराजे ॥ जेथेंच शोभति जलाशयंतीं सरोजें ॥ १॥

प्राणेश्वरा नानातऱ्हेच्या वृक्षांनीं आणि कमलां सहित ज्यामध्यें पुष्करणी जलानें पूरित अशा वनामध्यें आपणास ह क्रीडा करावी ह्याच हेतु आहे.

भद्रायु इतकेंच कीं नाहीं. यामध्यें दुर्घटलें काय आहे. उदईक रम्य अशा वनां मध्यें वनक्रीडा करून तुझे हेतु परिपूर्ण करितों. ( दासीस पाचारण करून सांगतो )

ओंवी

भद्रायु आज्ञापी दासीस ॥ वेगीं कळवीं प्रधानास ॥ उदयीक जाणें वनविहारास ॥ दळभारसमग्र सिद्ध करीं ॥ १

(दासी प्रधानास राजाज्ञा कळविते. प्रधान आज्ञेप्रमाणें सूर्योदया पूर्वी सर्व सिद्धता करून दासी कडून राजास वर्दी देतो)

भद्रायु- (नित्यकर्म उरकून भार्येसह गजस्कंधारूढ होऊन वन क्रीडें करितां दळभारा समवेत निघून जातो.

---

## प्रवेश ५ वा

स्थल............अरण्य

पात्रें

भद्रायु व कीर्तिमालिनी

भद्रायु- प्राणसखे पाहिलीसना ही वनशोभा या सरोवर तिरीं अनेक पक्षी क्रीडा करीत आहेत. जलामध्यें मत्स्य पहा अनेक जातीचे आहेत. सूर्य विकासिनी कशा प्रफुल्लित झाल्या आहेत त्या.

कीर्ति०- प्राणनाथ असे चमत्कार जर आपण मला नदाखवाल तर आह्मां स्त्रियांना कसें बरें दृष्टीगोचर होईल.

भद्रायु- हे नानातऱ्हेचे वृक्ष आणि सुवासिक पुष्पलता अवलोकन कर. यांचीनांवें तुला कथन करितो.

### कटाव

असंख्य तरु नामास ॥ कथि राजा प्रियकांतेस ॥ ध्रु० ॥ आम्रवृक्ष बहु सुरम्य केळी ॥ राता-

जन खर्जुरी पोफळी ॥ ताड माड आणीक ना-
रळी ॥ न्हीव काजुते बरवी सरळी ॥ जलाम्र
याने रुजल्या हरळी ॥ चंपक पिस्ते चंदन ब-
कुळी ॥ कांचन खिरण्या रसाळ जांभळीं ॥
पारिजात सालिणतेखदिर ॥ चंदन गोंदी माट-
गनार ॥ कपित्थपिंपळ देवद्वार ॥ नतझाले
जे फळें अंजिरा ॥ पाहतां मोद मनासी ॥ कथि
राजाप्रिय कांतेसी ॥ १ ॥ सुरम्य औषधीप्र
वाळ वल्ली ॥ शुभ्र केतकी स्वच्छ चमेली ॥
दोणा आणिक बहुल्या माली ॥ उक्षी कुसरी
दुजी सायली ॥ आडूनकिंजळ देवबाभळी ॥
अननस पपनस फणसविराजे ॥ पेरुलाज-
री बहुती लाजे ॥ बिंबफळें रमणीय शोभती
॥ रेणू वेणू गगनभेदिती ॥ सिसवे सायले
आणिक जाली ॥ रंगेरंगित बहुजित जाती ॥
अगणित तरुवर वर्णावे किति ॥ निबीड झा
डित श्वापद वसती ॥ ऐसे वनीं आनंदेशीं ॥
कथि राजा प्रिय कांतेशी ॥ १ ॥ ॥ ॥
प्रिये अवलोकन केलेंस ना ? हे गगन चुंबित वृक्ष कसे
घन दाट लागून गेले आहेत. ज्यांमध्यें शतशः हिंस्त्र-

१ हरळी २ कवठ ३ वेळु

पशु आनंदानें वास करीत आहेत.

**कीर्ति०-** प्राणनाथ हा सन्मुख कृष्णागरु वृक्षावर कृष्णावर्ण पक्षी एतावत्काल पर्यंत शब्द करीत होता त्याचें नांव काय बरें?

## आर्या

म्हणती पिकजगिं याला जो स्वध्वानें विहंगमीं श्रेष्ठ ।।
त्यानें स्वद्रव ऐकुनि लज्जेनें गर्व जाहला नष्ट ।। १ ।।

या पक्षाला कोकिल म्हणतात सर्व पक्ष्यांमध्यें याचा स्वर उत्तम म्हणून हा गर्वानें वागत असे. आज आपल्या पेक्षां मंजूळ असा शब्द ऐकून नष्ट गर्व होऊन आता स्तब्ध राहिला आहे. अवलोकन कर.

**कीर्ति०-** (एकाएकी भयभीत होऊन) प्राणनाथ जवळ अहां ना पाहिलाना केवढा भयंकर पशू पलायन करीत आहे तो.

**भद्रायु-** हांहां हें काय, सखे या पशूचें नांव सिंह होय. आजपर्यंत याचे ठिकाणीं गर्व होता कीं, माझे कटी सारखी सूक्ष्म कटी मनुष्य, पश्वादिकांमध्यें कोणाची ही नसेल. परंतु आज त्यानें आपल्या ही पेक्षां तुझी सूक्ष्म कटी अवलोकन करून लज्जायमान होऊन पलायन केलें.

**कीर्ति०-** पुरे मेलं भोळे पणानें विचारितें पण उलटं माझ्यावरच आणायचा होतं. बरं प्राण नाथ वनश्री अव-

लोकन करतां करतां श्रम झाले आहेत तर अग्रभागीं पुष्करणी तटाकीं विश्रांती करितां चलावें. (उभयतांही निघून जातात.)

## प्रवेश ६ वा

### स्थल..... कैलासपर्वत.

### पात्रें

### शंकर, पार्वती, नंदी, भृंगी, इत्यादि गण

शंकर- प्राणवल्लभे, आज या शंकराचे भक्त महान् महान् धूम्रपानादिक घोर तपस्या करीत आहेत. त्यांना दर्शन देण्या करितां भूलोकीं जाणें आहे तर तूं गणासमवेत या ठिकाणीं असावें.

### आर्या

ईशवदे गिरिजेतें जातों मी आत्म भक्त ताराया ॥
राहें तूं आनंदें जोंवरि मी येइंतों अगाराया ॥ १ ॥

पार्वती- प्राणनाथ कधिं ह्मणंजे कुठं जाणं झालं आणि मला समागमें नेलं अशी गोष्टच नाहीं. जसे आपले भक्त तसे माझेही भक्त आहेत मी समागमें आल्या वांचून राहणार नाहीं.

### आर्या

प्राणेशा मी तुमचे येइन संगति सुभक्त ताराया ॥

तुह्माविणमी येथें, नच राहें शून्यशा अगाराया ॥ १ ॥

**शंकर-** काय स्त्री जातीचा हट्टहा, मार्गा मध्यें अनेक हिंस्त्र पश्वादिक असतात कुठें भीति पावशील. स्त्रीयांचें काय कारण आहे.

**पार्वती-** ( रुसल्या सारखें दाखवून ) ठीकच आहे आवडती मस्तकांवर आहे मग माझी काय गरज. माझे खेरीज जाणें होऊं द्या.

**शंकर-** अपर्णे शक्तीरूप तूं आहेस तुझे योगानें मी सगुणत्व पावलों. तुझे विरहित जाईन कीं काय परंतु विनोदानें मात्र नेत नाहीं. ह्मटलें त्यांत राग कां आला.

**पार्वती-** आहे कोणाला राग मी आल्याशीवाय का राहणार होतें

( उभयतांही नंदीवर बसून निघतात ) आपले अनेक भक्तांना दर्शनें देतात आणि ज्याठिकाणीं भद्रायु व कीर्तिमालिनी होती तेथें अंतराळीं अदृश्य उभीं राहतात.)

---

## प्रवेश ७ वा.

स्थळ.......... उपवन.

पात्रें

शंकर, पार्वती, कपटी ब्राह्मण, त्याची स्त्री,

## व्याघ, भद्रायु व कीर्तिमालिनी.

पार्वती- प्राणनाथ हीं सन्मुख उभयतां स्त्री पुरुषं दिसतात हीं कोण बरें.

शंकर- अपर्णे काय विचारणें हें हा माझा भक्त जो भद्रायु तो स्व स्त्री समवेत क्रीडा करित आहे.

### श्लोक

बहूतभक्तभूतलीं॥तयांतश्रेष्ठहाअसे॥
सत्वशीलपुण्यखाणि॥वज्रबाहुसुतअसे॥
असंख्यभक्तशोधितां॥समानयादुजानसे॥
देखतांची यामनांत॥ आनंदफारहोतसे॥१॥

हा भक्त शिरोमणी भद्रायु होय, आज जगतीतलाचे ठायीं यासमान भक्त आहे कोण?

पार्वती- कायमेलं एखाद्याचं वर्णन करूं लागलं ह्मणजे तो कसाही असो सर्वांत श्रेष्ट होतो. याची वर्णना तर पुष्कळ झाली, आंत काय असेल कोण जाणं.

शंकर- गिरिजे मी आपले भक्ताचें यथार्थ वर्णन केलें हें तुला मिथ्या वाटत असेल तर सांगतो श्रवण कर

### आर्या

मायेचातोकरुनी व्याघ्रतुंहोईं तशीच मत्भार्या॥
त्याव्याघ्रेंतुजनेतां विप्ररुपेंमीछळीनत्याआर्या॥१॥
ऐसाछळकरितांहीपाहेंतोसत्वधीरराव कसा॥

जाउंनेदिचसत्वातेजानें पूर्णजेविपावकसा ॥ २ ॥
प्रीये मायेचा व्याघ्र निर्माण कर मीवृद्ध ब्राह्मणाचें रूप धारण करितों. तूं विप्रस्त्री व्हावें आणि त्याव्याघ्रानें तुजला हरण करून नेली असतांराजाचामी छळ करितों ह्मणजे भद्रायु सत्वसील कसा आहे हें कळेल.

(व्याघ्रनिर्माण करून उभयतांही कपटी रूपें धारण करितात. )

**विप्र-** ( भद्रायु सन्मुख उर्ध्व हस्तकरून ) राजा धांव धांव माझी स्त्री व्याघ्र धरून नेत आहे ( दीर्घस्वरानें हाक फोडितो. )

**भद्रायु-** विप्राची करुणा वाणी श्रवण करून.

### ओंवी

राजाधावेउठाउठी ॥ धनुष्यासीलोवोनीकोटी ॥
त्वरेंजातव्याघ्राचेपाठीं॥ अपारशरसोडीतसे ॥ १॥
विद्युत्प्रायशरभेदत॥ परिव्याघ्रतुच्छमानित॥
त्याद्विजभार्येसहत्वरीत॥ अदृस्यहोताजाहला॥ २॥

### दिंडी

रावतेव्हां हतवीर्यबहूझाला॥ पाहुनीयासन्मूखभुदेवाला॥
कसाझालादेशीकरुष्टमातें॥ जगींआलाबोलहापोरुषातें॥ १

(एका एका व्याघ्र गुप्त झाला सें पाहून राजाहतवीर्यहोत्साता मागेंफिरतो)

**विप्र-** [illegible] तपमें असो राजा तुझ्या पराक्रमाला अरे तूं नीतिनें रा

मी पापाशीन [illegible]ालन करणारा तुझ्यासमक्ष माझी सुंदर

[illegible]ागरींदेकुळपडलें येऊन॥ तरीसो [illegible]न मुक्त करवलीनाहीं.

भद्रायु-(मनांत) हे परमेश्वरा केवढें अपे[illegible]

(श्लोक)

क्षत्रियकिरत्नायत शब्द झाला॥ उणा कसा त्वत्पुरुषार्थ गेला॥ नेलीच व्याघ्रें रमणी हि माझी॥ झाली जगीं या अपकीर्ति तूझी॥ १॥

अधमा क्षत्रिय कुलामध्यें तुझें जनन असून कुलांगार कसा उत्पन्न झालास ज्यागुरुनें तुला द्वादश सहस्र गजाचें बल अनेक शस्त्रास्त्रें व खड्ग दिलें तें सर्व निष्फळ होय (शोकाकुलित होऊन) हरहर हे परमेश्वरा माझे वृद्धावस्थेंत माझी मनोवृत्तानुसारिणी स्त्री आज कशीरे काळरूपी व्याघ्रानें हरण केली आतां या प्रिय कांते विना माझी सेवा कोण करील मी कोण त्या स्थळीं माझी सुंदरी पाहूं अथवा प्राण त्याग करूं.

भद्रायु- हे द्विजवर्य महाराज गतवस्तूचा शोक करूनकाय उपयोग आपणाला मी अमुप द्रव्य देतों पुनरपी उत्तम स्त्री पाहून विवाह करावा अथवा हें मान्य होतनसेल तर समग्र राज्य देतों हें घ्यावें परंतु शोक करूनये.

विप्र- राजा काय एखादे अज्ञान शिशूसारखी माझी समजूत करितोस ही.

## आर्या

बधिरासन्मुख गायन अंधाला काय होय दर्पण तें॥ वृद्धत्वीं लग्न अशी जाणें तैसेंच राज्य [illegible] ॥ नत्या आर्या॥ १॥

अरे बहिऱ्यापुढें उत्तम गायन, अंध[illegible] [illegible]रराव कसा ॥

निष्फळ त्याप्रमाणें [illegible]

य आणि तुझें राज्यदान घेऊन ती घातायात मला गरीब
ला नकोरे नको मला माझी स्त्री आणूनदें. मला अन्याची
गरज नाहीं.

यु- द्विजोत्तमा आपल्याला अनेक उपाय कथन केले तत्रापि
एकही मान्य होत नाहीं. बरें माझी स्त्री कीर्तिमालिनी मीदान
इच्छा असल्यास ही घ्यावीं.

प्र— राजा अरेही तुझी लाडकी स्त्री पालखी मधून फिरणारी
माझी सेवा कशीरे करिल.

**कीर्तिमालिनी-** महाराजहें कायह्मणतां ज्याप्रमाणें आपण आ
ज्ञा करालु त्याप्रमाणें आपली सेवा करीन काळजी तिलमात्र क
रूनये स्व कुलोचितसत्व सौंरक्षणार्थ जेणें करून आपण तुष्ट
व्हाल तो उपाय करणें जरूर आहें

**वीप्र-** कांहीं चिंता नाहीं माझा तपाद्री मेरुपर्वताहून ही श्रेष्ट
आहे य: कश्चित स्त्री दान घेतल्यानें दोष तो काय? राजा संकल्प
करून दे. तुझी स्त्री मी दान घेतों.

## ओव्या

रायाचें सत्व पाहे ब्राह्मण॥ देई ह्मणे मज स्त्री दान॥
माझें तप मेरुपर्वताहून॥ उंच असे न सरे कधीं॥ १॥
मी पापाशीं न भीं जाण॥ अंगीकारिलें गा स्त्रीदान॥
ागरीं ढेकुळ पडलें येऊन॥ तरीं सागर काय डहूळे

द्रायु-(मनांत) हे परमेश्वरा केवढें अो